# कणखर बाणा
# राणी अहिल्या

लेखिका
**डॉ. मंजूषा कुलकर्णी**
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)

मंजुभारती प्रकाशन

**कणखर बाणा : राणी अहिल्या** (चरित्र)

**लेखिका** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
E-mail : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : पौष कृ. ३, शके १९४४,
मंगळवार, दि. १० जानेवारी, २०२३

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
मो. ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : **978-81-953257-7-1**

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १६०/-**

# अर्पणपत्रिका



शूर वीरांगणा, श्रेष्ठ समाजसेविका, राजधुरंधर, संयमित जीवना, समर्पित भक्तिरसमना अशा महाराष्ट्राच्या सुकन्या मातोश्री अहिल्याबाईंच्या पवित्र कार्यास ही कृती सविनय समर्पित !

# लेखिकेचे मनोगत

भारतीय इतिहासात आपल्या योगदानाने महत्त्वाचे स्थान निर्माण करणाऱ्या अनेक गुणवती स्त्रीरत्नांपैकीच एक अद्वितीय रत्न म्हणजे अहिल्याबाई होळकर. महाराष्ट्रातील या सुकन्येने मध्यप्रदेशातील होळकर घराण्याचे नाव त्रिखंडात गाजवले ते आपल्या सत्त्वशील वृत्तीने, धीर लढवैय्या बाण्याने, आध्यात्मिक जीवनशैलीने, परोपकारी चरित्राने, समर्पण भावनेने.

अनेक वेळा अहिल्याबाईंच्या चरित्राला एकपात्री प्रयोगातून मांडण्याचा योग आला. ती संहिताही माझीच असल्याने प्रयोगादरम्यान जणू स्वयं अहिल्याबाई होळकर माझ्यात संचारत असत आणि त्यांचं जीवन उभं करताना अश्रू, रोमांच, आनंद, कृतार्थता, देशभक्ती, वेदना अशा नानाविध भावनांनी हृदय अगदी भरून जात असे.

अहिल्याबाईंचे व्यक्तिगत आयुष्य किती दुःखी, विरही, वेदनादायी तरी यांचे राजकीय आयुष्य किती कर्तव्यकठोर, चोख व देशाभिमानी असे वाटत असे. त्यांच्या त्यागी व समर्पण वृत्तीने भल्याभल्यांना नमविले होते तर कणखर बाण्याने राघोबादादांसारख्यांनाही लाजविले होते. त्यांची दानशूरता आजही साक्ष देत उभी आहे तर त्यांची सामाजिक कामे त्यांच्या कार्याचे द्योतक आहेत.

अहिल्याबाईंचा ठाव घेताना त्यांच्या पुण्यश्लोक व्यक्तिमत्त्वाचा अंदाज घेताना कधी मीही पुण्यमार्गावर मार्गस्थ झाले हे कळलंच नाही. त्यांच्याबद्दलचे जे शब्द स्फुरत होते ते छोट्या छोट्या लेखातून पुढच्या पिढीला त्यांचे महान चरित्र समजावे म्हणून लिहिले गेले आणि त्यांचे चरित्र थोडक्यात, सरळ, सुबोध

पद्धतीने जागवण्याचा हा माझा प्रयत्न या पुस्तक रूपाने वाचकांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

हे पुस्तक पुढच्या पिढीला थोडक्यात पण समग्रपणे अहिल्याबाई होळकर जाणण्यास मदत करेल असा विश्वास वाटतो. अहिल्याबाईंसारख्या थोर भारतीय वीरांगणा, समाजसुधारक, राजधुरंदर स्त्रियांना लक्ष लक्ष प्रणाम !

**– डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) अहिल्याबाईंचा जन्म, बालपण व शिक्षण | ... | ९ |
| २) अहिल्याबाईंचा विवाह | ... | ११ |
| ३) नववधू अहिल्या | ... | १४ |
| ४) अहिल्येचा संसार | ... | १६ |
| ५) मल्हाररावांच्या तालमीत अहिल्येची जडणघडण | ... | २२ |
| ६) पुत्राकडून निराशा | ... | ३० |
| ७) राजधानी महेश्वर झाली | ... | ३३ |
| ८) मुत्सद्दी अहिल्या | ... | ३६ |
| ९) समाजकार्याचा वसा | ... | ४१ |
| १०) अहिल्याबाईंचे ग्रंथप्रेम व त्यांची साहित्य शारदेची उपासना | ... | ४३ |
| ११) प्रसंगानुरूप कठोर निर्णय | ... | ४५ |
| १२) देशप्रेमाखातर | ... | ४७ |
| १३) अहिल्येचा कीर्तीसुगंध | ... | ४९ |
| १४) विद्वानांची कदर, कलावंतांचा आदर | ... | ५१ |
| १५) अहिल्येची बिरुदं | ... | ५३ |
| १६) स्त्रीधनाचा सुयोग्य वापर | ... | ५५ |
| १७) अहिल्येचा सक्षम कारभार | ... | ५७ |
| १८) अहिल्येचे पशुपक्षी प्रेम | ... | ५९ |
| १९) माझ्यावर ही स्तुतीसुमने कशाला? | ... | ६१ |
| २०) निष्ठावंत अहिल्या | ... | ६३ |
| २१) अहिल्याबाईंचा दिनक्रम | ... | ६५ |
| २२) राखीची ओवाळणी | ... | ६७ |

२३) नररत्नपारखी अहिल्या ... ६९
२४) दानशूर अहिल्या ... ७२
२५) अहिल्या साक्षात लक्ष्मी ... ७४
२६) शूरवीरांगणा अहिल्या ... ७६
२७) अन्नव्यवस्थापन कुशल अहिल्या ... ७८
२८) जलव्यवस्थापिका अहिल्या ... ८०
२९) न्यायप्रिया अहिल्या ... ८२
३०) अजरामर अहिल्या ... ८८
३१) अहिल्येची जन्मकुंडली ... ९०
३२) अहिल्याबाईंच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ... ९२
३३) अहिल्यादेवींचे वाङ्मयीन कार्य (इ. स. १७६७ ते १७९५) ... ९४
३४) अहिल्याबाईंचे भारतवर्षातील सांस्कृतिक कार्य ... १०१
३५) अहिल्याबाईंची प्रेरक वचने ... १०५
३६) अहिल्याबाईंसंबंधी उपलब्ध निवडक वाङ्मय ... १०६

- महेश्वरातील वेदशास्त्रसंपन्न विद्वान ... ११५
- महेश्वरातील देवस्थाने (इ.स. १७९२, सरकारी दप्तर यादी ) ... ११६
- लेखिकेचा परिचय ... ११८

# १) अहिल्याबाईंचा जन्म, बालपण व शिक्षण

पुण्यश्लोक अहिल्याबाई, मराठ्यांच्या इतिहासातील एक थोर स्त्रीरत्न. कर्तबगारीचा हिमालय उभ्या केलेल्या या स्त्रीचा जन्म महाराष्ट्रातील पुण्यभूमीत अर्थात मराठवाड्यात बीड परगण्यात (जिल्ह्यात) असलेल्या चौंढी या छोट्याशा गावी झाला. तो शुभ दिन होता ३१ मे १७२५. आज हे गाव अहमदनगर जिल्ह्यात आहे. चौंडी गावच्या पाटील माणकोजी शिंदे व त्यांची पत्नी सुशीलेचे पुण्य फळाला आले आणि त्यांच्या पोटी असे दिव्यरत्न जन्माला आले. धनगर जातीचे माणकोजी हे गावचे पाटील होते, पण आधी ते एक शेतकरी होते. त्यांची शेतीवाडी अहमदनगर परगण्यातील पाथर्डीला होती. दोन्ही गावे जवळच होती.

माणकोजीचे कुटुंब खाऊन पिऊन सुखी होते. त्यांना शहाजी आणि महादजी ही दोन मुले व अहिल्या ही एकुलती एक कन्या होती. अहिल्या आता सात–आठ वर्षांची झाली होती. ती आईकडून सुसंस्कार घेत होती. आईला घरकामात मदत करत होती. ती बालपणापासूनच धार्मिक वृत्तीची होती. शिवशंकर हे तिचे आराध्य दैवत होते. रोज सायंकाळी सीणेश्वराच्या देवळात जाऊन तेलवात करीत होती. अहिल्येच्या मन गाभारी सतत एक शिवलिंग तिच्या भक्तिधारेने अभिषिक्त होत होतं. तिच्या अंत:करणातील भक्ती, श्रद्धा आणि निष्ठेचं बेलपत्र सदैव त्या शिवलिंगावर वाहिलं जात होतं. तिची ही नितांत श्रद्धा, हुशारी तसेच कामसुवृत्ती पाहून तिची आई सीणेश्वराला रोज म्हणायची, ‘‘देवा माझ्या अहिल्येच्या गुणांचं चीज होऊ दे, तिला चांगलं सासर मिळू दे.’’ देव तरी आईची मागणी कशी डावलणार? पुढे अहिल्येच्या पदरी त्याने दान टाकलेच, तिला राजयोग आला आणि उत्तुंग कर्तबगारीने झळाळून निघालेलं सासर मिळालं.

आपल्या सद्गुणांनी माता पित्यांची ती लाडकी तर होतीच; परंतु दोन भावांची एकुलती एक बहीण म्हणूनही तिचं कौतुक झालं. जेवढंही माहेरपण मिळालं ते प्रेमानं, लाडानं, कौतुकानं भरभरून गोंजारणारं होतं. तिची असाधारण प्रतिभा आणि कुशाग्र बुद्धी तिच्या मातापित्यांच्या नजरेतून सुटली नव्हती, म्हणूनच तिच्या शिक्षणाची व्यवस्थाही केली गेली.

अहिल्याबाईंना बाळबोध लेखन, वाचन व मोडी लेखनाचेही शिक्षण मिळाले. शिक्षणापेक्षाही त्या जात्याच शहाण्या होत्या हेच खरं. **''स्त्रियो हि नाम खल्वेताः निसर्गादेव पण्डिताः''** अर्थात स्त्रिया या निसर्गत:च हुशार असतात, तेच अहिल्याबाई बाबतही खरं होतं. त्यांचे चातुर्य बाह्य शिक्षणावर अवलंबून नव्हते, ते उपजतच होते. त्यांची हुशारी आतून बाहेर झळकत होती. चुणुकदार अहिल्या सर्वांना हवीहवीशी वाटत असे.

अहिल्याबाईंचा रंग सावळा होता. उंची मध्यम होती. चेहरा मात्र सतेज होता आणि डोळ्यांमध्ये चमक होती. राहणी साधी होती पण विचारसरणी मात्र उच्च होती.

पुढच्या आयुष्यात तर गळ्यात केवळ एक सोन्याचा साधा अलंकार आणि नेहमी पांढरे पातळ नेसत असत. अहिल्याबाईंचे रूप अतिशय सोज्वळ होते. त्यांच्या रूपानं मूर्तीमंत सात्त्विकताच वावरत असे. अहिल्या आणि पवित्रता हे जणू समीकरणच होते.

■

# २) अहिल्याबाईंचा विवाह

आयुष्यात काही घटना निव्वळ योगायोगाने घडतात. कदाचित त्यामुळे दैवयोग बलवान असतो हे खरे. अहिल्येचा विवाह हा असाच एक सुयोग. सरदार मल्हारराव होळकर पुण्याला पेशव्यांकडे जाताना वाटेत चौंढी नावाच्या गावी थांबतात काय, तेथे त्यांचा तळ पडतो काय आणि पुढे या गावाचीच बालिका त्यांची पुत्रवधू होते काय. सारेच सीणेश्वराच्या संकेताने घडल्या प्रमाणे वाटते.

चौंढी गाव हे सीणा आणि हरणा नदीच्या संगमावर वसलेले होते. या संगमाकाठीच मल्हाररावांचा तळ पडला होता. राजकीय कामासाठी मल्हारराव होळकर पुण्याला निघालेले असल्याने त्यांच्या सोबत हत्ती, घोडे आणि सर्व सरदारी थाट होता. संगमावर रम्य असे सीणेश्वराचे मंदिर होते. त्या घाटावरच चौंढा देवीचे आणखी एक मंदिर हाते. ऊन्हं कलली. त्या प्रकाशात सारा आसमंत मनमोहक झाला होता. आकाशात मावळतीच्या सूर्याच्या रंगछटा, दोन नद्यांच्या संगमात पडलेलं ते प्रतिबिंब, काठावरती ही दोन देऊळं... असा सर्व रम्य देखावा मनाला वेगळीच शांतता व पवित्रता देत होता. प्रवासाने थकलेल्या मल्हाररावांना व त्यांच्या सैन्याला एक-दोन दिवस तेथे मुक्काम करण्याचा मोह झाला आणि मल्हारराव दैवाने भावी सुनेच्या मोहात पडले. त्यांच्या राहुट्या शिवमंदिरासमोर मोकळ्या जागेत पडल्या.

सूर्यास्त होत असताना मल्हारराव संगमावर निवांत क्षण घालवत होते. गोधन घरी परतत होते, पक्षीही आपल्या घरट्याकडे परतत होते. तिन्ही सांजा झाल्या तसेच लोक मंदिरात दर्शनाला येऊ लागले. त्याच वेळी परकर पोलक्यातली एक मुलगी तेलवात करण्यासाठी देवळात आली. ती त्या राहुट्यांकडेच कुतूहलाने पाहत पाहत गाभाऱ्यात गेली. तिच्या नजरेत विलक्षण चमक, तेज व निर्भयता होती. तिची चाल बाणेदार होती. मल्हारराव भान हरखून

तिच्याकडे पाहतच राहिले. ती मात्र सवयी प्रमाणे गाभाऱ्यात गेली, तिथं तेलवात केली. तिच्या तेलवातीने गाभारा उजळला. तसाच मल्हाररावांच्या मन गाभाऱ्यातही प्रकाश पडला. ती निघून गेली, पण जाताना एक आशेचा दिवा मल्हाररावांच्या अंतःकरणात चेतवून गेली. त्याच पवित्र प्रकाशात मल्हारराव विचार करू लागले. त्यांचा मुलगा खंडेराव दहा वर्षांचा आणि लग्नाचा झाला होता. १७२३ साली विजयादशमीच्या दिवशी मल्हाररावांची पत्नी गौतमाबाई प्रसूत होऊन हा मुलगा झाला होता. शस्त्रपूजनाच्या दिवशी जन्म झाल्यामुळे त्याचे नाव खंडेराय ठेवले होते. शिवाय होळकरांचे कुलदैवतही श्री खंडोबाच होते. या आपल्या मुलासाठी वधूचा शोध सुरू होता, पण नजरेत कुणी भरत नव्हते. खंडेराय तसा व्यसनी, धडाडी नसलेलाच होता. त्याला कर्तबगार, धीट, तेजस्वी पत्नी मिळाली तरच त्याचा निभाव लागेल असे विचार त्यांच्या मनात येत होते.

रात्रभर ही मुलगी कोणाची असेल याच विचारात स्वप्नात रमलेल्या मल्हाररावांची सकाळ प्रसन्न झाली. तिच्या चौकशीसाठी माणसे पाठवण्याच्या बेतात असतानाच समोर मैत्रिणींबरोबर वाळूत खेळणारी, बागडणारी तीच मुलगी त्यांना दिसली. तिने वाळूचे एक शिवलिंग तयार केले होते. त्यावर बेलफूल वाहून ती मनोभावे त्याला नमस्कार करत होती. तेवढ्यात अचानक मल्हाररावांच्या कबिल्यातला एक घोडा अचानक उधळला आणि तिच्या मैत्रिणी लगेच पळून गेल्या. ती मुलगी मात्र घोड्याला न जुमानता त्या शिवलिंगाला काही होऊ नये म्हणून ती चटकन त्यावर आडवी झाली. धीटपणे तशीच थांबली. मल्हाररावांना मोठे कौतुक वाटले. ते पुढे सरसावून तिला म्हणाले, ''पोरी, उधळलेल्या घोड्याला तू जराही घाबरली नाहीस? अगं पण तो उधळलेला होता, तुला त्यानं तुडवलं असतं तर?'' निर्भयपणे त्यांच्याकडे आपली बाणेदार नजर रोखत ती म्हणाली, ''हे शिवलिंग, मी तयार केलं आहे. जे आपण स्वतः तयार करतो त्याचं रक्षणंही प्राणपणाने केलं पाहिजे. मी तेच केल. माझं काही चुकलं का?'' तिच्या या करारी पण नम्र उत्तराने ते अचंबित झाले. आपल्या मुलाचं चुकलेलं

आयुष्य हीच बरोबर करू शकते, हे उत्तर त्यांना तिच्या रूपानं सापडलं होतं. हिलाच आपली सून करायची हा निर्धारच मल्हाररावांनी तेव्हा केला.

माणकोजी शिंदे आणि सुशीला बाईंना आपल्या लेकीच्या भाग्याचा उत्कर्ष झाल्यासारखे वाटले. त्यांनी आनंदाने होकार दिला. सन १७३३ वयाच्या आठव्या वर्षी अहिल्याबाईंचा विवाह खंडेरावांशी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. जयघोषात राजवाड्याजवळ पोहोचलेली छोटी अहिल्या या थाटामाटाने, राजवैभवाने थोडी गांगारून गेली. वाड्याची भव्य दिव्यता ती डोळ्यातून अंत:करणात साठवू लागली. सजलेला तो राजवाडा आनंदाने तिचे स्वागत करू लागला. लोक खुशीखुशीने मुजरे झाडू लागले. फुलांच्या पायघड्यांवरून ती अलगद चालत खंडेरावांबरोबर गृहस्थाश्रमाची वाट चालू लागली. भरजरी शेला सावरत ही नववधू भविष्यातील राज्यकारभाराची धुरा सांभाळण्याची जणू तयारीच करू लागली. लग्न करून चौंढी सारख्या महाराष्ट्रातील छोट्या गावातून इतक्या दूर ती इंदूरलाही पोहोचली आणि सीणेश्वराच्या कृपेने होळकर साम्राज्याची पुत्रवधू ठरली.

तिने थाटामाटात गृहप्रवेश केला अन् तिच्या रूपाने होळकरांच्या घरात कर्तृत्व लक्ष्मी सामावली गेली. नोकर, चाकर, मुजरे, जयजयकार यांची तिला सवय नव्हती, पण थोड्याच दिवसात ही अहिल्या सासरी रूळली. साऱ्यांनाच ती आपलसं करून गेली. अहिल्या सर्वांची लाडकी झाली. सासरी माहेर घेऊन गेली. सासू सासरेच आईवडील अन् सोबतीला शिवलिंग तिची प्रेरणा झाली.

■

# ३) नववधू अहिल्या

छोट्याशा पाटलाच्या वाड्यातून मोठ्या राजप्रासादात आलेली अहिल्या सगळं राजवैभव मान उंचावून न्याहाळत होती. तिचे डोळे त्या राजवैभवाने दिपून जायचे, तेवढ्यात कोणीतरी मुजरा करीत जयजयकार करायचं अन् ती भानावर यायची. तिचं मन गोंधळून जायचं, काय प्रतिक्रिया द्यायची यानं संभ्रमित व्हायचं. मग थोड्याच दिवसात या सगळ्यांची चिमुकल्या अहिल्येला सवय झाली अन् आपण कोणीतरी खूप महत्त्वाच्या आहोत एवढचं जाणवू लागलं. तरीपण मुळात नम्र असणारी अहिल्या या सर्व थाटाने उन्मत्त कधीच झाली नाही. उलट ती मनोमन सीणेश्वराचे वारंवार आभार मानत असे की तिला असं सुरेख सासर मिळालं होतं.

तिच्या पैंजणाची रुणझुण साऱ्या वाड्यात ऐकू येऊ लागली. चंचल अहिल्या सगळीकडे सरसर फिरून वाडा, वाड्यातला कारभार, कारभारी माणसं यांना समजून घेऊ लागली. आपल्या सासूत आई पाहणारी अहिल्या अन् अहिल्येच्या रूपानं कर्तबगार लेक मिळाल्याच्या आनंदात असणाऱ्या गौतमाबाई तिला सोबतीनं सगळं दाखवू लागल्या. सगळ्या गोष्टीत सामावून घेऊ लागल्या. या सासू-सुना सगळ्यांच्या कौतुकाचा विषय बनल्या होत्या. मल्हाररावांना तर अहिल्येचं खूपच कौतुक होतं. ते तिच्यावर लेकींपेक्षाही अधिक माया करू लागले. अहिल्याही त्यांच्या आज्ञेत राहण्यात धन्यता मानू लागली.

सासू गौतमाबाईंबरोबर ती देवळांमध्ये जाऊ लागली. पोथ्या पुराणे ऐकू लागली. धार्मिक अहिल्येला सासूही तशीच लाभली. ती सासरी छान रूळू लागली. हळूहळू तिथल्या कामांची ती माहिती करून घेऊ लागली. सकाळी लवकर उठून गायी गुरांकडे लक्ष देणे, नोकरचाकरांच्या कामावर लक्ष ठेवणं, स्नान करून पूजाअर्चा करणं, सासूसासऱ्यांनी सांगितलेली कामं श्रद्धेने करणं

असा नेमचं तिनं सुरू केला. आपल्या वागण्या-बोलण्यानं तिने सर्वांच्या मनात आदराचं स्थान निर्माण केलं. हवी तशीच सून मिळाली म्हणून मल्हाररावांना आपल्या पसंतीचं कौतुक वाटू लागलं तर गौतमाबाईंनी गुणी सुनेला मनापासून स्वीकारलं. तिला आनंदी ठेवण्यासाठी त्या धडपडू लागल्या तर अहिल्या सासू-सासऱ्यांच्या आनंदासाठी सारं काही उत्साहाने करू लागली.

अतिशय आनंदात, उत्साहात अहिल्येचा नवा नवा संसार सुरू झाला. दिवसामागून दिवस निघून गेले अन् खंडेराव बारा वर्षांचे होतात न होतात तोच एक आनंदाची बाब घडली. पेशव्यांकडून खंडेरावांना दोन गावांची जहागिरी लिहून दिल्याची थैली घेऊन काशीद जोडी आली. वाड्यात आनंदाच्या सागराला उधाण आलं. साखर वाटली गेली. अहिल्येचं मन तर आनंदाच्या वाटेवर झुलू लागलं, तिनं आपल्या प्रेमळ नजरेनचं खंडेरावांची दृष्ट काढली. काही दिवसांनी खंडेरावांना शिलेदाराची वस्त्रं मिळाली. अहिल्या आता शिलेदाराची संगिनी झाली.

■

# ४) अहिल्येचा संसार

कर्तबगारी व सद्‌गुणांनीच जणू अहिल्येच्या रूपाने होळकरांच्या घरात पदार्पण केले होते. मल्हाररावांची सुनेवर फार प्रीती होती. गौतमाबाईही सासू नव्हे आई होऊन ममतेचा वर्षाव करी. खंडेरावांची उदाबाई नावाची बहीण होती. तिची तर वहिनी खूपच लाडकी होती. घरातील प्रेमळ माणसांच्या स्नेहछत्रछायेखाली अहिल्येच्या संसाराला सुरुवात झाली.

खंडेरावांना शिलेदारीची वस्त्रे दिली गेली अन् मल्हाररावांना हत्तीचं बळ आलं. आपल्या हाताखाली आपल्या एकुलत्या एक ल्योकाला ते तयार करू लागले, तर अहिल्याबाई गौतमाबाईच्या वात्सल्यपूर्ण मार्गदर्शनाखाली घडू लागल्या.

शिलेदारी मिळाल्यानंतर खंडेराव लढाईला जाऊ लागले. त्याकाळी लढाईला जातांना कुटुंब कबिलेही सोबत जात असत, त्यानुसार अहिल्याबाईही आपल्या नवऱ्यासोबत, लढायांवर जाऊ लागल्या. राजप्रासादातून बाहेर पडून त्यांना आता रणभूमीही पाहता येऊ लागली. खंडेरावांना मल्हारराव ज्या लढाईच्या मसलती सांगत, युद्धाचे डावपेच शिकवत, गनिमी कावे, व्यूहरचना सांगत तेव्हा हे युद्धाचे धडेही त्यांना गिरवायला मिळू लागले. अहिल्याबाईंचा संसार लढवय्या घराण्याशी होणार होता. त्यामुळे हे बाळकडू त्या प्राणपणाने प्राशन करू लागल्या. त्यांची पराक्रमाच्या संसाराची ओढही मल्हाररावांनी हेरली, अन् आपल्या मुलापेक्षा सुनच अधिक सरस असल्याचंही त्यांच्या लक्षात आलं होतं.

खंडेरावांचं संसारात लक्ष तसं बेताचंच होत. अहिल्येकडे त्यांच लक्ष क्वचितच जात असे. अहिल्येच्या सद्‌गुणांमुळे खंडेराव तिच्याशी दबकूनच वागत असतं. मुलुखगिरीवर गेलेले खंडेराव श्रमाने, युद्धाने थकले की विरंगुळा शोधू

लागले. त्यांचा विरंगुळा नाचगाण्यात, नशापाण्यात, मदिराक्षींच्या सान्निध्यात होऊ लागला. ते अधिकाधिक त्यातच मशगूल राहू लागले. तरीही आपल्या अशा दुर्वर्तनी पतीचा अनादर अहिल्याबाईंनी कधीच केला नाही. पत्नीधर्म त्या पाळत होत्या. मनातून खंडेरावांच्या अशा बेताल वागण्यामुळे त्या कष्टी होत असत, पण आपले दु:ख गिळून त्या काही झालेच नाही अशा आविर्भावात सर्वांमध्ये वावरत असतं. त्यामुळे इतर कोणाची देखील खंडेरावांचा अवमान करण्याची हिंमत झाली नाही.

अहिल्याबाई आपले प्रत्येक भूमिकेतले कर्तव्य पार पाडतं होत्या. सून म्हणून सासू-सासऱ्यांशी त्या मर्यादेने वागत. वहिनी म्हणून त्या नणंदेशी अदबीने वागत. आज्ञापालन हा तर त्यांचा अंगभूत गुणधर्म होता. मल्हाररावांची आज्ञा तर त्यांनी कधीच मोडली नाही. सर्व धार्मिक कृत्ये, कुलधर्म, कुलाचार, पाठ, होम हवनादी त्या मनापासून पार पाडत असत. याच धर्माचरणाचे फळ म्हणून का होईना त्यांची ओटी भरली गेली. त्यांच्या इतर सवतींना मुळबाळच नव्हते. अहिल्येची कूस मात्र उजवली होती. १७४५ साली देवाळपूर नावाच्या गावी प्रसूत होऊन अहिल्येला पुत्ररत्नाची प्राप्ती झाली. त्याचे नाव मालेराव ठेवण्यात आले. घरात आनंदी आनंद झाला. खंडेरावही पित्याच्या आनंदात न्हाऊन निघाले. पुढे आणखी तीन वर्षांनी १७४८ या दोघांना एक कन्यारत्न लाभले. तिचे नाव मुक्ताबाई ठेवले गेले.

गौतमाबाई आणि मल्हाररावांना या दोन लेकरांमुळे पुन्हा उभारी मिळाली. अहिल्येच्या पोटी होळकरांचा दीपक व पणती दोघेही प्रज्वलित झाले. अहिल्येच्या संसाराला गृहस्थाश्रमाची पूर्णता आली. मुले दिसामासांनी वाढू लागली तसे मल्हाररावांचे शौर्यही गाजू लागले. त्यांची सत्ता उत्तरेत दूरवर पसरली होती. त्यात अहिल्याबाईंची मदत होत होती. परंतु दूरवरची राजकार्ये खंडेरावांवर गरजेचे होते म्हणून एकदा मल्हाररावांनी जयपूरच्या गादीची भावाभावातील भांडणे सोडवण्यासाठी त्यांना मध्यस्थी करण्यासाठी पाठवले.

आपण कशासाठी आलो आहोत हे विसरून खंडेराव त्यांच्या राजकारणाचाच स्वतः एक भाग बनले. शेवटी मल्हाररावांना तिकडे जाऊन खंडेरावांना त्यांच्या बहिणीच्या लग्नाच्या तयारीसाठी वाफगावला रवाना करावे लागले.

पुन्हा एक प्रसंग असा घडला की अयोध्येच्या नवाबाला बंगष विरुद्ध मदत करायला मल्हारराव गेले असता खंडेरावही बरोबर होते. एका प्रसंगात खंडेरावच बंगषच्या तावडीत सापडले. दैव बलवत्तर म्हणून आणि मराठ्यांच्या धाकामुळे बंगषांनी सुखरूप परत केलं. मल्हाररावांच्या जीवात जीव आला. खंडेरावांनी दिल्लीच्या राजकारणातही प्रभाव टाकला नाही. त्यांच्या लहरी, हट्टी स्वभावाने आणि राजकीय दूरदृष्टीच्या अभावामुळे अपयशच पदरी पडत गेले. मल्हाररावांनी ओळखून घेतले की, याचा वकूबच बेताचा, याच्या तलवारीला न धडाडी न विचारांमध्ये सामर्थ्य. राजकारणात गतिही शून्यच. आता पुढं सारी भिस्त अहिल्येवरच. कळंत पण वळत नाही या न्यायाने पुत्रप्रेमाखातर सतत त्याला आपल्या बरोबर ठेवून घडवण्याचा निरंतर प्रयत्न करीत होते मल्हारराव, पण सगळं मुसळ केरात.

पुढे राघोबादादा पेशव्यांनी होळकर, शिंदे या सरदारांसह पाऊन लाख फौज सोबत घेऊन खंडणी वसूल करण्यासाठी सूरजमल जाटावर आक्रमण केले ते साल १४५४ होते. जाटही चिवट होता. द्रव्य, फौज याने बळकट होता. तडजोड होणार नाही हे ताडून तो मुलुखाचा बंदोबस्त करत कुंभेरीच्या मजबूत किल्ल्यात तळ ठोकून बसला. हा किल्ला शत्रूकडून अभेद्य आहे हे त्याला माहीत होते. पेशवे यामुळे अधिकच क्रुद्ध झाले. त्यांनी २० जानेवारी १७५४ ला कुंभेरीच्या किल्ल्याला वेढा घातला. त्यावेळी मल्हारराव आपल्या संपूर्ण कुटुंबासह तेथे होतेच.

वेढा आवळला, मोर्चे लावले, तोफा रोखल्या पण तिकडे सूरजमलाचे सैन्यही तयार होते. त्यांची किल्ल्याची मोर्चेबांधणी पक्की होती. बुरुजांवर तोफ चढवून तयार होत्या, दारूगोळ्यांची तर कमतरताच नव्हती. दोन्ही बाजूंनी घनघोर

युद्ध सुरू झाले. जाटाच्या ताकदीपुढे नवख्या भागात मराठे खचू लागले. किल्ल्याभोवती रेतीच रेती असल्याने मराठ्यांना तो उडवण्यासाठी सुरुंग लावता येईना. तोफांचा माराही अचूक होईना, जाट सुरक्षित होता. आठवडा गेला, पंधरवडाही सरला. कोणीच हारत नव्हते. जाटही शरण येत नव्हता अन् मराठे वेढा उठवत नव्हते. अशा स्थितीतच दीड महिना उलटून गेला. अनुभवी मराठे आता हतबल झाले होते. हा पेच सुटत नव्हता पण नियतीने वेगळाच पेच मल्हाररावांपुढे उभा केला. पेच कसला, दुर्दैवाचा घातच तो.

१७ मार्च १७५४ हा दिवस होळकर कुटुंबासाठी काळाचा घालाच ठरला. सकाळपासून मल्हाररावांना उदास वाटू लागले होते. अशुभाची पाल मनात चुकचुकली होती. युद्धाला जाण्यापूर्वी ते खंडेरावांच्या डेऱ्यात पोहोचले पण रात्रीची नशा त्यांची अजूनही उतरली नव्हती. मल्हाररावांना काळजी वाटू लागली. युद्धाच्या ठिकाणी किती नशा करावी याचे काही तारतम्य आहे की नाही, अशी नशाच घात करेल मग कोणाला बोलणार? या विचारांनी ते अस्वस्थ होत निघून गेले.

युद्ध सुरू होते. मध्यान्ह समयी भोजन घेऊन खंडेराव रणभूमीकडे निघाले पण अजूनही नशेत होते. अडखळत पाऊल टाकत ते पुढे चालू लागले. सेवकांनी तो अवतार पाहून मोर्चावर न जाण्याचा सल्लाही दिला पण ऐकतील ते खंडेराव कसले? चित्त थाऱ्यावर नाही, सभोवती नीट लक्ष नाही, नशा मी म्हणत होती अन् तेवढ्यात फिरत्या तोफेचा गोळा सरर्कन आला आणि खंडेरावांचा वेध घेतला. क्षणार्धात ते खाली कोसळले अन् गतप्राण झाले. सर्वत्र हलकल्लोळ माजला.

डेऱ्यातील मल्हाररावापर्यंत ही दुख:द वार्ता पोचली आणि शूर बापाच्या ह्दयावर वज्राघातच झाला. दुःखातिरेकाने ते किंचाळू लागले, काय....ऽ माझा खंडू गेला? आपला एकुलता एक तरुण मुलगा असा अचानक गतप्राण झाला तो शोक त्यांच्या उरात मावेना. अश्रूधारा वाहू लागल्या. राघोबादादा, दत्ताजी शिंदे,

जयाजी शिंदे सह सर्व मातब्बर सरदार आले. मल्हाररावांच्या आक्रोशापुढे तेही सुन्न झाले. कोणीच सांत्वन करू शकेना तेव्हा वयाने लहान असले तरी पेशवे असलेल्या राघोबादादांनी कसेबसे शब्द जुळवत समजूत घातली. नातवाकडे पाहण्याचा आशेचा किरण चमकवला; पण पुत्रशोक काही कमी होईना. तेवढ्यात आणखी एक बातमी मल्हाररावांच्या हृदयाचा ठाव घेऊन गेली की अहिल्या सती जात आहे. ते आहे तसेच ताडकन् सुनेकडे निघालेले मल्हारराव दुःखातिरेकानेच म्हणाले, ''बाई, माझ्या आयुष्याचा उन्हाळा करतेस की काय? अगं माझ्या दौलतीचा कारभार तूच माझा खंडू समजून मी तुझ्यावर घालत होतो... तू माझे पाठीवर आहेस, तर अहिल्या मेली खंडू आहे, हा मला भरवसा. बाई, जरा माझ्या म्हाताऱ्याचा, तुझ्या लहानग्या पोरांचा विचार येऊ दे, माझी तुला कीव येऊ दे, तू तरी जाऊ नकोस गं...''

मल्हाररावांची ही व्याकूळ विणवणी ऐकून त्या गलबलून गेल्या, पती नंतर सती जायचा हा धर्म पाळावा की सासऱ्याची आज्ञा या धर्मसंकटात त्या सापडल्या. दोघी सवती सती जात होत्या, मग आपणही जायला हवं, पुण्य पदरात पाडून घ्यायला हवं असा एक विचार त्यांच्या मनाला शिवला पण दुसऱ्याच क्षणी विवेकाने विचार केला की, होळकरांच्या वंशाची मी जननी. मुलंही अजून लहान आहेत. सवतींना मुलबाळ नाही, पुत्रवती स्त्रीनं लहान मुलं असताना सती जाणं योग्य आहे का? ते उद्याचे राज्यकर्ते आहेत, मग त्यांना कोण घडवणार? सासऱ्याचे मत योग्यच आहे. दौलतीचा, रयतेचा विचारही केला पाहिजे. असा विचार करत त्यांनी सासऱ्यांना प्रणाम करत त्यांचा शब्द पाळत असल्याचे सांगितले. मल्हाररावांना थोडी शुद्ध आली. जड अंत:करणाने ते पुन्हा डेऱ्यात गेले.

सायंकाळी अंत्ययात्रेची सुरुवात झाली. खंडेरावाच्या दोन पत्नी सती जाणार होत्या शिवाय दोन नाटकशाळा आणि सात रखेल्याही. या सगळ्या चितेवर बसल्या, त्यांच्या मांडीवर खंडेरावांचे कलेवर दिले गेले, ब्राह्मणांचे मंत्रोच्चार

सुरू झाले, चितेला अग्नी दिला गेला. जनसमूहातून सतींचा जयजयकार आणि सजीव देहांच्या अग्निसात होतानाच्या किंचाळ्या हृदयाला चिरून जात होत्या.

अहिल्याबाईंचा संसार, कुंकवाचा धनी, सुखाचा कर्ता संपला होता. शुभ्र वस्त्र नेसून शून्यात पाहत आपल्या जेमतेम वीस वर्षाच्या संसाराचा पट त्यांच्या डोळ्यासमोरून जात होता. हुंदके देत भावी राज्याच्या कल्याणासाठी अश्रूतून एक मार्ग पुसटसा दिसत होता. सौभाग्य हिरावलेल्या परमुलुखात उत्तरक्रिया पार पाडून रंगहीन आयुष्याची तुटपुंजी शिदोरी पांढऱ्या पदरात बांधून पाऊलं इंदूरला परतू लागली. त्या मुलुखात जातानाच्या सौभाग्याच्या पाऊलखुणा आता मात्र वैधव्याच्या जड जड पदचिन्हांनी दबून जात होत्या. कुंभेरीच्या किल्ल्याने सुखाचा कुंभ, सौभाग्याचा घट टचकन फोडून टाकला होता. मडकं फोडून संसारालाव तिलांजलीही द्यायला लावली होती. दोन्ही हाताशी, गेलेल्या सौभाग्याच्या धन्याच्या सजीव खुणा प्रश्नार्थक नजरेने अहिल्येला किती प्रश्न विचारत होत्या, त्यांची उत्तरे अहिल्याबाई स्पर्शाच्या संवेदनेतूनच देत होत्या. करपलेल्या, हरपलेल्या संसाराच्या नाजूक कळ्या वाचवण्यासाठी ऊन्हं अंगावर झेलत होत्या. अहिल्याबाई इंदूरची वाट चालत होत्या...

■

# ५) मल्हाररावांच्या तालमीत अहिल्येची जडणघडण

मल्हारराव होळकर हे मराठ्यांचे मातब्बर सरदार होते. त्यांच्या तलवारीचं पाणी अनेक लढायांमध्ये चमकलं होतं. पेशव्यांचा त्यांच्यावर विश्वास होता. पेशव्यांची मर्जीही त्यांनी शूरपणाच्या दौलतीवर कमावली होती. कोणताही राजकीय वारसा नसताना मल्हाररावांनी शूरपणानं होळकरांचं साम्राज्य उभं केलं होतं, त्यांच्या युद्धकौशल्यामुळे अनेक राजे त्यांची मदत मागत असत.

होळकर घराणं हे जुन्या काळी माळवा व नेमाणे भागातील होतं. त्यांचे पूर्वज मथुरेतील होते. नंतर ते वाफगावी व त्यानंतर ते फलटण भागातील नीरा नदीकाठच्या होळ या गावी गेले आणि होळकर झाले. मल्हाररावांच्या वडिलांचे नाव खंडोजी तर आईचे नाव जिवाई होते. मल्हार तीन वर्षांचा होत नाही तोच खंडोजी मरण पावले. लहानग्या मल्हारीचे पितृछत्र कायमचे हरवले. संधिसाधू नातेवाईकांनी खंडोजीचे घरदार, जमीनजुमला इत्यादी संपत्ती हडप केली. मल्हारी व त्यांची आई उघड्यावर पडले.

जिवाईला कोणाचाच आधार नव्हता. अशात तिला माहेरी जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. ती मल्हारला घेऊन खान्देशातील तळोदे गावात भोजराजं या आपल्या भावाकडे आश्रयाला आली. भोजराजाच्या हाताखाली पंचवीस सरदारांचे एक छोटे पथक होते. मामाकडे आलेला मल्हारी मेंढरे चारी. उन्हाळ्यात दगडाची उशी करून झोपत असे. असाच एकदा तो झोपला असता त्याच्यासाठी भाकरी घेऊन आलेल्या जिवाला विलक्षण दृश्य दिसले. झोपलेल्या मल्हारीवर मोठ्या नागाने आपल्या फण्याने आडोसा करत ऊन अडवले होते. थोड्याच वेळात नाग निघून गेला.

जिवाईच्या मनातून हा प्रसंग जातच नव्हता, जाणत्या ब्राह्मणाकडे तिने लगोलग विचारणा केली. ते म्हणाले, ‘‘बाई, तू मोठी भाग्याची. तुझा मुलगा

घराण्याचे नाव उज्ज्वल करील. तो पृथ्वीपती होईल. मात्र वयाच्या दहा वर्षापर्यंत त्यास जपले पाहिजे.''

या शुभशकुनानंतर मामाने त्याला मेंढरे चारू दिली नाहीत. लवकरच आपली मुलगी गौतमाबाईचे लग्न भाचा मल्हारीशी लावून दिले. इतकचं नाही तर आपल्या पथकात त्याला छोटंसं पदही दिलं. मल्हारीने आपले शौर्य गाजवत खान्देशातील अनकाई नावाचा किल्ला जिंकला. पुढे पेशवे आणि निजाम अत्य मुल्क यांच्यात लढाई झाली त्यात मल्हारीचा पराक्रम दिसून आला.

एकदा तर मल्हारी ज्यांच्या सैन्यात एका पथकाचा प्रमुख होता त्या कदम बांड्याच्या सैन्याची एक तुकडी आणि खुद्द बाजीराव पेशव्यांच्या तुकडीत तापी नदीकाठी एक झटापट झाली. त्यात मल्हारीचे लढवैय्या रूप समेटकौशल्य दिसून आलं. बाजीराव पेशव्यांच्या नजरेत ते भरलं. त्यांनी कदम बांडेकडे मल्हारीची मागणी केली. त्यानेही मोठ्या खुशीने मल्हारीला पेशव्याच्या हाती सोपवलं. जून १७२५ ला थोरल्या बाजीराव पेशव्यांनी लगेचच ५०० स्वारांची मनसबदारी मल्हारीला दिली. १७३१ मध्ये माळवा मिळवताना तर १७३८ मध्ये भोपाळजवळ हैदराबादच्या निजामाशी लढताना मल्हाररावांच्या तलवारीचे पाणी चांगलेच चमकले होते. म्हणूनच माळवा प्रांत हाती आल्यावर त्यांच्यावर देखरेखीसाठी मल्हारबाचीच नेमणूक झाली. १७४५ पर्यंत मल्हारबाच्या ताब्यातील मुलुखाचे उत्पन्न साडेचौऱ्याहत्तर लाख रुपये एवढे मोठे होते. शून्यातून आभाळ कवेत घेणारे मल्हारराव होळकर मराठा सल्तनीतले मानाचे सरदार होते.

दौलतीचा कारभार सांभाळत कुटुंबाला आधारवड ठरलेल्या मल्हाररावांना मुलगा खंडेरावाची साथ मात्र मिळाली नाही. बेताल वागणारा एकुलता एक मुलगा पाहून मल्हाररावांच्या काळजाचं पाणी पाणी होत होतं. खंडेराव कधी अफुच्या नशेत तर कधी रखेल्यांच्या कुशीत निपचित पडत असे. खंडेरायाच्या अशा बेजबाबदार वागण्याने मल्हाररावांना काळजी पोखरू लागली होती. तेवढ्यात पुण्याला जाताना चौंढी गावी तळ पडला आणि चुणुकदार एका मुलीनं मल्हाररावांच्या काळजाचा ठाव घेतला. ही करारी, बाणेदार मुलगीच आपल्या बेताल मुलाला मार्गावर आणू शकेल या विचाराने त्यांनी तिला आपली सून

केली. कर्तबगारी व सद्गुणांनीच अहिल्येच्या रूपानं होळकरांच्या घरात पदार्पण केलं. मल्हाररावांची सुनेवर फार प्रीती व मर्जी होती. दौलतीचं भविष्यच त्यांना अहिल्येच्या रूपात गवसलं होतं.

नुकतचं लग्न झालेली अहिल्या सासू गौतमाबाईंच्या करारी वर्तनातून, धार्मिकतेतून खूप काही शिकू लागली. कारभारावर लक्ष ठेवू लागली. भल्या पहाटे उठून ती घरच्या जबाबदाऱ्या न सांगताच सांभाळू लागली. धर्मकार्यात मन ओतून मंगल आचरण करू लागली. सासू-सासऱ्यांची कामे बिनबोभाट करू लागली. तिच्या या समंजस वागण्याने सासू-सासऱ्यांच्या हृदयात अहिल्येनं जागा मिळवली. दोघांच्याही आनंदाला पारावार उरला नव्हता. मल्हाररावांनी तर अहिल्येच्या रूपात होळकरांचं कर्तृत्वच हेरलं होतं. तिला घडवायचं असं त्यांनी निश्चित केलं. कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष ते तिला धडे देऊ लागले.

तरी पण पुत्रप्रेम वेडं असतं, खंडेरावाला जहागिरी मिळाल्यावर मल्हारराव आनंदाच्या भरात त्याला हाताखाली तयार करावं या विचारानं त्याला समजून सांगू लागले. लढाईला गेल्यावर ते मुलाला लढाईच्या मसलती; युद्धातले डावपेच उलगडून दाखवू लागले. गनिमी कावे, व्यूह कसे खेळावे, कसे जिंकावे हे ते पोराला पोटतिडकीने सांगू लागले, पण दिव्याखाली अंधार म्हणतात तसेच होत होते. खंडेरावाच्या डोक्यात ते काही शिरत नव्हते. पण तल्लख बुद्धीची खंडेरावाची बायको मात्र कानात प्राण आणून शब्दन् शब्द ऐकत असे. ते सारं ज्ञान, अनुभवाचे बोल ती हृदयात साठवून ठेवत असे. नवनवीन गोष्टी शिकण्याची तिची आवड, सगळं जाणून घेण्याची तिची धडपड मल्हाररावांना नवी उभारी देत होती. आपल्या सुनेबद्दल आत्मीयता दिवसेंदिवस वाढतंच होती, ते मोठ्या प्रेमाने कधी कधी तिलाही अनेक गोष्टी समजून सांगू लागले. ती सारं मृत्तिकेप्रमाणे सहजच ग्रहण करू लागली. काही बाबी ती आपल्या अनुभवातून शिकू लागली, काही जाणत्या माणसांकडून. मल्हाररावांचा विश्वास ती संपादन करू लागली. अहिल्यारूपी हिऱ्याला पैलू पडत होते. तो हिरा उत्तम घडत होता. हळूहळू आता तिच्यावर राजकाजाच्या काही जबाबदाऱ्या मल्हाररावांनी सोपवायला सुरुवात केली. त्या जबाबदाऱ्या ती तत्परतेनं पूर्ण करू लागली. तिचा उरक पाहून आणखी

मोठमोठ्या जबाबदाऱ्या ते तिच्यावर सोपवू लागले अन् ती विश्वासाने व नेटाने पार पाडू लागली. मनोमन सुखावून या सासऱ्याच्या मनात बोल उमटत होते, ''पोरी, तू तर माझ्या ल्योकापेक्षाही खूपच सरस आहेस बघ...''

काही दिवसांतच होळकरांच्या खजिन्याच्या किल्ल्या अहिल्याबाईंच्या ताब्यात आल्या. त्यांचा लौकिक, दबदबा पंचक्रोशीत वाढू लागला. भोवतालचे राजेही तिच्याकडे अदबीने पाहू लागले. मल्हाररावांची सून घराण्याचा वारसा चालवण्यास खंबीर असल्याची खात्री इतरांनाही पटू लागली. अहिल्या मात्र मल्हाररावांची आज्ञा कधीच मोडत नव्हती. मल्हाररावांची सत्ता उत्तरेस जसजशी पसरू लागली तसतशी अहिल्याबाईंची मदत त्यांना होऊ लागली. दूरवरच्या राजकारणात खंडेरावाला गुंतवावं या विचारानं मल्हाररावांनी काही मोहिमा त्यांच्यावर सोपवली पण त्यांच्यात ती धमकंच नव्हती. मल्हाररावांच्या पूर्णपणे लक्षात आलं की आता मात्र सारी भिस्त अहिल्येवरच आहे.

खंडेराव नशेत तोफेच्या तोंडी पडल्यानंतर सती जाण्यास निघालेल्या अहिल्येला थांबवताना, ''बाई, माझ्या आयुष्याचा उन्हाळा करतेस की काय?'' या वाक्यातून अहिल्येचं त्यांच्या आयुष्यातलं स्थान, तिचं असणंच मल्हाररावांच्या दुःखावरची फुंकर ठरलं. सासऱ्यांच्या व्याकूळ विनंतीचा मान अहिल्याबाईंनी राखला. पती निधनाचं दु:ख गिळत अहिल्याबाई सासऱ्यांसाठी, दौलतीसाठी, प्रजेचा सांभाळ करण्यासाठी पुन्हा ताठपणे उभ्या राहिल्या.

आपल्या एकुलत्या एक मुलाची उत्तरक्रिया संपवून अहिल्याबाईंबरोबर जड पावलांनी मल्हारराव इंदूरला परतले. दु:खीकष्टी मनाने रिक्त हस्ते परतलेल्या मल्हाररावांचे आता एकमेव आशास्थान होते, ते म्हणजे अहिल्याबाई. अहिल्याबाईंनाही भक्कम आधार होता तो मल्हाररावांचाच. डोंगराएवढे दु:ख बाजू ठेवत दोघांनाही सावरावे लागले. कारभारात लक्ष घालावेच लागले. आता मल्हाररावांनी पुन्हा मोहिमांना सुरुवात केली. चौथाई, सरदेशमुखीचे उत्पन्न वसूल करण्याकरिता मोहिमेवर जावे लागे तसेच अंमलाखालचा मुलुखं राखून ठेवण्यासाठीही मोहिमांची आवश्यकता होतीच. त्यामुळे ते दूरदूरच्या प्रांतात जाऊ

लागले. आता मुलुखी कामभाराची संपूर्ण जबाबदारी अहिल्याबाईंना पेलावी लागली. दूरदेशी असलेल्या मल्हाररावांचे चित्त मात्र सुनेजवळ असायचे. तिच्या कौतुकाने ते विचार करत की, माझी सून सद्गुणी आहे, कर्तबगार आहे. दौलतीचा सारा भार तिच्यावर सोपवायला काहीच हरकत नाही. तिच्याशिवाय कोणीच खंबीर नेतृत्व आमच्या नंतर दिसत नाही. पुढे जे होईल ते ईश्वरेच्छा समजून स्वीकारू. त्यांनी संपूर्ण कारभार तिच्यावर सोपवला आणि दुरूनही आपण मात्र तिला मार्गदर्शन करीत राहिले.

अहिल्याबाई मल्हाररावांच्या पत्रांतील उपदेशातूनही खूप घडल्या. शहाण्या झाल्या. त्यांची सतत तिला पत्रे येत असत. पत्रातून ते कधी तिला आज्ञा देत तर कधी महत्त्वाचा सल्ला. कधी मार्गदर्शन असे तर कधी सावधानगिरीचा इशारा. सासऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार तीही कारभार चोख पाहत असे. अनुभवी कार्यकुशल, शूरवीर व जाणत्या सासऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्याबाईंमधला प्रशासक, प्रजारक्षक, मुलुखरक्षक चांगलाच तयार होऊ लागला होता.

अधून मधून त्या मल्हाररावांबरोबर मोहिमेवरही जाऊ लागल्या. १७५९ मध्ये खंडणी वसुलीसाठी जयपूरला त्या त्यांच्याबरोबर गेल्या होत्या. पुढे शिंदेंच्या बोलावण्यावरून दोघेही दिल्लीला गेले. सल्लामसलती, खलबतांमधून राजकारणाचे धडे त्या नकळत गिरवत होत्या. मल्हारराव पेशव्यांबरोबरच्या मोहिमेमध्येही बरेचदा गुंतलेले असत तेव्हा घरची व दौलतीची दोन्ही कामे ते सुनेवर सोपवून जात असत. त्यावेळी घरची कामे, वसुली, फौजेची व्यवस्था, उत्तरेकडील शत्रूंच्या हालचाली इ. अनेक बाबींविषयी ते सुनेला विश्वासाने लिहीत असत, समजावून सांगत असत आणि त्याही मोठ्या नेटाने त्या सर्व सूचनांचे पालन करीत असत. मोहिमांवर गेलेल्या सरदारांना जातीने मदत करीत असत.

सासऱ्यांच्या कचखाऊ वृत्तीची चर्चा मुलखात होत असतानाही त्यांनी कधी सासऱ्या विरोधात 'ब्र' शब्दही काढला नाही. इतिहासात मल्हाररावांच्या

पराक्रमाबरोबरच काही अयोग्य निर्णयांनी गालबोट लागलेले दिसून येते. थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या कारकीर्दीत उदयाल्या आलेल्या सरदार मल्हाररावांची वृत्ती स्वतंत्र, चढेल पणाचीही होती. नानासाहेब पेशव्यांच्या काळी ते अधिक शिरजोर झाले होते. पेशव्यांच्या दारी आपले महत्त्व टिकावे म्हणून मराठी दौलतीच्या शत्रूंचा पूर्ण नायनाट न करता त्यांना जिवंत ठेवायचे ही त्यांची विचारसरणी होती. म्हणूनच दिल्लीच्या क्रूर कारस्थानी वजीर नजीबखान रोहिला व अफगाणचा बादशहा अहमदशहा अब्दाली यांच्या विरुद्धच्या मोहिमा त्यांनी नेटाने चालविल्या नाहीत.

धोरणीपणाच्या त्यांच्या अभावामुळे ते स्वतः व मराठी सत्ता अनेकदा संकटात सापडली होती. मराठ्यांच्या सत्तेला आणखी एक जबरदस्त हादरा बसला तो पानिपताच्या लढाईत. यात मराठ्यांचा पराभव झाला. मोठमोठे सरदार कामी आले. आघात सहन करण्यापलीकडचा होता. क्षती भरून न येणारी होती. यातून मल्हारराव सुखरुप परत आले पण त्यांच्याबद्दलचे अनेक प्रवाद लोकात पसरले होते. पाणिपतच्या घनघोर लढाईतून ऐनवेळी आपली फौज घेऊन निघून गेल्याने पराभवाला तेही एकच कारण ठरले होते.

या प्रवादांचा ताप कुटुंबावरही पडत होता. गौतमाबाई अस्वस्थ होत होत्या पण अहिल्याबाई मात्र शांत होत्या. त्या सासऱ्यांविरुद्ध काहीच बोलू व ऐकू इच्छित नव्हत्या.

पानिपताच्या युद्धामुळे मराठ्यांच्या आर्थिक तिजोरीवर विलक्षण ताण पडला होता. होळकरांची तिजोरीही त्याला अपवाद नव्हती. तरीही न डगमगता मल्हाररावांच्या सल्ल्याने मोठ्या धैर्याने त्यांनी आर्थिक संकटातून मार्ग काढला. डबघाईला आलेली अर्थव्यवस्था सावरली. दौलतीचा कारभार काटेकोरपणे सांभाळणे सुरूच होते.

माधवराव पेशव्यांच्या काळात त्यांच्या करड्या शिस्तीत मल्हाररावांना वेडेवाकडे निर्णय घेता आले नाहीत. एकदा राक्षसभुवनला हैदराबादच्या निजामाशी झालेल्या लढाईत शत्रूने रघुनाथ पेशव्यांना कैद केले. त्यांच्या

सुटकेसाठी माधवराव सरसावले तेव्हा मल्हाररावांनी माधवरावांना चुकीचा सल्ला दिला की, आपण परत जाऊ, पुण्याचे राज्य करू. तेव्हा माधवरावांनी खोचकपणे म्हटले, ''मल्हारकाका, भाऊसाहेबांना आपण पानिपतात बुडविले असे ऐकत होतो, पण आज ते डोळ्याने पाहिले.'' हा पेशव्यांचा घाव मल्हाररावांच्या वर्मी लागला. ते ताबडतोब ताळ्यावर आले.

पुढे रघुनाथरावांनी खुद्द माधवरावांनाच नजरकैदेत ठेवल्यावर माधवरावांना पैशाची गरज लागली तेव्हा सामंजस्याने मल्हाररावांनी ती भागवली. खजिना अहिल्याबाईंच्याच ताब्यात होता. अर्थातच अहिल्याबाईंनी तात्काळ ती मदत पेशव्यांपर्यंत पोचवली. मल्हाररावांच्या चुकीच्या निर्णयांचा परिणाम त्या स्वत:च्या निर्णय शक्तीवर होऊ देत नव्हत्या. मात्र त्यांचे राजकारणातील चातुर्य, शौर्य त्या अनुकरत होत्या.

मल्हारराव कधीकधी प्रत्यक्ष युद्धाशी संबंधित कामेही अहिल्याबाईंना सांगत असत. अलाहाबादचा किल्ला इंग्रजांनी घेरल्यावर त्यांचा संघर्ष अटळ आहे हे लक्षात घेऊन त्यांनी अहिल्याबाईंना निरोप पाठवला, ग्वाल्हेजवळ जाऊन लष्कराची तयारी करावी. दारूगोळ्याचा कारखाना लावून तोफखाना सिद्ध ठेवावा. हे पत्र मिळाले तेव्हा अहिल्याबाई तीर्थयात्रा करीत होत्या. ती त्यांनी लगेच आटोपती घेत कामाला सुरुवात केली. ग्वाल्हेरला तोफखाना ठेवायला योग्य जागा न मिळाल्याने परिस्थिती पाहून तो सिरोजला ठेवण्याचा निर्णय स्वत: अहिल्याबाईंनी घेतला. सर्व तयारी करून मग मल्हाररावांना कळवले. तोफखाना सज्ज होता आणि गोहदचे राज्य तेथून जवळच होते. मल्हाररावांच्या मनात ते राज्य घ्यायचे होते हे अहिल्याबाईंना ज्ञात असल्याने व लढाईचे डावपेचही माहीत असल्याने त्यांनी स्वतःच्या अधिकारात निर्णय घेऊन गोहदकरांची एक गढी काबीज केली. काही दिवसांनी मल्हाररावही गोहद पाठी लागले. पण आता हळूहळू मल्हाररावांची तब्येत ढासळत चालली होती. आजारपण त्यांची पाठ सोडत नव्हते. १७६५ मध्ये ते विश्रांतीसाठी ग्वाल्हेरजवळच्या अलमपूरला आले. तेथेच २० मे १७६६ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

अहिल्याबाईंचा आधारवड गेला. त्या तर एकदम कोसळल्याच. निराधार झाल्या, त्यांना कमालीचे दुःख झाले. त्यांचे छत्रच हरपले होते. ज्यांच्या शब्दाखातर त्या जिवंत होत्या तो दिलासा देणारा शब्दप्रमुख आज शांत झाला होता. वडील, मार्गदर्शक, कर्ता, योद्धा, कुलनायक, सासरे, आधारदाते अशा साऱ्याच भूमिका अहिल्येसाठी त्यांनी वठवल्या होत्या. मराठ्यांचे शूर सरदार गेले पण अहिल्येचे आता सर्वस्वच गेले होते. तिचे गुण जाणणारा, कौतुक करणारा, मायेची पाखर घालणारा वडिलधारा हातच हिरावून गेला होता. अहिल्या घडली ती मल्हाररावांमुळे. मल्हाररावांनाही दिलासा दिला, आचरणाचे समाधान दिले, आनंद दिला, दौलतीला आश्वस्त केले ते अहिल्याबाईंनीच.

भारतीय इतिहासात अशी आदर्श सासरा व सुनेची जोडी पाहावयास मिळत नाही. यांचं समीकरणच दौलतीच्या सुखाला कारण होतं. दोघांनाही व्यक्तिगत दुःखं खूप मोठी होती, पण रयतेच्या सुखासाठी ही दुःख केव्हाच गिळून त्यांना तिलांजली देऊन ही जोडी मरेपर्यंत धडपडत होती. अहिल्येचा रत्नपारखी हिरावला गेला होता. पाठीवरची शाबासकी कायमची लुप्त झाली होती. खांद्यावरचे ओझे आणखी वाढल्या सारखे झाले. सासू गौतमाबाईंची जबाबदारी तर होतीच, साऱ्या कुटुंबाला धीर देत सावरण्याची जिम्मेदारीही तिच्यावरच आली.

दुःख करावं की सासऱ्यांचं दौलतीचं स्वप्नं साकारावं, या द्वंद्वात तिने पुन्हा दुःखाला बाजूला सारत ज्यांनी आपल्याला घडवलं त्यांच्या स्वप्नाच्या वाटेवरती चालणंच पसंत केलं. मल्हारराव देहाने गेले तरी विचारांनी, मार्गदर्शनाने ते अहिल्येच्या पाठीशी कायम होते. अहिल्येच्याही निष्ठा त्यांच्या चरणी सदैव लीन होत्या. धन्य ते मल्हारराव आणि धन्य त्यांची आदर्श सून अहिल्याबाई. हे दोघेही पिढ्यान् पिढ्या लोकांना उत्तम उदाहरण म्हणून कायम स्मरणात राहतील हे निश्चित.

■

# ६) पुत्राकडून निराशा

**‘छिद्रेष्वनर्था : बहुलीभवन्ति’** असे म्हणतात. एक संकट आलं की चहूबाजूंनी संकटे येऊ लागतात. अहिल्याबाईंचं जीवनही संकटाच्या अग्नीतून झळाळलेल्या सुवर्णासम होतं. एका नंतर एक येणाऱ्या संकंटांनी ते तापून सुलाखून निघत होतं. त्यांच्या जीवनात काही अग्निदिव्यं, काही नव्हे बहुतांश अग्निदिव्ये ही स्वकीयांच्या दुःखानेच पार पाडावी लागलेली होती. ज्या साथीदाराच्या भरवशावर त्या चौंढीतून दूरदेशीच्या मुलुखात आल्या होत्या, त्यांचं सुख काही त्यांना लाभलं नव्हतं. त्यानंही म्हणावं तसं अहिल्येकडे लक्ष दिलं नव्हतं. पुढे पोटी आलेल्या एकुलत्या एक होळकरांच्या वारसदाराने तरी जबाबदारीने वागणं अपेक्षित होतं. पण तेही दैवाला मान्य नव्हतं.

१७४५ साली देवाळपूर ग्रामी प्रसूत होऊन अहिल्येची कुस उजवली तो पुत्र मालेराव कुचकामी निघाला. मालेराव जवळजवळ दहा वर्षांचा झाला असेल तेव्हा सगळ्यांना वाटले की, आता मालेरावाने जबाबदारी ओळखली पाहिजे. तोच आता होळकरांच्या दौलतीचा वारस होता. त्याने कर्तबगारीने सारा कारभार सांभाळावा अशी सर्वांचीच इच्छा होती. पण दैवाला काही वेगळेच मान्य होते.

जबाबदारीचा मागमूसही मालेरावला नव्हता. त्याची दुनीया न्यारीच होती. पशु सृष्टीत तो रमत असे. वाघ, सिंह, हत्ती, घोडे हेच त्याचे जिवलग होते. त्यांच्याबद्दल त्याला खूप प्रेम, जिव्हाळा होता. नर्मदेच्या काठी त्याने हत्तीपाळाही बांधला होता. त्यांच्या जलक्रीडा पाहण्यात तो दिवसेंदिवस घालवत होता. तो केवळ वयाने वाढत होता.

मल्हारराव कधीकधी त्याला समज यावी म्हणून आपल्या बरोबर त्याला मोहिमांवर नेत असत पण तेथेही त्याचे अजिबात लक्ष लागत नसे. लग्नानंतर त्याला जबाबदारींची जाणीव होईल या विचाराने मल्हाररावांनी त्याचे दोन विवाहही करून दिले. पण सारंच व्यर्थ. अहिल्याबाई देखील त्याला सोबत घेऊन

कामे करू लागल्या, कारभाऱ्यांकडून कामे करवून घेऊ लागल्या पण काहीच फरक पडला नाही.

होळकरांच्या घरातले वातावरण इतके धार्मिक होते, दानधर्म सतत चालत असायचा, अशा वातावणात वाढलेला असूनही मालेराव विकृत होता. दारी आलेल्या याचकांच्या वस्त्रांत, जोड्यांत, भिक्षापात्रांत तो विंचवासारखे विषारी प्राणी सोडून ठेवायचा. त्यांनी याचकांना दंश केला की वेदनेने विव्हळणाऱ्या त्यांना पाहून त्याला आसुरी आनंद होत असे. या त्याच्या वर्तनामुळे अहिल्याबाईंना मान खाली घालावी लागे. एवढ्या कर्तबगार बाईच्या पोटी हा असा वरवंटा आल्याने प्रजेलाही दु:ख होई. मल्हाररावांनंतर माळव्याच्या सुभेदारीचे काम अहिल्येचा पुत्र मालेरावांकडे आले. ३ जून १७६६ रोजी पेशव्यांच्या आदेशाने अधिकारवस्त्रे त्याने धारण केली तेव्हा तो २१ वर्षाचा होता. परंतु कारभार सांभाळायचे गुण नव्हते. अत्यंत बेजबाबदार होता. प्राणी बाळगणे, त्यांचे खेळ पाहणे, हत्ती, चित्ते, वाघ घेऊन गावोगावी हिंडण्याशिवाय मालेरावाला कशातच रस नव्हता. घरातली परिस्थिती, आईचा कारभार, तिचं दुःख, तिच्या वेदना, दौलतीच्या कारभाराची निकड हे त्याला काहीच कळत नव्हतं. तोही आपल्या वडिलांसारखाच लहरी आणि व्यसनीही होता. त्याच्या प्रवृत्ती वेगळ्या होत्या, त्याचाही वकूब बेताचाच होता. जबाबदारीची जाणीव तर नाहीच पण पुसटशी कल्पनाही त्याला नव्हती. त्याने कधी प्रयत्नच केला नाही की जबाबदारी खांद्यावर पेलावी. विस्तारलेल्या होळकर साम्राज्याला अजिबात पेलू शकणार नाही याची कल्पना अहिल्याबाईंबरोबरच पेशव्यांनाही होती. म्हणूनच मालेरावाला केवळ नामधारी बनवून पेशव्यांनी सारी भिस्त अहिल्याबाईंवरच टाकली होती.

अहिल्याबाईंनाही पूर्ण जाणीव असल्याने आपल्यालाच हा दौलतीच्या कारभाराचा गाडा ताकदीनिशी ओढावा लागेल, हे ओळखून त्या पुन्हा उभ्या राहिल्या. या सर्व विपरीत परिस्थितीचा परिणाम असा झाला की अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाला वाव मिळाला. त्यांच्यातील कर्तबगार स्त्री घडत

गेली. अहिल्याबाईंची कीर्ती सर्व दूर पसरत गेली. होळकरांची पुण्याई वृद्धिंगत होत गेली.

पेशव्यांनी तर पत्राद्वारे, कारभार तुम्हीच पाहावा असे लिहून कळवले होते, त्यावरून अहिल्याबाईंवर पेशव्यांचा किती विश्वास होता हे लक्षात येतेच. मालेरावांचे वर्तन अहिल्याबाईंना मनात बोचऱ्या काट्याप्रमाणे सलत होते. मुलाच्या नाकर्तेपणाचे दुःख त्या मातेच्या काळजाला पोखरून राहत होते. तितक्यात अचानक काळाने आणखी एक घाला घातला. २७ मार्च १७६७ रोजी मालेराव या जगाचा निरोप घेऊन अचानक मृत्यूमुखी पडला.

अहिल्याबाईंच्या हृदयावर हा आघात म्हणजे न पेलवणारे प्रचंड दुःख होते. सातत्याने कोसळणाऱ्या दुःखांमुळे त्या बधीर झाल्या होत्या. पोटचा गोळा डोळ्यादेखत ऐन तारुण्यात गेला, ही उणीव या जगातल्या कोणत्याच गोष्टीने भरून निघणारी नव्हती. अहिल्याबाईंची सतत शुद्ध हरपू लागली. सावरणार तरी किती वेळा आणि कसं? मल्हाररावांनाही तरण्याताठ्या मुलाला अग्नी देण्याची वेळ आली होती. अन् अहिल्येलाही आपल्या एकुलत्या एक तरुण मुलाला गमावण्याची वेळ आली. त्याचे दिवसपाट करण्याची वेळ आली होती. त्या आतून इतक्या भिजल्या होत्या की दुःखातिरेकाने डोळेही सुकून गेले होते. साऱ्या आशा मावळल्या होत्या.

आपल्या जीवाचा तुकडा डोळ्यादेखत कायमचा नाहीसा झाला होता. रिकाम्या हातात मालेरावचा चेहरा अन् सारं बालपण त्यांच्या डोळ्यासमोर तरळत जात होत. संसारवेलीवरचं एक फूल अकाळी कोमेजलं होतं, आईच्या हृदयाला कायमच सुकवून. ज्याने आईपण बहाल केलं तोच आईला पोरकं करून दूरदूर निघून गेला होता. होता तोवरही घरापासून, दौलतीच्या जबाबदाऱ्यापासून दूरवर आपल्याच वेडगळ विश्वात वावरत होता, 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्रैलोक्यामध्ये त्याचा झेंडा', ही भावना उराशी बाळगलेल्या अहिल्याबाईंची दुर्दैवाने पुत्राकडून निराशाच झाली होती. पतिसुख नव्हते. पण प्रजेच्या सुखासाठी ती चंदन होऊन झिजत होती. ती अहिल्या अढळ होती.

■

# ७) राजधानी महेश्वर झाली

घरातील तीन पुरुषांचा मृत्यू झाल्याने अहिल्याबाई एकलकोंड्या झाल्या होत्या. इंदूरमध्ये नव्या नवलाईने आलेल्या नववधूच्या संसाराची दैवदुर्विलासाने अशी वाताहत झाली होती. अन्नधान्य संपत्तीला काही कमी नव्हते. परंतु नशिबाने अहिल्येच्या पदरी सुखाचे दान टाकणेच सोडून दिले होते जणू. इंदूरच्या राजवाड्यात त्यांचे मन लागत नव्हते. तिथल्या आपल्या हरवलेल्या माणसांच्या खाणाखुणा त्यांना सतत बैचेन करत होत्या. भूतकाळातल्या स्मृती त्यांच्या मनाला अस्वस्थ करत होत्या. त्यांच्या मनाला आता तेथे राहणेच अजिबात मान्य नव्हते. मनाचा कौल मानत त्यांनी तिथे न राहण्याचा आणि नवीन जागी जाऊन राज्यकारभार करण्याचा निर्णय घेतला.

नव्या ठिकाणांचा शोध घेणे सुरू झाले. अनेक ठिकाणं पाहिली पण मनात बसले ते महेश्वर ! पुराणकाळात या महेश्वर नगराचे नाव होते माहिष्मती नगरी ! ही नगरी इतिहासाच्या प्राचीन परंपरेने नटलेली अशी होती. मल्हाररावांनी काही वर्षांपूर्वीच मोगलांच्या ताब्यातून तिला जिंकून घेतली होते. त्या नगरीला पुन्हा उत्तमरीत्या वसवण्यासाठी त्यांनी सर्व सोई सुविधाही पुरविल्या होत्या.

त्या नगरीला निसर्ग सौंदर्याचा आणि पावित्र्याचा वरदहस्तही लाभलेला होता. महेश्वर नर्मदा नदीच्या विस्तीर्ण पात्राकाठी वसलेले होते. नर्मदामाईच्या पावित्र्यात महेश्वराचा कणन् कण ओलावून गेला होता. अवतीभोवती घनदाट झाडी होती. महेश्वरात एक भुईकोट किल्ला होता. तेथून नर्मदेचे विस्तीर्ण असे पात्र नजरेत भरत असे. निसर्गाच्या कुशीत वसलेले ते गाव राजधानी म्हणून सुंदर आणि सुरक्षित होते.

अहिल्याबाईंनी आपल्या निकटवर्तीयांचा, आप्तस्वकीयांचा सल्ला घेतला. विद्वान ब्राह्मणांना आणि ज्योतिषांना त्यांनी विचारले. सर्वांच्या एकमताने होकार

आला तेव्हा त्यांनी महेश्वराला राजधानी करायचे ठरवले. मग लगबग सुरू झाली. भुईकोट किल्ल्याची डागडुजी झाली. किल्ल्यात छानसा वाडा बांधला गेला. वाड्यात अर्थातच खूप मोठे प्रशस्त देवघरही तयार झाले. राजदरबार भरवण्यासाठी मोठे दालनही तयार झाले. सगळे कक्ष, सदरेची जागा सारं सारं तयार झालं आणि शुभमुहूर्त शोधून त्यावर त्या महेश्वराला राहण्यास आल्या.

एक पवित्र नगरी पुण्यात्मा अहिल्येच्या पावन सानिध्याने झळाळून निघाली. अहिल्याबाईंच्या जाण्याने तेथे प्रसन्न, पवित्र व धार्मिक वातावरण तयार झाले. दौलतीच्या कारभाराला महेश्वरातून नव्याने सुरुवात झाली. महेश्वराचे भाग्य उजळले. महेश्वर केवळ इंदूर संस्थांनचीच नव्हे तर अखिल हिंदुस्थानाची प्रेरक राजधानी ठरली. अहिल्याबाईंनी महेश्वराचा कायापालटच केला. त्यांनी या शहराची पुनर्रचना केली. इथे लोकांची रेलचेल वाढली. इथली वाहतूक वाढली, व्यापार वाढला. कारगिरांना महेश्वरातून बोलावणे धाडले गेले. इथली देवालये, घाट म्हणूनच तर अजोड अशा कारागिरीचा नमुना ठरले. त्याला उदात्त भक्तिभावनेचा मुलामा चढवला गेला.

मोगलाईच्या अंमलात महेश्वर किल्ला साधा मातीचा होता. इ. स. १७३३ मध्ये होळकरांच्या अंमलात दुरुस्तीचे काम सुरू झाले. अहिल्याबाई १७६७ साली भाद्रपद मासात भाद्रपदाने महेश्वरात आल्या आणि महेश्वरात सारं काही पालटून गेलं. शुभपवित्र नगरी ठरली. किल्ला व आतील बांधकाम पूर्ण झाले की अहिल्याबाईंनी नर्मदेचा घाट बांधून घेतला. तेथेच काशीविश्वेश्वराचे देऊळ स्थापन केले. किल्ल्यावर श्रीकृष्ण, विठ्ठलादींची मंदिरे बांधून घेऊन त्यांच्या कायमस्वरूपी पूजनादिकांची व्यवस्था केली. १७९२ साली महेश्वरात ६६ पेक्षा अधिक देवळे सुस्थितीत होती याचे सरकार दप्तरी दस्त मिळतात. यापैकी काही देवळे अहिल्याबाईंनी नव्याने बांधली तर काहींचा जीर्णोद्धार त्यांनी केला.

महेश्वरात किल्ल्याखालच्या जुन्या बाजारात त्यांनी कापड विणकरांची वस्ती नव्याने वसवली. नव्या पेठा, पुरं वसवले. त्यातले एक पुर त्यांनी आपल्या

लाडक्या जावयाच्या यशवंत फणसेच्या स्मरणार्थ फणसेपूर म्हणून बसवले. त्यांचे जावयावरचे हे निःसीम प्रेम होते.

बाहेरगावच्या व्यापाऱ्यांना बोलावून व्यापार वाढवला. दूरवरच्या कलाकारांना, शिल्पकारांना बोलावून भारतीय कलेला वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. प्रजेच्या अन्नपाण्याची अन्नछत्रामधून सोय केली तर बौद्धिक खाद्यासाठीही सर्व प्रांतातून विद्वान, शास्त्री, पंडित, वैद्य, वैदिकांना बोलावून महेश्वरात सन्मानाने त्यांना वसवले. सातत्याने ज्ञानोपासना व्हावी हा त्यामागचा हेतू होता. महेश्वरातील २० एक विद्वान वेदशास्त्रसंपन्न पंडितांची नामावली सरकारी दफ्तरातून उपलब्ध होते.

महेश्वराच्या कीर्तीने पेशवेदरबारीही आपले स्थान निर्माण केले. पेशवे दरबारीचे मुत्सद्दी नाना फडणीस यांनी देखील महेश्वराचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. ते म्हणाले होते, ''पुण्याचा दरवाजा म्हणजे नर्मदातीराचे महेश्वर. पुण्याची संस्कृती महेश्वराच्या रुपानं प्रवेशद्वारासारखी डौलाने उभीय'' ही मोठी पावती नानासाहेबांनी दिली होती. हे सारं कर्तृत्व अहिल्याबाईंचच होतं. अहिल्येच्या सहवासाने महेश्वर नगरी कृतार्थ झाली होती. ती राजधानी झाली होती. ती ख्यात, सुविख्यात झाली होती.

■

# ८) मुत्सद्दी अहिल्या

परिस्थितीचा गैरफायदा परके जसे घेत असतात तसेच प्रसंगी आपले म्हणवणारे लोकही यात मागे नसतात. अहिल्याबाईंच्या सतत सावध व चतुर पावित्र्यामुळे हे मनसुबे उधळून लावल्या गेले हेही तितकेच खरे. मल्हाररावांनंतर एकट्या पडलेल्या अहिल्येचा शेवटचा आशाकिरणही संपला. मालेरावही अचानक मरण पावला. त्यानंतर त्यांनी तुकोजी होळकर नावाच्या दुसऱ्या नातेवाईक तरुणाला मल्हाररावांच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्यावर फौजेची व मोहिमांची जबाबदारी सोपवली आणि त्या स्वतः खाजगीचा व दौलतीचा कारभार पाहू लागल्या. महेश्वरातून राजधानी क्षेत्रातून त्यांचा कारभार सुरू झाला.

दुःखांचे एकानंतर एक आघात सहन करून थकलेल्या अहिल्याबाईंना राज्यकारभार कसा झेपेल, अशी शंका त्यावेळी कित्येक दरबारी मंडळींना आली. त्यात होळकरांचे जुने दिवाण गंगोबातात्या म्हणजेच गंगाधर यशवंत चंद्रचूड हेही होते. त्यांनी कैक वर्षे होळकरांची दिवाण म्हणून सेवा केली होती. परंतु मालेरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तोंडाला दौलतीच्या लोभाचे पाणी सुटले होते. ते अहिल्याबाईंना वारंवार तगादा लावू लागले, आपण दत्तक घ्या आणि कारभार माझ्यावर सोपवा असा. परंतु अहिल्याबाईंनी सरळसरळ दुर्लक्ष केले; ते पाहून गंगोबा तात्यांनी राघोबादादा पेशव्यांशी संधान साधले, त्यावेळी राघोबादादा माळव्यात मुलुखगिरी करत होते. ते कर्ज बाजारी होते. त्यांना तात्यांनी निरोप पाठवला, ''येथे सर्वजण दुःखात आहेत. दौलत बेवारस आहे. हीच योग्य वेळ आहे. आपण येथे येऊन दौलतीचा कारभार समेटावा.''

झाले... हा निरोप मिळताच राघोबादादा तत्काळ निघाले. त्यांनी स्वारीचा बेत आखला. परंतु हेरांकरवी अहिल्याबाईंना याची खबर लागली. त्या सावध

झाल्या गंगोबातात्यांचा डावही त्यांना समजला. स्वारीला तोंड देण्याची तयारी त्यांनी केली. सगळ्यात आधी त्यांनी तुकोजीला निरोप पाठवला. तुकोजी होळकर, तसे त्यांचे दूरचे नातेवाईक; पण मल्हाररावांपासून ते त्यांच्या सैन्यात होते. त्यांचे जवळचे मदतनीस होते. आता लष्कराची सारी व्यवस्था तेच पाहत होते. त्यावेळी ते उदयपूर जवळ होते. त्यांना निरोप धाडला गेला, ''आपण जेवत असाल तर हात धुण्यास महेश्वरात यावे.'' निरोप मिळताच ते ताबडतोब निघाले.

माधवराव पेशव्यांनाही खबरदारी म्हणून वर्तमान कळविले गेले. इतकेच नाही तर सर्व मराठी सरदारांना त्यांनी मदतीचे आवाहन केले. भोसले, गायकवाड, दाभाडे, शिंदे यांना मदत करण्याविषयी गुप्त पत्रे पाठवली. साऱ्यांनी मदतीची तयारी दाखवली. तोपर्यंत पुण्याहून न्यायी माधवरावांनी निरोप पाठवला की, तुमचे दौलतीविषयी जो पापबुद्धी ठेवील त्याचे पारिपत्य बेलाशक करावे. माधवरावांच्या निरोपाने अहिल्याबाईंना बळ मिळाले. त्यांच्या न्यायप्रिय बुद्धीशी त्यांच्या निष्ठाही दृढ झाल्या.

राघोबादादा ५० हजार फौजेनिशी उज्जयिनीजवळ अंकपात घाटावर मुक्कामी आले. ते निघाल्याचे कळताच आपला बेत सफल होणार म्हणून आनंदून गेलेले गंगोबातात्या अहिल्याबाईंकडे पोचले, मोठ्या अदबीने त्यांचे क्षेमकुशल विचारत विषय काढू लागले. ते म्हणाले, ''गंगाजळ निर्मळ मातोश्रींवर येऊ नये असा प्रसंग गुदरला, दुःखाचा डोंगरच कोसळला. पण ईश्वरी इच्छेपुढे कोणाचे काय चालते. पेशवे दादा साहेबांना बातमी कळली, तेही दुःखात बुडून गेले आहेत. त्यांच्या मनात आले, दौलतीचा व्याप किती मोठा आहे, तो समेटण्यास जातीनिशी गेलेच पाहिजे. ते येताहेत. दत्तकास अनुमती द्यावी. बाकी ते सर्व पाहून घेतील.'' तात्यांचे बोल ऐकून त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तरीपण राग आवरत, रोखून पाहत त्या म्हणाल्या, हे आम्हाला मंजूर नाही. दत्तक घ्यायचा असेल तर त्याचा पूर्ण अधिकार आमचाच आहे, पेशव्यांनी त्यात लुडबूड करण्याची काहीच आवश्यकता नाही.

राघोबादादा उज्जयिनी जवळ आल्याचे कळताच लढाई अटळ असल्याचे जाणून त्यांनी तुकोजी होळकराला चालून जाण्याची आज्ञा दिली. तुकोजी रातोरात उज्जयिनीत दाखल झाला. दुसऱ्या दिवशी राघोबादादाची आघाडीची तुकडी क्षिप्रेत उतरल्याचे कळताच तुकोजीने खांडणी स्वाराजवळ इशारा दिला की, ''क्षिप्रा उतरला असता तुमची आमची तलवार चालेल, याचा विचार करुन पाऊल टाकणे.''

इकडे तात्यांकरवी अहिल्याबाईंनीही एक निरोप राघोबादादांसाठी हुकुमी आवाजात पाठवला, त्या म्हणाल्या, ''खावंदांना आमचे बोल असेच सांगा. त्यांना म्हणावं, मी बाईमाणूस, मी काय करणार असा विचारही मनात आणू नका. आमच्या पूर्वजांनी दौलत खुशमस्करी करून मिळवलेली नाही. तलवारीच्या अनुमानाने शरीर खर्ची घातले आहे. तेव्हा तिचे रक्षण करण्यासाठी मी खांद्यावर बसडा टाकून उभी राहिले तर खावंदाना ते अवघड जाईल. तेव्हा त्यांनी उगाच बाईमाणसाशी लढाईला येऊ नये. त्यात त्यांचा मान तर राखणारंच नाही, पण बेअब्रू मात्र होईल.''

हा निरोप राघोबादादांपर्यंत पोचला तेव्हा त्यांना तो अपमानकारक वाटला. इरीला पेटून चढाई करून जाण्याचे त्यांनी ठरवले. मातोश्रींच्या वाटेला जाऊ नये असे इतर मातब्बर सरदार समजावून सांगत होते; परंतु चढाई करणार हाच आविर्भाव त्यांनी कायम ठेवला. त्याने अहिल्याबाई शरण येतील असे त्यांना वाटले. पण अहिल्याबाईही राजकारणात त्यांच्यापेक्षा जास्त मुरलेल्या होत्या. सरदारांचे, प्रजेचे पाठबळ त्यांच्याकडे होतेच, त्या स्वतःच उज्जयिनीला निघाल्या. राघोबादादा पेचात पडले. अहिल्याबाई लढणार नाहीत, तह करतील, खंडणी देतील ही राघोबादादांची कल्पना फोल ठरली.

अहिल्याबाई शाही इतमामात निघाल्या, त्यांनी हत्ती शृंगारला, बाणाने भरलेले भाते, तलवारी, शस्त्रास्त्रानिशी आणि मोठ्या लवाजम्यानिशी त्या निघाल्या. लोकांना हे कळताच ते उज्जयिनीच्या मार्गावर त्यांचे मोठ्या उत्साहाने

स्वागत करू लागले. मातोश्रींच्या दर्शनासाठी झुंबड उडू लागली. त्यांच्या वाटेत फुलांच्या पायघड्या लोक घालू लागले. सारे वतनदार मुजरे करू लागले. सारा आसमंत मातोश्रींच्या जयजयकाराने दुमदुमून गेला. जनमाणसातील त्यांच्या विषयीची अपार श्रद्धा, भक्ती अन् आदर लोकांच्या कृतीतून प्रकट होऊ लागला. राघोबादादांकडे खबऱ्यांकडून हा सगळा वृत्तांत पोहचत होता. त्यांना समजायचे ते समजून चुकले. परिस्थिती अनुकूल नव्हती.

अहिल्याबाईंची तयारी, हिंमत व डावपेच पाहून ते थक्क झाले. चढाई करावी तर होळकरांकडून कडवा प्रतिकार होईल. कदाचित पराभव पत्करावा लागेल. बाईकडून पराभूत होण्यासारखी मानहानी नाही, तिच्यावर विजय मिळवला तरी फार भूषण नाही, म्हणून लढाई टाळून मान राखून घ्यावा हेच बरे असा पोक्त विचार करून राघोबांनी तुकोबाशी सामोपराची बोलणी केली. मुलगा गेला, दैवी आघात झाला. म्हणून मातोश्रींचे सांत्वन करायला आलो. असा पवित्रा त्यांनी घेतला.

मोजक्याच सरदारांसह राघोबादादांनी अहिल्याबाईंची भेट घेतली. बराच वेळ त्यांचे सांत्वन केले. त्यांच्या बोलण्यातल्या मार्दवातून त्यांनी घेतलेली माघार स्पष्टपणे जाणवत होती. अहिल्याबाईंच्या सर्व लक्षात आले. परंतु त्यांची अधिक शोभा न करता, अधिक ताणून न धरता त्यांनी विषय संपवला. न बोलताच डाव जिंकून घेतला. उलट होळकरांच्या राजघराण्याला शोभेल असा पाहुणचार केला. त्यांचा तो पाहुणचार, लोकप्रियता व आदर्श जीवन बघून राघोबादादा खजिल झाले.

अहिल्याबाईंनी मोठ्या मुत्सद्देगिरीने गंगोबातात्यांचा डाव उधळून लावला. तेवढ्यात माधवराव पेशव्यांचे पत्रही आले. त्यात दादासाहेबांना 'तुमचे उद्योगधंदे थांबवा' अशी ताकीद देऊन अहिल्याबाईंना मात्र आपले अधिकार आजवर चालत आल्याप्रमाणे चालवले जातील असा दिलासाही दिलेला होता. त्यांचे सर्व अधिकार अबाधित राहिले होते. तरीपण आपण पेशव्यांचे सेवक आहोत, अशीच

नम्र भूमिका अहिल्याबाईंची होती. माधवरावांबद्दल त्यांच्या मनात अपार कौतुक, आदर नि जिव्हाळा होता. तर त्यांनाही मातोश्रींच्या हिशोबीपणाबाबत, कारभारातील सावधपणाबाबत नि त्यांच्या कमालीच्या धर्मशीलतेबाबत नितांत आदर होता, त्यांच्या कार्याबद्दल विश्वास होता.

अहिल्याबाईंच्या मुत्सद्देगिरीत मल्हाररावांची झलक होतीच पण त्यांची स्वतःची जाणही होती. त्या विनम्र होत्या पण प्रसंगानुरूप राजकारणाला आवश्यक गुणधर्मांचा खजिनाही त्यांच्यामध्ये होता. अहिल्याबाई गुणांची खाणचं होत्या.

■

# ९) समाजकार्याचा वसा

राजकीय कारकीर्दीत समाजकार्याचा उत्तुंग हिमालय उभे करणारे लोक विरळेच असतात. अहिल्याबाईंनी हे कार्य केलेले आहे. त्यांच्या समाजकार्यासाठी तेव्हाचा समाज तर ऋणी होताच; पण उत्तरकालीन शतकानुशतकातील समाज ऋणी आहे. त्यांच्या या कार्याचा लाभ आजही मिळत आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याची व्याप्ती आभारवर्ष असून त्यात वैविध्य होते. त्यांनी जागोजागी विहिरी खोदणे, तलाव खोदणे, मंदिरांची उभारणी करणे, जुन्या मंदिरांचे जीर्णोद्धार करणे, घाट बांधणे, रस्ते बांधणे, महामार्ग बांधणे, पशुपक्ष्यांच्या चारादाणापाण्याची व्यवस्था करणे, अन्नछत्र सुरू करणे अशी एक ना अनेक कार्ये पूर्ण केलेली दिसून येतात. असे तू हिमाचल सारा भारत देश त्यांच्या कार्याच्या टप्प्यात येत असे. हिमालयातील केदारेश्वर मंदिरापासून ते दक्षिणेतल्या रामेश्वर मंदिरापर्यंत तसेच पूर्वेला जगन्नाथ मंदिरापासून ते पश्चिमेला द्वारकेपर्यंत सर्व देवालयांवर त्यांचे लक्ष होते. त्यांनी या सर्व देवालयात काही ना काही कार्य करून ठेवलेले आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याला धर्मवृत्तीचीही जोड होती. त्यांच्या दानधर्मातून सामाजिक कार्य साकारत असे. या दानधर्मातून अनेक मंदिरांमध्ये पूजाअर्चेसाठीच्या नेमणुका, नैवेद्य, अन्नछत्रे, कथाप्रवचन, कीर्तने सुरू असत. चित्रकूट पर्वतावर एक सुंदर मंदिर बांधून त्यात त्यांनी रामपंचायतनाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. सोरटी सोमनाथाचे देवालय त्यांनी नव्याने बांधून घेतले. गयेला विष्णुपदाचे देवालय उभे राहिले. काशीला दशाश्वमेघ घाट, मनकर्णिका घाट बांधला. महेश्वरला नर्मदा माईच्या तीरावर पुष्कळ घाट बांधले.

कितीतरी मंदिरांचा जीर्णोद्धार केला, कित्येक मंदिरं नव्याने बांधली. अनेक रस्ते बांधले. कलकत्ता ते काशीपर्यंत त्यांनी रस्ता बांधला.

समाजातील कलाकारांना मानाचे स्थान दिले. कलोपासनेची संधी दिली. बाराही बलुतेदारांना व्यवसायाला पूरक वातावरण दिले. भूतदया आजन्म पाळली. परोपकार बुद्धीने अपार द्रव्य खर्च केले. अन्नदान, वस्त्रदानासारखे नित्य दानधर्म करीत असत. याचकांना, गोरगरिबांना थंडीमध्ये गरम कपडे, घोंगड्या त्या दान करीत असत. उन्हाळ्यात प्रवाशांसाठी मुद्दाम विहीरी व पाणपोया बांधल्या. पशुपक्ष्यांना दाणे, चारा, पाण्याची व्यवस्था केली तशीच नर्मदेतील माशांना रामनामाच्या कणकेच्या गोळ्या टाकण्याची व्यवस्था केली.

१७८३ ला महेश्वर ते पुणे अशी तीन टप्प्यांची टपालव्यवस्था त्यांनी सुरू केली. सातपुडा पर्वतातून काशीचा जो रस्ता त्यावर भिल्ल लोक लुटत त्यांना खाजगी दौलतीतून कसण्यास जमीन दिली. लुटमार उभी केली. त्यातील काहींवर यात्रेकरूंच्या रक्षणाचे काम सोपवले.

चांदखेड, सेंधवा, अशीरगड, गाळणा, कुशलगड, हिंगणलगड या सहा किल्ल्यांची संरक्षणदृष्ट्या बांधणी व दुरुस्ती करून घेतली. यात्रेकरूंसाठी नवीन रस्ते बांधले.

बारा ज्योतिर्लिंगे, सप्तपुऱ्या, चार धामांकडे त्यांनी खूप मोठी सामाजिक कामे केली. अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, अवंती, द्वारका या सप्तनगरींना त्यांनी आपली सेवा समर्पित केली. बद्रीनारायण, द्वारका, रामेश्वर, जगन्नाथपुरी या चार धामांकडे द्रव्यौघ वळवून त्यांनी तिथेही समाजकार्याची पूजा समर्पित केली. या सर्व ठिकाणी कुठे मंदिरे, कुठे घाट, कुठे बागा, कुठे कुंडे तर कुठे अन्नछत्रे व धर्मशाळा बांधून यात्रेकरूंची सोय केली.

समाजसेवा हीच ईश्वर सेवा हे तत्त्व त्या कृतीतून जगल्या, अहिल्याबाईंनी केलेले समाजकार्य आजही प्रेरक आहे. आपण समाजासाठी आहोत तर काही केलेच पाहिजे हा भाव मनात ठेवत त्यांनी खूप काही केले. अहिल्या आणि समाज हे समीकरणच झालेले दिसते.

■

# १०) अहिल्याबाईंचे ग्रंथप्रेम व त्यांनी केलेली साहित्य शारदेची उपासना

ग्रंथ समाजाच्या वैचारिक संपदेचा वारसा जतन करत असतात. अहिल्याबाईंची ग्रंथाबद्दलची ओढ विलक्षण होती. त्यांची वृत्ती धार्मिक होती त्यामुळे धर्मग्रंथाच्या वाचनाची आवड त्यांना होती. त्यामुळे त्यांनी स्व:तचे मोठे असे ग्रंथालय उभे केले होते. अनेक ठिकाणांहून त्यांनी शेकडो ग्रंथ आणलेले होते. जाईल तेथून जमतील तेवढे ग्रंथ त्या विकत घेत आणि आपल्या ग्रंथालयात ठेवत असत. अनेक ग्रंथांचे वाचन त्या करवून घेत असत.

अहिल्याबाईंचा हा खासगी ग्रंथसंग्रह त्यांनी विद्वानांसाठी खुला ठेवला होता. अभ्यासूंसाठीही तो खुला होता. त्यामुळे इतर विद्वानांनाही हा ग्रंथसंग्रह उपयुक्त ठरत असे. ठिकठिकाणाहून कित्येक विद्वान अध्ययनासाठी महेश्वरात येत असत त्यामुळे महेश्वर हे विद्येचे एक समर्थ केंद्रही बनले होते.

अहिल्याबाईंच्या ग्रंथसंग्रहात महाभारताची काही पर्वे, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, व्यंकटेश स्त्रोत्र, प्रकृतिस्त्रोत्र, ग्रहमख, नवग्रहमंत्र, मल्हारी कवच, नैमिषारण्य माहात्म, कान्यकुब्ज माहात्म, जन्माष्टमी पूजा, मुहूर्त चिंतामणी, रामायण, भागवत महापुराण इत्यादी अनेक ग्रंथ होते.

त्या रोज रामायण, महाभारत, पुराणांदीचे पंडितांकडून श्रवण करीत असत, मगच भोजन घेत असत. त्यांनी पुराणं ऐकवण्यासाठी पुराणिकांची नेमणूक केलेली होती. अनेक विद्वान वैदिक, याज्ञिक, वैद्य, वैयाकरणिक, कवी, लेखक यांना आपल्या दरबारी महत्त्वाचे स्थान दिलेले होते. लांबलांबून काशी, हरिद्वार इत्यादी ठिकाणांहून, कर्नाटकातून, पुण्यातून त्यांनी विद्वानांना महेश्वरात आणून वसविले होते.

निरनिराळ्या मंदिरांमध्ये देवपूजेच्या व्यवस्थेसाठी त्यांनी विद्वान ब्राह्मणांची नियुक्ती केलेली होती. ज्योतिषपंडितांना त्यांनी महेश्वरात आणून वसविले होते. प्रवचनकार, कीर्तनकार, व्याख्याते यांना सन्मानाने बोलवून स्वतः त्या कीर्तनप्रवचने ऐकत असत.

कवी, लेखक, पोवाडेकारांना त्यांनी बोलावून सन्मानित केलेले होते. विद्वान, पंडित, ज्यातिषी, वैद्य, कीर्तनप्रवचनकार, कलाकार त्यांच्याकडे. नेहमी येत जात असत. त्या योग्यतेनुसार सर्वांचा पाहुणचार, आदरसत्कार करीत असत. इनामे देत असत, काहींना दरबाराचा आश्रयही देत असत.

कवी मोरोपंत आणि शाहीर अनंत फंदी यांचा सत्कार त्यांनी केलेला होता. त्यांच्या जीवनात या सर्व बाबींना असलेले हे महत्त्व त्यांची साहित्य शारदेची उपासनाच अधोरेखित करते. त्यांची ही उपासना आजन्म सुरू होती. अहिल्यारूपी राजलक्ष्मीला साहित्यशारदा सखी मिळाली होती. हे सौख्य त्यांची कीर्ती वाढवणारेच ठरले.

■

# ११) प्रसंगानुरूप कठोर निर्णय

संस्कृत नाटककार भवभूतीच्या उत्तररामचरितम् मध्ये एक श्लोक आलेला आहे. तो असा -

**''वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।**
**लोकोत्तराणां चेतांसि कोडहि विज्ञातुमर्हति।।''**

अर्थात लोकोत्तर माणसांची मनं प्रसंगी वज्रापेक्षाही कठीण तर कधी फुलापेक्षाही मऊ असतात. त्यांच्या मनाचा अंदाज कोण बरे बांधू शकेल? अहिल्याबाईंचे मनही फुलांपेक्षा कोमल असले तरी प्रसंगी वज्रापेक्षाही कठोर झालेले दिसून येते.

दौलतीला काही वेळा भिल्ल, गोंड वैगेरे वनवासी लोक चोऱ्यामाऱ्या करून, दंगामस्ती, गुंडागर्दी करून सळो की पळो करीत असत. आधी शक्यतो सारं गोडीगुलाबीने घेऊन त्यांचा त्रास कमी करण्याचाही त्या प्रयत्न करीत असत. त्यांची डाकूगिरीची वृत्ती कमी करण्याचाही त्या प्रयत्न करीत असत. पण एवढं करूनही ते वठणीवर येत नसत. अशा वेळी त्यांना तुरुंगातही डांबावे लागे. त्यांना दिलेल्या शिक्षेपायी त्यांच्या बायकापोरांचे हाल होऊ नयेत याची काळजी त्या जातीने घेत असत. त्या त्यांच्या बायको मुलांना शिधा देत असत. त्यांची रोज हजेरी घेतली जात असे. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी काही माणसांची नेमणूकही करण्यात येई.

त्यावेळी मानरूपसिंग नावाचा डाकू फारच त्रास देत होता. लूटमार करीत लोकांच्या जीविताचीही पर्वा करीत नसे. त्याला शांतपणे, गोडीगोडीने अनेकदा समजावले तरीही त्यांच्या वर्तणुकीत काहीच बदल झाला नाही. प्रजेचे हीत लक्षात घेऊन त्यावेळी अहिल्याबाईंना मानरुपसिंगाबाबत कठोर निर्णय घ्यावा

लागला. न डगमगता ठामपणे त्यांनी तो निर्णय घेतला आणि मानरुपसिंगाला फाशीची शिक्षा ठोठावली.

बंड मोडून काढतानाही त्यांनी अनेकदा कठोर निर्णय घेतले. दौलतीत कधी कोणी बंड करून उठवण्याच्या तयारीत आहे, असे लक्षात येताच त्या त्यांचे बंड मोडून काढण्यासाठी पाऊलं उचलीत असत. त्या अष्ठावधानी होत्या, त्यांची नजर घारीची होती. त्यांच्याकडे राखीव फौजही होती. त्या राखीव फौजेच्याच जिवावर त्यांनी रामपुऱ्याचे आणि मेवाडमधील चंद्रावताचे बंड देखील मोडून काढले होते. ही बातमी जेव्हा पुण्याला नाना फडणीसांना समजली त्यांनी अहिल्याबाईंची प्रशंसा करत म्हटले होते, आजपर्यंत बाईंची धर्मकृत्येच आम्ही ऐकत होतो, पण आज पराक्रमाची मोठीच गोष्ट केली. बायकांमध्ये **'शापादपि शरादपि'** अशी एकच बाई आहे.

अहिल्याबाईंचे निर्णय आजही आदर्शवत वाटतात. त्यांच्या या निर्णयामागे त्यांची खंबीर, सशक्त आणि परिपक्व अशी विचारधारा होती. त्यांची निर्णयक्षमता मुरलेल्या मातब्बर राजकारण्यालाही लाजवेल अशीच होती. धन्य त्या अहिल्याबाई अन्य धन्य त्यांची निर्णयक्षमता !

■

# १२) देशप्रेमाखातर

लंकेवर विजय मिळवल्यानंतर लक्ष्मणाने श्रीरामाला विचारले होते, ''दादा, आपण पराक्रमाने जिंकलेली ही लंका आपलीच झाली आहे. इतकी संपन्न लंका पाहता आपण येथेच राज्य करावे असे वाटते.'' लक्ष्मणाच्या या विचारांवर श्रीरामांनी दिलेले हे उत्तर हे देशप्रेमाचा उत्तम धडा होता. ते म्हणाले,

**अपि स्वर्णमयी लङ्का न मे लक्ष्मण रोचते ।**
**जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।।**

अर्थात, हे लक्ष्मणा, जरी लंका सोन्याची असली तरीही मला ती आवडत नाही. कारण जननी आणि जन्मभूमी या स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ असतात. अहिल्यादेवींनीही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ मानलेल्या या भारतमातेसाठी खूप काही केले. परकीय जखडांतून मातेची सुटका झाली पाहिजे असे त्यांना मनोमन वाटे. त्यांना इंग्रजांच्या हिंदुस्थानातील वाढत चाललेल्या वर्चस्वाची चिंता वाटत असे. इंग्रज आपले पाय हळूहळू सर्वदूर पसरवत होते, येथील लहानसहान दौलतीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करत आहेत तर मोठ्या सत्ताधीशांच्या सत्ता आतून पोखरत चाललेल्या आहेत याची काळजी त्यांना सतावत असे. त्यामुळे त्यांना मनापासून वाटत होते की नवाब, भोसले, शिंदे, होळकर या सर्वांनी एकत्र येऊन इंग्रजांचे पारिपत्य करावे.

अशातच दिल्लीच्या बादशहानेही या गोष्टींकडे त्यांचे लक्ष वेधून सांगितले की, तुमचे व शिंद्यांचे सरदार, फौजा इकडे पाठवा. आमचीही फौज आहे. राजेरजवाडे सारे एकत्र होऊन इंग्रजांचे पारिपत्य करू. परंतु अहिल्याबाईंना हेही जाणवत होते की सर्व राजेरजवाड्यांचे आपापसात कलह आहेत, भांडणे आहेत. सारे एकत्र होणे महाकठीण. हे काम तर आपल्या आवाक्या बाहेरचेच ! पण अशा परिस्थितीत पेशवेच वाट काढू शकतील. ती त्यांनीच काढायला हवी असे त्यांना

मनापासून वाटत होते. म्हणून त्यांनी पुणे दरबारी कळविले होते, इंग्रजांचा उत्कर्ष चोहोबाजूना दिसतो आहे. त्यांचा वेळीच मोड करावा.

देशप्रेमाखातर त्या सती गेल्या नाहीत, त्यांनी मोहिमा लढवल्या. उत्तरेकडील यवनांची आक्रमणे थोपवून धरली. आपल्या कुटुंबियांच्या अपमृत्यूंचे विशाल दुःख पचवून टाकले. एकटेपणाच्या जीवनात देशप्रेमाची तुळस त्यांनी सतत ताजीतवाणी ठेवली. तिच्या मंजुळा प्रजेला दिसत असत आणि त्या त्यांच्या ह्दयात सजवून पुन्हा तेथेही देशप्रेमाच्या तुळशी ह्दयाच्या वृंदावनात डोलत असत. देशावरील प्रेमासाठी त्यांनी सारे जीवन वेचले.

देव, देश अन् धर्मासाठी प्राण घेतलं हाती, अशीच त्यांची अवस्था होती. देशावर नितांत श्रद्धा, देशावर प्राणापलीकडे प्रेम तर धर्म हा त्यांचा श्वास होता. अहिल्यारूपी देशप्रेम आजही दीपस्तंभवत आहे. या अहिल्यारूपी देशप्रेमाला त्रिवार वंदन !

■

# १३) अहिल्येचा कीर्तीसुगंध

**'मरावे परि कीर्तिरूपे'** उरावे या म्हणीप्रमाणे आजही अहिल्याबाई कीर्तीरुपाने जिवंत आहेत. मनुष्याच्या कर्माचा सुगंध दाही दिशांना पसरत असतो. अहिल्याबाईंचे आयुष्य म्हणजे एकापेक्षा एक सरस कार्याचा हिमालयच होते. हा हिमालय उभा करणे अजिबात सोपे नव्हते. हा उभा करताना स्वसुखांची आहुती दिली होती. त्यांनी कितीतरी मोठमोठी दुःखे पचविली होती. निधड्या छातीने ही वीरांगणा युद्धात उभी राहिली होती. होळकरांच्या दौलतीला तिने उत्कर्षाला नेले होते. अहिल्याबाईने केलेला राज्यकारभार हा अनेकार्याने आदर्श होता, मार्गदर्शक होता.

नऊ वर्षांची ही पोर होळकरांच्या घराण्यात आशेचा किरण घेऊन आली. अन् बघता बघता प्रकाशाचा सूर्यच झाली. प्रखर तेजाची मालकीण सर्वांच्या दिलांवर अधिराज्य गाजवू लागली, ते तिच्या उत्तम कार्यामुळे, लोकांपयोगी निर्णयांमुळे, दौलतीच्या भल्यासाठी तिच्या धडपडण्यामुळे. अहिल्येची कीर्ती तिने केलेल्या प्रचंड दानामुळेही सर्वत्र पसरलेली होती. विद्वान, गरजू गोरगरिबांना तिच्याविषयी नितांत आदर वाटत असे.

एक ना अनेक आघाड्या तिने सहजीच लढवल्या होत्या. व्यक्तिगत जीवनातील दुःखे तो तो तिची परीक्षा पाहण्यासाठीच कंबर कसून उभी होती. ती खचली नाही, ती थांबली नाही, ती चालतच राहिली. खांद्यावर होळकरांची धुरा, हृदयात देशप्रेमाचा झरा, धर्मावर नितांत विश्‍वास, पेशव्यांचरणी अपार निष्ठा अन् कर्मांवर उदंड श्रद्धा हीच तिची खरी दौलत होती. प्रजा हिच तिची खरी संतती होती. तिला व्यक्तिगत सांसारिक सुख मिळाले नाही परंतु राज्याचा संसार मात्र तिने काटकसरीने समृद्धीप्रत नेला होता. सुखाचे दिवे तिने प्रजेसाठी प्रज्वलित केले होते. धर्माच्या अधिष्ठानावर राज्यकारभाराची गुढी तिने उंच नभी पोचवली होती.

मातीशी इमान तिने प्राणपणे राखले होते. सासऱ्यांच्या कर्तबगार प्रतिमेला स्वकर्तृत्वाने कोंदण दिले होते. पावित्र्याला नवी परिभाषा दिली होती. कार्यातून पुण्याच्या श्लोक अढळ केला होता. अहिल्या ही अहिल्याबाई, देवी ते मातोश्री पदापर्यंत पोचली होती. तिची कीर्ती भारतवर्षात पसरली होती, पेशव्यांच्या दरबारी ती सन्मानित झाली होती. अहिल्याबाईंदेखतच आणखी एक कीर्तीरुपी अहिल्या जन्माला आली होती, जी अजरामर आहे, राहील. ही कीर्तीरुपी अहिल्या उत्कृष्ट कार्य करण्यासाठी प्रेरणास्तंभ ठरली आहे. तिच्या कीर्तीचा हा परिमळ अंतरंगाला सुगंधून टाकतोय शतकानुशतके उलटली तरीही.

■

# १४) विद्वानांची कदर, कलावंतांचा आदर

**'गुणी गुणिनं वेत्ति'** या न्यायाप्रमाणे म्हणजेच गुणवान व्यक्तीलाच दुसऱ्या गुणवंतांची कदर असते याप्रमाणे स्वयं गुणांचे भांडार असलेल्या अहिल्याबाईंना इतर गुणवानांबद्दल नितांत आदर वाटत असे. त्या स्वतः विदुषी असल्याने इतर विद्वानांबद्दल त्यांना आस्था होती. विद्वता ही त्या व्यक्तीची व्यक्तिगत संपत्ती असली तरी राज्याच्या उत्कर्षासाठी ती अत्यावश्यक असते याची जाण अहिल्याबाईंना होती. म्हणूनच आपल्या संपूर्ण जीवनात त्यांनी विद्वानांना योग्य तो मान सन्मान सदैव बहाल केला. खरेच असते की राजाला आपापल्या राज्यात लोक मानतात परंतु विद्वानांना स्थळकाळाची बंधने नसतात. **'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते.'** राजा आपल्या राज्यात मान मिळवतो परंतु विद्वान मात्र सर्व ठिकाणी पूज्य असतो.

विवाह करून आल्यानंतर महेश्वरात राजधानी हलवेपर्यंतही त्यांच्या दरबारी मोठमोठे संस्कृतचे विद्वान, पुराणिक, वेदज्ञ, दैवज्ञ, कीर्तनप्रवचनकार निरुपणकार, वैद्य यांची रेलचेल असे. त्यांनी काही विद्वानांना राजदरबारी मानाची पदंही दिलेली होती. महेश्वरात तर त्यांनी काशीपासून दक्षिणेपर्यंतच्या विद्वानांना आवर्जून बोलावून वसविलेले होते. जिथे विद्वत्ता असते तिथे सुबत्ता निर्माण होते, हे खरे. महेश्वरातील विद्वान मंडळींमुळे थोड्याच अवधीत संपूर्ण हिंदुस्थानात महेश्वराला मोठे आदराचे स्थान प्राप्त झाले होते.

भारतीय कलांना जीवित ठेवण्यासाठी अहिल्याबाईंनी शिल्प, चित्रादी विविध कलांच्या जोपासनेसाठी, संवर्धनासाठी मोठी भूमिका बजावलेली होती. त्यांनी या सर्व कलाकारांना आपल्या राज्यात कामे दिली होती. त्यांची सुव्यवस्था केलेली होती. इतकेच नव्हे तर त्यांनी साहित्य क्षेत्रातील

मान्यवरांचाही यथोचित सन्मान केलेला होता. कवी मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांचा सन्मान केल्याचे उल्लेख आहेत.

सरकारी दप्तरावरून त्यांनी मंदिरांची व्यवस्था पाहण्यासाठी विद्वान मंडळींची नियुक्ती केल्याचे दिसून येते. आपल्या राज्यात विद्वत्ता निपजावी म्हणून पोषक वातावरण त्यांनी तयार केले होते. विद्वानांची कदर आणि कलावंतांचा आदर करणारी ही होळकरांची राणी त्यामुळेच सर्वांच्या हृदयात आपले विशिष्ट असे स्थान निर्माण करू शकली.

अहिल्याबाईंनी महेश्वरात उत्तम विद्वानांची वस्ती करवून घेतल्यानेच महेश्वराचा डंका साऱ्या हिंदुस्थानात वाजू लागला होता. नाना फडणीसांनी तर यांचं वर्णन म्हणजे 'महेश्वर हे पुण्याचे प्रवेशद्वार झाल्याचे म्हटले आहे.' यावरूनच अहिल्याबाईंच्या कर्तृत्वाची अफाट क्षमता लक्षात येते.

■

# १५) अहिल्येची बिरुदं

कर्तृत्ववान व्यक्तींच्या उत्तुंग कार्याची पावती म्हणजे त्यांना लोकांनी उत्स्फूर्तपणे बहाल केलेली बिरुदं असतात. अहिल्याबाईंनाही अशीच एक नव्हे तर अनेक बिरुदं मिळाली होती. सन्मानाने त्यांना लोक अहिल्याबाई म्हणत तेव्हा त्यांचा राजकीय दरारा लक्षात येई. त्यांना राणी अहिल्या म्हटलं जाई तेव्हा होळकर साम्राज्याची समर्थ सम्राज्ञी डोळ्यासमोर येते. होळकरांची ही राणी आपल्या शौर्याचे झेंडे अटकेपार रोवत असे. जेव्हा त्यांना देवी असे संबोधत तेव्हा त्यांच्या कर्तव्याची अमाप शक्ती व पावित्र्य झळकत असे. लोकांचा, विद्वानांचा अन्य राजेमंडळींचा अहिल्येविषयीचा नितांत आदरच त्यातून प्रकट होत असे.

जसजसा काळ पुढे सरकला, होळकर साम्राज्याला त्यांनी प्राणपणाने कणखरपणे उभे केले, वाढवले तसतसे त्यांचे आणि प्रजेचे नाते हे अधिक घट्ट होत गेले. त्या इंदुरमध्ये आल्या तेव्हा विवाहसमयी अवघ्या ९ वर्षांच्या होत्या. ही चिमुकली इंदुरात आली अन् आपल्या अतुल्य कामगिरीने अहिल्येची अहिल्याबाई झाली. अहिल्यादेवी झाली अन् नंतर राणी अहिल्याही झाली. खरं कर्तृत्व हे इथेच थांबत नाही. प्रजेबरोबर त्यांचं नातं राज्याच्या राणी पलीकडे गेलं आणि त्या प्रजेच्या आई झाल्या. हे आईपण त्यांच्या प्रेमळ, प्रजेविषयीच्या काळजीभाषेतून वर्षानुवर्षांच्या त्यांच्या प्रजावत्सलतेतून त्यांना मिळालं होतं. लोकांचं हे भाग्य होतं की, त्यांना अशी सम्राज्ञी, अशी संरक्षक अशी मातोश्री मिळाली होती. आईपणांच वैभव होत्या त्या. आपल्या व्यक्तिगत आयुष्यात त्यांना स्वपुत्राने आईपणाचं वैभव नाही दिलं पण प्रजेनं मात्र त्यांना आईपुढे श्री योजून मातोश्री हे सर्वात महत्त्वाचं बिरुद समर्पित केलं उत्स्फूर्तपणे.

अहिल्या ते मातोश्री अहिल्या हा प्रवास त्यांनी स्नेहल हृदयामुळे पार केला होता. प्रजेला त्यांनी आईची छत्रछाया दिली होती. प्रजा अहिल्येच्या मातृप्रेमाणे

न्हाऊन निघालेली होती. आपल्या जन्म दिलेल्या मुलांची आई होणं हे एकवेळ सोप असतं परंतु राज्यातील प्रजेची माता होणं हे अतिशय कठीण काम. त्या मातोश्री झाल्या होत्या. ही हाक प्रजेने आपल्या अंत:करणापासून त्यांना मारली होती. त्या कृतार्थ झाल्या होत्या.

'मातोश्री अहिल्या' हा टप्पा आपल्या निःस्वार्थ प्रजाप्रेमामुळे त्यांनी लीलया पार केला होता. तथापि त्यांच्या कार्याची उंची अजूनही वाढत गेली. त्यांनी साऱ्या हिंदुस्थानातील देवदेवळांना आपली सेवा समर्पित केली. पशु, पक्षी, प्राण्यांना अन्नपाण्याची सोय केली. दानाच्या वृत्तीने प्रजाजनांसाठी उभ्या केलेल्या सोयी सुविधांनी, धर्मकार्यांनी, राजकारभाराच्या सात्त्विक अधिष्ठानाने त्यांनी खूप मोठी पुण्याई मिळवली होती. ही पुण्याई इतकी वाढत गेली, दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेली की त्याचा अढळ असा श्लोक झाला. पावित्र्याच्या उच्चांकाने त्या पुण्यश्लोक झाल्या ते आजतागायत आहेत. त्यांच्या नंतर पुण्यश्लोक अन्य कोणालाही होता आलेलं नाही यातच हे पुण्यश्लोक बिरुद स्वतःच सन्मानित झालेलं दिसतं. बिरुदे पदव्या काय सांगती, कर्तृत्वाने उजळून निघती, पावन स्पर्शे अहिल्येच्या स्वतःच अजरामर होऊन जाती. पावन ऐशी गाथा सांगती.

■

# १६) स्त्रीधनाचा सुयोग्य वापर

भारतीय संस्कृतीत 'स्त्रीधन' ही एक अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याची तसेच सुरक्षिततेची ती द्योतक आहे. स्त्रीधनाला कायद्यात स्थान आहे. प्राचीन कायदेविषयक स्मृतिग्रंथामध्ये स्त्रीधनाबाबत सविस्तर कायदे आढळून येतात. स्त्रीधनावर त्या स्त्रीचाच केवळ हक्क असतो. तिच्या परवानगी शिवाय तिचा पतीदेखील स्त्रीधनाला हात लावू शकत नाही, एवढा सखोल विचार प्राचीन विचारवंतांनी केलेला दिसून येतो.

पेशव्यांनीदेखील ही स्त्रीधनाची परंपरा अखंडपणे चालू ठेवली होती. आपल्या सरदारांनाही ती चालवण्यास प्रेरणा दिली जात असे. मल्हाररावांच्या काळापासूनच होळकरांच्या घराण्यात ही प्रथा सुरू झाली. वसूल झालेल्या पैशातून चार आणे अर्थात एक चतुर्थांश धन हे स्त्रीधन म्हणून वेगळे ठेवण्यात येई. याबाबत १७३३ साली थोरल्या बाजीराव पेशव्यांनी मल्हाररावांना सनद लिहून दिली होती की काही प्रांत त्यांच्या पत्नीकडे असतील. तसेच ही व्यवस्था तात्पुरती नसून **'यावच्चंद्र दिवाकरौ'** म्हणजेच सूर्यचंद्र असेपर्यंत अर्थात कायमस्वरूपी असेल.

या सनदीनुसार गौतमाबाईंकडे दरवर्षी २ लाख ९७ हजार रु. स्त्रीधन म्हणून जमा होत असत. गौतमाबाईंनी त्यातले फारच थोडे धन खर्च केले होते. तेच पुढे अहिल्याबाईंच्या स्त्रीधनात जमा झाले. शिवाय अहिल्याबाईंना या स्त्रीधनाव्यतिरिक्त दरवर्षी चोळी बांगडी म्हणून १ लाख १३ हजार ८०० रु. मिळत होते. होळकरांच्या राज्यात नियमाप्रमाणे कर गोळा केला जाई. करवसुलीबाबत कोणताही जुलूम जबरदस्ती केली जात नसे. प्रसंगी सूट देऊन कर गोळा केला जाई. लोक स्वखुशीने कर भरत असत. कोणत्याही राजाचे, राज्यकर्त्याचे हे मोठे यश असते, जेव्हा लोक कर आनंदाने भरत असतात.

अहिल्याबाईंनी अजिबात उधळमाधळ न करता स्त्रीधनात संपत्ती साठवली होती ती आता १६ कोटी इतकी झाली होती. खजिना वाढवत, विनाकारण खर्च

न करता स्त्रीधनात त्यांनी भरच टाकली होती. त्या जसा आपल्या राज्यात कर सुव्यस्थित गोळा करीत तसाच पेशवे दरबारी पाठवायचा पैसा त्यांच्या इतका नियमित कोणीच पाठवत नसे. म्हणूनच हिशोबाला कर्दनकाळ असणारे पेशव्यांचे मुख्य कारभारी नाना फडणवीस देखील अहिल्याबाईंविषयी पूज्यबुद्धी बाळगीत असत.

अहिल्याबाईंच्या पैशाच्या दोन प्रकारच्या व्यवस्था असत. एक दौलतीचा कारभार तर दुसरा खाजगीचा कारभार. खाजगी संपत्तीतून त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केलेली आहेत. खरे तर स्त्रीधनावर त्यांचा अधिकार होता. त्या स्वतःसाठी तो पैसा वापरू शकल्या असत्या; परंतु आपल्या गरजा अतिशय मर्यादित ठेवून अत्यंत साधी राहणी ठेवत त्यांनी स्त्रीधनातील पैशातून दानधर्म केला. लोकांना मदत केली.

या खाजगीच्या पैशातून अर्थात स्त्रीधनातून त्यांनी दानधर्माबरोबरच देवळांचे जीर्णोद्धार, देवळे, धर्मशाळा, घाट बांधणे, अन्नछत्र चालवणे, विहिरी तलाव खोदणे, रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, पाणपोया बांधणे, पक्ष्यांसाठी, पशूंसाठी पाणवठे तयार करणे अशी अगणित धर्मकार्ये, समाजोपयोगी कार्ये केली होती. या कार्यांमुळेच अहिल्याबाईंचे नाव संपूर्ण हिंदुस्थानात मोठ्या आदराने घेतले जाते.

अहिल्याबाई पैशाच्या बाबतीत काटकसरी होत्या परंतु लोभी मुळीच नव्हत्या. त्यांनी आपला नातेवाईक असलेल्या तुकोजी होळकरला खाजगीच्या पैशातून अनेकदा मदत केलेली होती. प्रसंग पडता महादजी शिंदेंना अहिल्याबाईंनी एकरकमी २० लाख रुपये व मोठे सैन्यही पुरविले होते.

त्यांच्या स्त्रीधनावर कित्येक जण संकटातून तरले होते. त्यांनी स्त्रीधनाच्या बळावर बळकट पुण्यांच्या राशी जमवल्या होत्या. यापेक्षा मोठे धन अहिल्याबाईंसाठी कोणते असणार? ते स्त्रीधन पुण्यधनात रुपांतरित करण्याचीच मोठी किमया त्यांना साधली होती. लोकांच्या आशीर्वादाची ही संपत्ती आजही त्यांच्या पदरी जमा होत आहे, हाच त्यांच्या अक्षय स्त्रीधनाचा खजिना आहे, जो शतकानुशतके वर्धमानच आहे.

■

# १७) अहिल्येचा सक्षम कारभार

अहिल्याबाई कारभाराबाबत खूप जागृत होत्या. त्यांनी आपले आयुष्यच प्रजेसाठी वाहून दिलेले होते त्यामुळे त्या प्राणपणाने दौलतीचा कारभार सांभाळत असत. शिवाय 'हे राज्य मल्हारीमार्तंडाचे आहे. मी त्याची सेवक असून इथल्या प्रत्येक कृतीचे उत्तर मला परमेश्वराला द्यावे लागेल' या उदात्त भावनेतून त्यांनी कारभार म्हणजे ईशसेवा व जनसेवा या तत्त्वांवर अधिष्ठित ठेवला.

त्यांनी प्रत्येक विभागाची, शाखेची घडी नव्याने बसवण्यास सुरुवात केली. कारभाऱ्यांना त्यांची कामाची उत्तम विभागणी करून दिली. त्यांच्या कामावर देखरेख करण्याचे, अंमलबजावणी करण्याचे काम कमाविसदारांकडे सोपवण्यात आले. सध्याचा कारभार पाहताना जुन्या कारभार दस्ताऐवज व प्रधानांचाही आढावा घेणे सुरू झाले. त्यासाठी रोजच्या दरबारात जुनी कर्जे, त्यांची परतफेड, चालू खर्च, देवपूजा, नैवेद्याची व्यवस्था अशा पुष्कळ गोष्टींचे आधीपासूनचे हिशोब पाहणे सुरू झाले. त्यावर विचारविनिमय, कारभाराची मते आजमावणे सुरू झाले. अंतिम निर्णय मात्र त्या स्वतः घेऊ लागल्या. त्यामुळे कारभाराची कामकाज घडी व्यवस्थित बसू लागली. प्रजादेखील अशा पारदर्शक प्रजाहिताच्या कारभार पद्धती मुळे सुखाऊ लागली.

परिणामतः अहिल्याबाईंबाबतचा आदर द्विगुणित होऊ लागला. त्यांच्याबद्दलचे प्रेम वाढू लागले. जनतेच्या मनात, वागण्यात उत्साह वाढू लागला. लोक मनापासून आपापल्या कामात जोमाने मेहनत घेऊ लागले. शेतकरी शेतात राबू लागले, बारा बलुतेदार आपापली कामे मन लावून करू लागले. त्यामुळे मालाच्या उत्पादनात कमालीची वाढ होऊ लागली. व्यापार वाढीस लागू लागला. देशाच्या सर्व भागातून व्यापारी आपापला माल घेऊन येऊ लागले.

आयात निर्यात वाढू लागली. उद्योगधंद्यांना चांगले दिवस आले. त्यामुळे आपोआप दौलतीच्या उत्पन्नात, खजिन्यातही चांगली वाढ होऊ लागली. दोन एक वर्षातच महेश्वर हे राजधानीचे ठिकाण एक महत्त्वाचे व्यापारकेंद्र बनले.

अहिल्याबाई जरी दौलतीचा कारभार स्वतः पाहत असल्या तरी त्यांचे लक्ष तुकोजी होळकरांवर सोपवलेल्या लष्करी कारभारावरही असे. सततच्या मोहिमांमुळे तुकोजींना नेहमीच पैशाची गरज भासत असे. स्वत:च्या महालातून येणारे उत्पन्न ते फौजेसाठी वापरू लागले. हिशोबाच्या बाबतीत अतिशय काटेकोर असणाऱ्या अहिल्याबाई पैशांचा हिशोब चोख ठेवत. त्यामुळे त्या तुकोजीला पैशांचा हिशोब मागू लागताच तो हिशोब देण्यास टाळाटाळ करू लागले. अहिल्याबाईंना ते अजिबात मान्य झाले नाही. मल्हाररावांची गोष्टच निराळी होती. ते मोहिमांवर जात, पराक्रम गाजवून पुष्कळ संपत्ती कमवत. फौजेचा खर्च तर ते त्यातून भागवतच असत पण दौलतीच्या खजिन्यातही भर टाकत असत. त्यामुळे होळकरांच्या खजिन्याची समृद्धी दिवसेंदिवस वाढत असे. असा व्यवहार पाहिलेल्या अहिल्याबाईंना तुकोजीचा हा व्यवहार पटण्यासारखा नव्हता. तुकोजीने भर घालण्याऐवजी दौलतीच्या खजिन्याला रिक्त करणेच सुरू ठेवले होते. त्यामुळे अहिल्याबाईंना ते पटतच नव्हते. त्यांनी तुकोजीला ठणकावले. दौलतीपुढे त्यांना कोणीच मोठे नव्हते.

■

# १८) अहिल्येचे पशुपक्षी प्रेम

माणसं माणसांवर मनापासून प्रेम करताना दिसत नाहीत परंतु अहिल्याबाईंचे माणसांवर तर होतेच पण पशुपक्ष्यांवरही नितांत प्रेम होते. त्यांच्या जीवनात त्यांनी या मुक्या जीवांवर जीवापाड प्रेम केले, ते कृतीत आणले. त्यांच्या खाण्यापिण्यासाठी चिरकाळासाठी व्यवस्था केलेल्या दिसून येतात.

यात्रेकरुंसाठी जशा पाणपोया त्यांनी तयार केल्या तशाच पशुपक्ष्यांसाठी पाणी पिण्याचे हौद त्यांनी जागोजागी तयार करून ठेवले. त्या हौदांमध्ये सदैव पाणी भरलेले राहील याची देखरेख व्यवस्थाही त्यांनी लावून दिली. अन्नपाणी या अत्यंत मूलभूत गरजा आहेत. माणसं आपल्यासाठी या व्यवस्था कोठूनही करून घेतात पण या मुक्या जीवांनी कुठे जावे ? याचाही विचार अहिल्याबाईंनी मनापासून केलेला दिसतो.

पशुपक्ष्यांच्या पिण्याच्या पाण्याची जशी व्यवस्था त्यांनी करवून घेतली तशीच त्यांच्या खाण्याचीही दान्याचीही व्यवस्था केली. पक्ष्यांसाठी बारमाही अशी काही शेते राखून ठेवण्याची कल्पना त्यांनी राबवली. किती सुंदर कल्पना आहे ही! पक्ष्यांना कधीही तिथे दाने टिपता येऊ शकत. कोणी हाकलणारे, मारणारे, इजा करणारे नसे. अथवा पक्ष्यांनी नुकसान केलं म्हणून निराशेने हतबल झालेलेही नसे. शास्त्रानुसार आपल्यासाठीच केवळ अन्न नसते, ते आधी इतर सर्वांना देऊन मग आपण भक्षण करावयाचे असते. हे शास्त्र अहिल्याबाईंनी आजीवन पाळले. इतर प्राण्यांसाठी चाऱ्याची व्यवस्था केलेली होती. रस्त्याच्या कडेलादेखील चारापाण्याची व्यवस्था होती. कोणीही तहान भुकेने व्याकूळ होऊ नये ही सहृदयी कल्पना त्यामागे होती.

त्यांच्या दिनचर्येतही देवाला नैवेद्य दाखवून झाला की त्या गाईला गोग्रास दिला जात असे. मग ब्राह्मण भोजन मग भुकेलेल्यांना अन्नदान, मग त्या भोजन ग्रहण करीत असत. त्यांच्या पोटात अन्नाचा घास जाण्याआधी मनुष्य, पशु, पक्षी हे तृप्त होत असत, हे खरं.

गाईवर त्यांची खूप श्रद्धा होती. हिदू संस्कृतीत गोमातेचं स्थान खूप श्रेष्ठ आहे. गोधनावरच पूर्वी श्रीमंती मोजली जाई. गोवंशाचे मानवावर अनंत उपकार आहेत. तिच्या रुपाने आरोग्य संपदा, ऐश्वर्य सारेच मिळते. अशा गोमातेवर त्या जीवापाड प्रेम करत असत. तसेच त्या जिची दररोज पूजा करत असत, ती त्यांची लाडकी श्यामा गाय हिनेही अहिल्याबाईंवर अक्षरशः जीवापाड प्रेम केलं. ज्या दिवशी अहिल्याबाईंची प्राणज्योत मावळली त्याच दिवशी त्या गाईनेदेखील हंबरून हंबरून प्राण सोडले. केवढे हे प्रेम परस्पर प्रेमाचे हे दिव्य प्रतीकच होते.

खरंच अहिल्याबाईमध्ये काहीतरी दिव्य होते, जेथे पशुपक्षीही आवर्जून प्रेमाने नम्र होत असत. धन्य त्यांची पशुपक्ष्यांवरील माया, धन्य ती श्यामा गायही !

■

# १९) माझ्यावर ही स्तुतीसुमने कशाला?

सामान्यत: इतिहासातील कित्येक राज्यकर्त्यांनी आपल्यावर काव्य लिहून घेण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात. कवींना सुयोग्य मान, मोबदला देऊन स्वत:च्या जीवनावर काव्यरचनाही केलेल्या दिसतात. जगाला आपले कर्तृत्व कळावे म्हणून कवींच्या लेखनीला त्यांनी साधन केलेलेही दिसून येते. परंतु अहिल्याबाई या स्वस्तुतीपराङ्मुख,रचकीर्तीपराङ्मुख होत्या. त्या राजसंन्यासिनीच होत्या. राजकारभार पाहत असूनही कशाने म्हणून लिप्त न होणाऱ्या विरक्त संन्यासिनी.

एकदा एका कवीने एक महाकाव्य रचले. ते आपले महाकाव्य घेऊन अहिल्याबाईंच्या दरबारात तो गेला. राजाश्रय मिळवणे हे कवींनाही आवश्यक असे. बरेचदा जाऊनही दरबारातील कामकाजात गढून गेलेल्या अहिल्याबाईंना ते काव्य ऐकण्यास वेळच मिळेना. मग एकदा सुटीच्या दिवशी दुपारी नर्मदाघाटावर अहिल्याबाईंनी त्या कवीमहाशयांना बोलावले. नौकेत बसून त्यांना 'काव्य' ऐकवण्यास सांगितले. कवी कवीमहाशयांना अत्यानंद झाला. त्यांनी लिहिलेले काव्य हे अहिल्याबाईंची स्तुती करणारेच होते. त्यामुळे अहिल्याबाई खुश होऊन आपल्याला बक्षिसी देतील, मानसन्मान करतील असे विचार कवीच्या मनात होते. परंतु स्वस्तुतीवर काव्य ऐकूनही अहिल्याबाईंच्या चेहऱ्यावर कोणतीच खुशी झळकत नव्हती. आनंदाचा पत्ताच नव्हता. त्यांचा चेहरा निर्विकार होता. तरीदेखील संपूर्ण काव्य शांतपणे ऐकून घेतले, नंतर त्यांनी ते काव्य कवीकडून मागून घेतले.

मग हातात घेतलेल्या आपल्याच स्तुतीच्या त्या काव्याची एकेक पान त्या कपाळी लावून नर्मदामाईला अर्पण करू लागल्या. म्हणाल्या, वा! काव्य फार

उत्तम. असा सरस्वतीचा काव्यविलास आम्ही क्वचितच पाहिला, पण हे सुंदर शब्द नर्मदामाईलाच शोभतील. आम्ही मर्त्य माणसे, आम्हाला ही शब्द फुले शोभणार नाहीत.'

अहिल्याबाईंचे हे मोठेपण त्याप्रसंगी कवीला अनुभवायला मिळाले. एवढेच नाही तर निराश झालेल्या कवीला अहिल्याबाईंनी दरबारात बोलावले. आपल्या खाजगी पैशातून द्रव्य व सोन्याचे कडेही बक्षीस म्हणून दिले. शिवाय कवीराजांना त्या म्हणाल्या, पुढील वेळी याल तेव्हा या जगाच्या निर्मात्यावर काव्य करून या.

केवढी ही निस्सीम विरक्ती आणि असीम भक्ती होती. ज्या परमेश्वरामुळे आपण सर्व आहोत त्याच्यापेक्षा कोणीच मोठे नाही. स्तुत्य नाही हा विचार त्या आयुष्यभर जगल्या. स्वत:ची स्तुती तर त्यांना अजिबात मान्य नव्हती. महान माणसे स्तुतीने हरखून जात नाहीत किंवा निंदेने खचूनही जात नाहीत असे म्हणतात ते खरेच आहे.

भगवद्गीतेतील, **'तुल्यनिन्दास्तुतिमौनी'**

हे अहिल्याबाईंबाबत सार्थ ठरते. त्या स्तुतींच्या पलीकडच्या स्तुत्य होत्या. आपण लौकिक त्यांची स्तुती काय करू शकणार !

■

# २०) निष्ठावंत अहिल्या

अहिल्याबाईंची एक ओळख म्हणजे 'निष्ठावंत' अशी होती. किंबहुना निष्ठा म्हणजेच अहिल्या आणि अहिल्या म्हणजेच निष्ठा असे समीकरणच होते. त्यांची निष्ठा प्रजेवर होती. प्रजेसाठी, तिच्या आनंदासाठी आपलं जीवनच त्यांनी वाहून घेतलं होत. अहिल्याबाईंच्या निष्ठेचा एक धागा प्रजेशी तर दुसरा पेशव्यांशी संबद्ध होता असं म्हटलं जातं. पेशव्यांचरणी त्यांची निष्ठा कायम होती. नियमितपणे कराची रक्कम भरणे, युद्धात मदत करणे, पेशव्यांच्या आज्ञेचे पालन करणे, पेशव्यांप्रती स्वामिनिष्ठा बाळगणे हे आयुष्यभर त्यांनी केले. शिवाय दुष्टबुद्धी भाऊसाहेबांना योग्य पद्धतीने धडाही शिकवला. पेशव्यांच्या गादीशी असलेल्या निष्ठेचा धागा त्यांनी कधीच विरू दिला नाही.

होळकर घराण्याशी, कर्तबगार सासरे मल्हाररावांशी तर त्यांच्या निष्ठा एकरूप झालेल्या होत्या. सासऱ्यांच्या प्रजावात्सल्यतेपुढे त्यांनी सती जाणेही रद्द केले आणि होळकर घराणे तसेच प्रजा त्यांच्याही प्राणापलीकडचे सख्य निभावले. वाडवडीलांबाबत नितांत आदर असणाऱ्या अहिल्याबाईंनी त्यांचे नाव आपल्या कर्मांने उज्ज्वलच केले.

त्यांची बालपणापासूनच सर्वाधिक श्रद्धा व निष्ठा होती ती शिवशंकरावर. त्यांचा सारा प्राण शंकरपूजेसाठी एकवटून जात असे. हे राज्य मल्हारी मार्तंडाचे आहे' त्यांच्या या ब्रीदवाक्यातून त्यांची ही निष्ठा झळकते. केवळ सेवेकरी म्हणून या राज्याचा सांभाळ करीत आहोत ही भावना त्यांच्या मनात होती. आपण राज्याची मालकीण असा भावही त्यांच्या निष्ठावंत मनाला कधी शिवला नाही. म्हणूनच तर १२ ज्योर्तिलिंगावर तिच्या निष्ठेचा अभिषेक सातत्याने होत राहिला. 'देव, देश अन् धर्मापायी प्राण घेतलं हाती' हे त्यांच्या बाबतीत सार्थ ठरलेलं होत.

शिवभक्त असल्याने धर्मावर त्यांची प्रचंड निष्ठा होती. संपूर्ण भारतवर्षातील धार्मिक स्थळांच्या ठिकाणी त्यांनी केलेली बांधकामं, जीर्णोद्धार, अन्नछत्रे, विहिरी, पाणपोया, वृक्षारोपण, वाटसरुंसाठी रस्ते, इतर सोयीसुविधा हे धर्मनिष्ठादर्शच होत्या.

दानधर्मावरही त्यांचा प्रचंड विश्वास होता. चांगल्या परिस्थितीत जमेल तेवढे त्या देऊन अजरामर झाल्या. त्यांची निष्ठा आपल्या संस्कृतीवर होती म्हणूनच दैनंदिन जीवनात त्यांनी संस्कृतीचे पालन केले. राज्यात कला व विद्यांचा सन्मान केला, त्यांना आसरा दिला. कलोपासक, विद्यावंतांना मुद्दाम लांब लांबून बोलावून घेऊन महेश्वरात वसवले, ते कला व विद्येवरील त्यांच्या निष्ठेमुळेच.

निष्ठेमुळेच त्यांनी अनेकांना युद्धामध्ये मदत केली. पैसा, सैन्य या दोन्ही गोष्टी त्यांनी पुरविल्या. गोरगरीबांना त्या सढळ हाताने मदत करीत असत. त्यांची निष्ठा सातत्याने केलेल्या कर्मावर होती. त्या सतत लोकोपयोगी कर्म करीत असत. त्या कर्मयोगीच होत्या. कर्मावर प्रचंड निष्ठा पण कर्मावर निरासक्तवृत्ती अशा त्यांच्या कर्म तपस्येची गाथा म्हणता येईल.

त्यांची आणखी एक निष्ठा अंतरात्म्यातून होती ती म्हणजे जन्मभूमीवरील निष्ठा, स्वदेशावरील निष्ठा. देशासाठी, अखंडत्वासाठी, शत्रूंपासून संरक्षणासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केलेले दिसतात. प्रसंगी युद्धालाही त्या उभ्या ठाकलेल्या दिसतात. अशाच प्रकारच्या दृढ निष्ठा ठेवून आपल्यालाही कार्य करावयास हवे, ही प्रेरणा आजही अहिल्याबाईंच्या चरित्रातून मिळते.

■

# २१) अहिल्याबाईंचा दिनक्रम

जीवनाचा सर्वात लघु भाग म्हणजे क्षण. वेळेचं सर्वात लहान परिमाण. आयुष्य वर्षांमध्ये मोजलं जातं, वर्षे दिवसांमध्ये. दिवस तासांमध्ये. जी व्यक्ती आयुष्याच्या क्षणान् क्षणाचा सदुपयोग करते, प्रत्येक तासाचं मोल जाणते तीच व्यक्ती आयुष्य घडवते. अशी आयुष्य घडवलेली माणसं पिढ्यान् पिढ्या जीवनाच्या जडणघडणी साठी दीपस्तंभासारखे ठरतात. अहिल्याबाईंचा दिनक्रमही कौटुंबिक, दौलतीच्या, खाजगीच्या, लष्कराच्या, आकस्मिक अशा सर्वच बाबींकडे पूर्ण वेळ देऊन, वेळेचे सुयोग्य नियोजन करुन लक्ष देत असत.

सूर्यनारायणाच्या उदयापूर्वी भल्या पहाटेच त्यांचा दिवस सुरू होत असे. प्राप्त:स्मरणाच्या वेळीच त्या मनोमन प्रार्थना करत असत की, परमेश्वराने माझ्यावर राज्याच्या जबाबदाऱ्या सोपवल्या आहेत. त्या मला पार पाडायच्या आहेत. माझे कार्य प्रजेला सुखी करणे हेच आहे आणि ते मला मनोभावे करायचे आहे. त्यानुसार त्यांनी आपला दिनक्रमही आखून घेतलेला होता.

सूर्योदयापूर्वी दोन घटका त्या उठत असत. स्नान वैगेरे करून मग पूजा अर्चा करत. त्यानंतर पुराणिकांडून पुराण श्रवण, कीर्तनानंतर ब्राह्मणांची आपुलकीने चौकशी करत. मग त्यांना दानधर्म केला जात असे. भेटीला आलेल्या लोकांच्या भेटीगाठी, अधिकाऱ्यांची हालहवाल विचारत असत. त्यामुळे त्यांना त्या त्या गावची माहिती मिळत असे. रयतेच्या सुखासाठी, गावाच्या भरभराटीसाठी काय काय करायला हवे याचा त्यांना अंदाज येई. हे सारे आटोपून भोजनासाठी निघत. त्यापूर्वी गायीला गोग्रास, देवाला नैवेद्य, ब्राह्मणांना भोजन, गायकांना अन्नदान, भुकेल्यांना भोजन हे सारं उरकून मग त्या स्वतः अतिशय साधे, सात्त्विक व पूर्ण शाकाहारी भोजन घेत असत. मग थोडी वामकुक्षी आणि त्यानंतर दुपारी दोन

वाजता दरबारात येत असत. दरबारातील कामकाज सूर्यास्तापर्यंत चालत असे. मग पुन्हा सायंकाळचे धर्मकर्म चाले. त्या सायंकाळी देवदर्शनासाठी मंदिरात जात, पुराण, प्रवचन ऐकत असत. हे सर्व आटोपून रात्री बेताचेच जेवण घेऊन पुन्हा सदश्वेर कामकाज करीत असत. रात्री अकराच्या सुमारास त्या झोपत असत.

ही दिनचर्या आजारपणाव्यतिरिक्त कधीही चुकली नाही. आमरण त्यांनी ती पाळली. त्यांचा दिनक्रम पूर्ण व्यस्त व वेळेचा सदुपयोग करणारा होता. क्षणही त्या व्यर्थ दवडत नसत. दिनचर्येत धर्मकार्ये, व्यक्तिगत कार्ये, दानादी कर्मे, राज्यकारभार, लष्करव्यवस्था, न्यायदान, प्रजेच्या अडचणी, आंगतुकांच्या भेटीगाठी, सल्लामसलती, युद्ध तरतूद या सर्व बाबींचा समावेश होता.

त्यांची ही दिनचर्चा आदर्श दिनचर्चा होती. त्यांचे नियोजन सूक्ष्म होते. वेळेचे उत्तम व्यवस्थापन त्यांनी केलेले होते. म्हणूनच अहिल्याबाई इतिहासावर आपला ठसा उमटवू शकल्या.

■

# २२) राखीची ओवाळणी

भावाबहिणीचे नाते भारतीय संस्कृतीत अगदी वेदकाळापासून यम-यमी यांच्यापासून चालत आलेले आहे. या नात्याला शुद्ध, सुरक्षक, आत्मीय भावनेची किनार असते. भावाच्या मनात बहिणीच्या सुखाची तर बहिणीच्या मनात भावाच्या सुखाबरोबर उत्कर्षाचीही कामना असते.

आहिल्याबाईंनी ग्वाल्हेरच्या राजाला आणि नेपाळ नरेशालाही आपला भाऊ मानले होते. त्यांनी दोघांनाही राखी पाठवली. दोघानांही खूप आनंद झाला. एवढ्या कर्तबगार बहिणीने पाठवलेल्या राखीने दोघांनाही समाधान वाटले. त्यांनी अहिल्याबाईंना राखीसाठी प्रेमाची भेट द्यावी असे ठरवले. त्यांनी अहिल्याबाईंना विचारले, आपल्याला जे हवे ते आम्ही राखी भेट म्हणून देऊ इच्छितो. त्यांनी ही मग नि:संकोचपणे मागितले.

अहिल्याबाईंनी या दोन्ही नरेशांकडे नि:संकोचपणे काय मागीतले असेल? त्या म्हणाल्या, हे ग्वाल्हेरनरेशा, उज्जयिनीच्या महाकालेश्वराची पहिली पूजा मला करण्याची इच्छा आहे. काठमांडूच्या नरेशालाही नेपाळच्या पशुपतिनाथाच्या मंदिरातील पहिली पूजा त्यांनी मागून घेतली. शिवशंकराची निःसीम भक्तीच राखीच्या ओवाळणीतून त्यांनी प्राप्त केली. दोन्ही नरेशांनी अगदी आनंदाने अहिल्याबाईंना पहिल्या पूजेचा मान दिला. राखीची ही ओवाळणी अहिल्याबाईंना भरून पावली. राखीचा आशीर्वादही शिवकल्याणकारी ठरला. दोन्ही नरेशांनाही त्यांच्या भगिनीच्या भक्तिभावनेबद्दल आदर निर्माण झाला. त्यांच्या विषयी स्वाभिमान वाटू लागला.

अहिल्याबाईंनी १२ ज्योतिर्लिंगाच्या ठिकाणी देखील पहिली पूजा मागून घेतली. हा नियम आजही पाळला जातो. होळकरांच्याव्दारे नियुक्त पंडे अथवा

पुजाऱ्यांचे वंशज शिवरात्रीच्या दिवशी अथवा इतर उत्सवदिनी या सर्व मंदिरामध्ये अहिल्याबाईंच्या वतीने आजही पूजा करतात. ही पहिली पूजा इतकी शतकं लोटली तरी अहिल्याबाईंच्या नावाने बाराही शिवलिंगाच्या चरणी रुजू होते.

केवढी ही शिवभक्ती ! आपल्या मृत्यूनंतरही या पूजेच्या रूपाने अहिल्याबाई जिवंतच आहेत. त्या शिवनगरीला शिवाच्या सानिध्यात अभिषेकपूजा करतात अन् चिरंतरतेच लेणं लेतात. शिवालयात पवित्रतेच्या रूपात चिरंतर लिंगरूप होतात. एक बिल्वपत्र, नमः शिवाय चा जयघोष आजही अहिल्येच्या मनगाभाऱ्यातून शिवगाभाऱ्यात निनादतो, हीच खरी शिवरात्र, हेच खरे यज्ञछत्र !

■

# २३) नररत्नपारखी अहिल्या

माणसांच्या गराड्यात माणसांचे संरक्षण करावयाचे, शत्रूरुपी माणसांकडूनच, अशा स्थितीत कोण आपला कोण परका हे ओळखण्याचे कसब राज्यकर्त्याला अवगत असावे लागते. कोण प्रामाणिक, कोण दगेबाज हे लक्षात घेता आले पाहिजे. त्यांनी सुरुवातीपासूनच कोणते राजे होळकर साम्राज्याला मित्रत्वाच्या नात्याने मदत करू शकतील, कोण शत्रूंशी सामील होऊन वार करू शकतील हे सर्व ताडण्यास सुरुवात केलेली होती. त्याप्रमाणे माणसांची योग्य ती पारख करून त्यांनी विविध राजेलोकांशी होळकर साम्राज्याशी असलेले नाते संबंध दृढ कलेले होते. कित्येक राजेलोकांनी तर त्यांना आपली बहीण मानले होते. ओवाळणी म्हणून त्यांनी ही तेथील शिवमंदिराच्या प्रथमपूजेची संधी मागितली होती. उज्जैनरेश आणि नेपाळ नरेशांनी महाकालेश्वर व पशुपतीनाथांच्या मंदिराच्या प्रथमपूजेचा मान भाऊबीजेची ओवाळणी, राखीची ओवाळणी म्हणून बहाल केला होता.

त्यांनी आपल्या दरबारातही पारखून, निरखून ठेवलेली माणसे असत. रोज कितीतरी लोकांचा राबता असला तरी त्या सुयोग्य पारख करूनच व्यक्तीला जवळ करीत असत. त्यांचे हेरही तसेच पारखलेले विश्वासू होते. शत्रू चाल करून येण्याच्या बेतात असेल तर हे हेर अहिल्याबाईंना पूर्वकल्पना देत असत. राघोबादादा इंदूरवर चाल करत येणार असल्याची बातमीही त्यांना अशीच आधीच मिळालेली होती..

केवळ हेरच नव्हे तर आजूबाजूच्या सरदारांशी पण त्यांनी सामंजस्याचे धोरण अवलंबून सौहार्दाचे संबंध प्रस्थापित केलेले होते. त्यामुळे संकटप्रसंगी हाक देताच ही मंडळी अहिल्याबाईंना सर्वतोपरी मदत करीत असत. इतर

राज्यांशी चांगले संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून त्यांनी आपल्या विश्वासातल्या वकीलांची नेमणूक तेथे तेथे केलेली दिसून येते. त्यांनी हैदराबाद, श्रीरंगपट्टनम, नागपूर, लखनऊ, कलकत्ता, ग्वाल्हेर, उदयपूर, जयपूर या दरबारी आपले वकील नेमून सर्व राज्यांशी सलोख्याचे संबंध जोडलेले होते. त्यामुळे त्यांना सहस्राक्षी असेही म्हटले जाई.

अहिल्याबाई या सूडबुद्धीने कधीच वागल्या नाहीत. गंगोबा तात्यांनी रघुनाथराव पेशव्यांना हाताशी धरून जे कारस्थान केले ते त्यांनी बुद्धिचातुर्याने उलथवून लावले. पुढे पेशव्यांनी गंगोबातात्यांना अनकाईच्या किल्ल्यात नजरकैदेत ठेवले. सारे कारस्थान थंड झाले, परंतु अहिल्याबाईंनी सूडबुद्धी न ठेवता गंगोबातात्याला निघून गेल्यावर त्यांच्या कुटुंबीयांना जराही त्रास दिला नाही. उलट गंगोबा तात्यांच्या मुलाला यशवंत गंगाधर याला त्यांनी पुण्याला पेशवेदरबारी आपला वकील म्हणून नेमले.

तुकोजी होळकर दिवाण नारो गणेशामुळे बेताल होत असे. १७८०-८१ साली त्यामुळे अहिल्याबाई व तुकोजीत फारच ताण निर्माण झाला होता. सतत पैसे घेणे, कर्जरूपात घेणे हेही राज्याच्या दृष्टीने बरोबर नव्हते. तुकोजीने महादजी शिंद्यांना मध्यस्थी घालून बोलण्यास सांगितले पण, ''तुकोजीच्या स्थितीला तो स्वतःच जबाबदार आहे. माझ्याजवळ पैसा नाही. त्याच्या दौलतीपैकी कवडी जरी माझ्याकडे निघाली तर मी पाचपट देईन. माझा उदरनिर्वाहही मी माझ्या पैशावर करते असे असूनही त्याला तंटाच करायचा असेल तर दारुगोळा माझ्याजवळही आहे, हे ध्यानी असावे.'' असे परखड उत्तर त्यांनी महादजींना दिले. पुढे नारो गणेशाला उथळ विचारी तुकोजींनी पश्चातापाने अमानुषपणे छळले पण अहिल्येला हे पसंत पडले नाही. त्यांनी नारो गणेशाच्या मुलाला व सुनेला फार नम्रतेने वागवले.

मराठी राज्याचा मुख्य शत्रू दिल्लीचा बादशहा वजीर नजीबखान रोहिला याला मल्हाररावांनी जे अभय दिले होते ते त्यांना अजिबात आवडले नव्हते. त्या

मल्हाररावांना म्हणाल्या, ''आपले महत्त्व टिकावे म्हणून तुम्ही प्रत्यक्ष दुश्मनाला अभय द्यायचे?''

एकदा महादजी शिंदे म्हणाले, ''बाई, मी आणि तुकोजी तुमच्यावर चाल करून आलो तर काय कराल तुम्ही?'' अहिल्याबाईंनी तात्काळ उत्तर दिले, ''खुशाल चालून या, सून आहे हे ध्यानात ठेवा.''

कोणाला गोडीगुलाबीने तर कोणाला कणखरपणे त्यांनी वश ठेवले होते. माणसांच्या भेदवृत्तीला त्यांनी कधीच थारा दिला नाही. पैशाचे गैरव्यवहार त्यांनी खपवून घेतले नाहीत. उधळमाधळ त्यांनी केले नाही. उलट हिताने, काटकसरीने पैशांचा व्यवहार त्या करीत असत. देणे चोखपणे देत असत पण कोणाला दौलत अयोग्य पद्धतीने उधळू दिली नाही.

कोणाला शब्दांनी तर कोणाला शस्त्रांनी त्या गारद करीत असत. राज्यावर कसलेही संकट त्यांनी येऊ दिले नाही. परकीय शत्रूंसोबतच आपल्या आप्तस्वकीयांवरही त्यांनी अंकुश ठेवला होता. राज्य हे सर्वतोपरी आहे, राज्याच्या हितापेक्षा कोणाचेच हित श्रेष्ठ नसते ही त्यांची विचारधारा होती. म्हणूनच त्या नररत्नांच्या पारखी होत्या असे म्हणावे लागेल. मातब्बर, मुरलेल्या राजकारणी धुरंधरांनादेखील त्यांनी योग्य त्या शब्दांनी समज देत बंड करू दिले नाही आणि अंमलातही ठेवले. परंतु हे सर्व करताना त्यांनी कोणाचा अपमानही होऊ दिला नाही. कोणाचा छळही होऊ दिला नाही.

माणसं पारखणं, माणसांना जपणं, जोडणं, संबंध सुधारणं यात त्या सिद्धहस्त होत्या हे खरं !

■

# २४) दानशूर अहिल्या

**'दानेन पाणिनतु कङ्कणेन'** अर्थात दान केल्याने हात शोभून दिसतो. कंकणाने नव्हे, ही उक्ती अहिल्याबाईंच्या बाबतीत सार्थ ठरते. त्या आपल्या संपन्नतेच्या आविर्भावात कधीच दुष्ट वागल्या नाहीत. उलट आपल्याकडे जे काही आहे ते गरजूंना, पात्र व्यक्तींना, गोरगरिबांना त्या दान देण्यातच धन्यता मानत असत.

अन्न, पाण्यापासून ते सुवर्ण, धन वित्तापर्यंत त्यांनी दान केलेले आहे. दानधर्मातून त्यांनी आपले जगणे आणि मरणे सार्थक केलेले दिसते. हा दानधर्म त्या आपल्या खासगीतून करत असत. हे एक वैशिष्ट्य. एखादी स्त्री उंची वस्त्रे, दागदागिने, हौसमौजेत धन्यता मानत राहिली असती परंतु एका राज्याची ही सम्राज्ञी दानशूरपणाचं उंची वस्त्र लेत अंगावर मात्र साधसुधं सुती लुगडं धारण करीत असे. तिच्या गळ्यात दानातून मिळालेल्या कीर्तीच्या माळा लोकांना अमूल्य दागिन्यांप्रमाणे भासत असत.

रोज सकाळी नैवेद्यानंतर गोग्रास, ब्राह्मणभोजन, ब्राह्मणांना भिक्षा दान केल्यानंतर गोरगरीब, भुकेलेल्यांना त्या अन्नदान करीत, वस्त्रदान करीत. थंडीत गोधड्या, घोंगड्या देऊन मायेची पाखर त्या गरजूंना घालत असत. पशुपक्ष्यांसाठी कितीतरी शेतं त्यांनी राखून ठेवली होती. नर्मदेतील माशांना रामनामाच्या कणकेच्या गोळ्या देण्याची व्यवस्था त्यांनी कायमस्वरूपी लावलेली होती.

मूळच्या धर्मशील असणाऱ्या अहिल्याबाईंनी संपूर्ण हिंदुस्थानातील देवळांच्या बांधकामांसाठी, जीर्णोद्धारांसाठी, धर्मशाळा, घाट बांधणे, अन्नछत्रांसाठी, विहिरी व पाणपोया बांधण्यासाठी, विद्वान, पंडितांना बक्षिसी

देताना त्यांनी अपार द्रव्य खर्च केले. उपासतापास, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा व दानधर्म हाही त्यांना आहार निद्रेइतकाच महत्त्वाचा वाटे.

परोपकार बुद्धीने त्यांनी केलेल्या दानधर्माला तोडच नव्हती. गोरगरिबांचा नित्य परामर्श हे त्यांचे वैशिष्ट्य होते. संस्कृत नाटककार भासाने कर्णभारम् या त्याच्या नाटकात म्हटल्याप्रमाणे **'हुतं च दत्तं च तथैव तिष्ठति'** म्हणजेच यज्ञात केलेले हवन आणि दिलेले दान हे तसेच कायम टिकून राहते, ते शाश्वत असते. कर्णही दानामुळे शाश्वत कीर्तीस पात्र ठरला अन् अहिल्याबाईही दानधर्मामुळेच कीर्तीस सुपात्र ठरल्या. त्यांचे दान आजही दानशील वृत्तीसाठी प्रेरक ठरते. धनवानांना दानाने अजरामर होण्याचे गमक सांगते.

■

# २५) अहिल्या साक्षात लक्ष्मी

मल्हाररावांनी आपल्या पराक्रमाच्या बळावर जहागिरी कामविली होती. त्यांच्या शौर्याने पेशव्यांनाही आदर वाटू लागला होता. पोटी पुत्र होता खंडेराव. पण शौर्यापेक्षा त्याची मदार व्यसनांवर होती. मनाने जबाबदारीपासून लांब, मदिरा आणि मदिराक्षींच्या विळख्यात खंडेराव रमत होता. राज्याच्या जबाबदाऱ्या, पित्याला लावायच्या हातभारापासून तो कोसो दूर होता. या अशा मुलाला योग्य मार्गावर आणू शकेल आणि होळकर साम्राज्याला भविष्य देऊ शकेल अशीच सून यावी म्हणून मल्हाररावांचे मन तळमळत होते. तेव्हा अचानक एकदा सीनानदी काठी तळ पडला आणि छोटीशी शूरवीर धर्मशील अहिल्या त्यांच्या नजरेत भरली. मनात उतरली. हीच आपली सून असं लक्षात घेऊन त्यांनी खरोखरच लगेच तिला आपली पुत्रवधू म्हणून विवाहानंतर आपल्या घरी आणले. मल्हाररावांनी निवडलेली अहिल्या ही खंडेरावांची केवळ अर्धांगिणीच नव्हती तर ती प्रत्यक्ष लक्ष्मीच होती. लक्ष्मीच्या पावलांनी अहिल्येने होळकरांच्या वाड्यात प्रवेश केला होता.

अहिल्या आली आणि होळकरांच्या घरातली संपन्नता दुप्पट, चौपटीच्या पटीत वाढू लागली. ती धनलक्ष्मी झाली. गोब्राह्मण प्रजाजनांना रोज अन्नाचा घास भरवण्याचा तिच्या रुपात ती धान्यलक्ष्मी होती. संपन्नतेने मूर्त रूप घेतले तर ते कसे दिसेल तर उत्तर होते अहिल्येसम. अहिल्या संपन्नलक्ष्मी होती.

ती वीरांगणा होती. युद्धातील डावपेच, शौर्य ती जन्मजातच शिकून आलेली होती. ती शौर्यलक्ष्मी होती. आयुष्यात कित्येक संकटं, दुःखाचे प्रसंग आले तरी न डगमगता ती मोठ्या धैर्याने उभी होती. ती धैर्यलक्ष्मी होती. मुखावर सदैव हास्याची किनार ठेवलेली ही सुहास्यलक्ष्मी होती.

शिवशंकरावर प्राणापेक्षाही अधिक भक्ती असणारी अहिल्या भक्तिलक्ष्मी होती. आपल्या लाडक्या दैवताबरोबरच तिने सर्व देवादिकांवर आपल्या भक्तीचीही प्रचीती दिलेली होती. ती भक्तीची चरमसीमा होती. ती शक्तीची चरमसीमा होती. ती शक्तीचीही देवी होती. तिने आपल्या बौद्धिक शक्तीच्या जोरावर मी मी म्हणवणाऱ्या शत्रूनांही लोळवल होतं. ती बुद्धिलक्ष्मी होती. आपण शारीरिक क्षमतेनेही श्रेष्ठ आहोत हे तिने अनेकदा युद्धात सहभागी होऊन, युद्धाची पूर्वतयारी करून सिद्ध केलेले होते.

धर्मग्रंथ, साहित्यावरच्या अपार श्रद्धेने त्यांनी आपल्या घरात, मंदिरात, राज्यात इतकंच काय तर साऱ्या हिंदुस्थानात आपल्या साहित्यप्रेमाचा, ग्रंथप्रेमाचा विद्वज्जनांची कदर करून त्यांना पदरी राखण्याचा डंका वाजविलेला होता. ती होळकर घराण्याची लक्ष्मी, इंदूर साम्राज्याची दुर्गा तर अखिल हिंदुस्थानाची सरस्वती होती. तिच्या विविध रूपांनी होळकर साम्राज्य नवरात्रीतील शक्तीच्या जागराप्रमाणे सदैव जागृत असे. आदराचे, निष्ठेचे जागरण अहिल्येसाठी प्रजाजन सदैव करीत असत.

तिच्या सतत कार्य करत राहण्याच्या कर्मनिष्ठ वृत्तीने सारे भारावून गेलेले असत. आपल्याला लाभलेल्या या लक्ष्मीच्या चरणी सारे भक्तीभावाने लीन असत.

होळकर घराण्यात अहिल्येसम लक्ष्मी झाली नाही, पुढेही कोणी ते पद प्राप्त करू शकले नाही. अहिल्याबाई म्हणजेच होळकर स्वराज्याचा संपन्न वारसा, असे सूत्र सर्वमान्य झालेले होते.

■

# २६) शूरवीरांगणा अहिल्या

मल्हाररावांच्या छत्रछायेत अहिल्या एक वीरांगणा म्हणूनही घडली गेली. त्यांच्या सूचना, उपदेश, मार्गदर्शन त्या चातकाप्रमाणे आत्मसात करीत प्राशन करीत असत. मल्हाररावांचेही मोठे भाग्यच होते की, मुलगा नव्हे पण सून मात्र घराण्याचा पराक्रमी वारसा जपण्यास सिद्ध होती. मल्हारावांकडून तिने युद्धातील विविध कौशल्ये, डावप्रतीडाव शिकले होते. अधीनस्थ राजेलोकांना सांभाळण्याचे तंत्रही तिने अवगत केलेले होते; परंतु मल्हारराव जिवंत असेपर्यंत कोणी डोके वर काढलेले नव्हते. त्यांच्या नंतर रामपुऱ्याच्या चंद्रावंतांनी बंड करण्यास सुरुवात केली. त्यांनी विचार केला की, आता मल्हारराव नाहीत तर आपण का अधीन राहावयाचे? शिवाय अहिल्याबाई एक अबला स्त्री आहे, ती काहीही वाकडे करू शकणार नाही. मग त्यांनी अहिल्याबाईंच्या राज्यावर आक्रमण केले.

युद्धकलेत, डावपेचात कुशल असलेल्या अहिल्याबाईंनीही आपल्या सेनापती शरीफभाईला आदेश दिला की, चंद्रावतांनी आमच्या उदारतेला चुकीच्या अर्थाने घेतले आहे. म्हणून ते कमजोर समजून आपल्यावर आक्रमण करीत आहेत. युद्धास सज्ज व्हा. या युद्धाचे संचालन स्वत: अहिल्याबाईंनी केले. चंद्रावतांमध्ये व होळकर सैन्यात तुफान लढाई झाली. चंद्रावतांच्या सेनापतीला सौभाग्यसिंहाला अहिल्याबाईंनी तोफेच्या तोंडी दिले. चंद्रावतांचे बंड मोडून निघाले. होळकरांचा विजय झाला. या घटनेचा विजयोत्सव इंदोर, महेश्वरात तर झालाच परंतु दस्तुरखुद्द पुण्यातही विजयोत्सव साजरा झाला.

मल्हाररावांचा युद्धवारसा तिने त्यांच्यानंतरही चालू ठेवला होता. मल्हारराव हयात असताना ती त्यांच्याबरोबर सरहिंद, बक्सार व कोरे येथील युद्धात जातीने

उपस्थित होती. ही प्रत्यक्ष पाहिलेली युद्धं तिच्यासाठी युद्धकौशल्य आत्मसात करण्याची प्रशिक्षण स्थळेच होती. युद्धातील गनिमीकावे, युद्धसंरचना, उचलावयाची पाऊले या गोष्टी मल्हाररावांकडून ती शिकली.

मल्हाररावांनंतर शत्रूने बंड पुकारले हे समजू शकते पण होळकर साम्राज्यात वर्षानुवर्षे आपली सेवा रुजू करणाऱ्या ज्येष्ठ मातब्बरानींही एकटी स्त्री काय करू शकणार या ठेक्यात अंतर्गत बंडाद्वारे साम्राज्य हडपण्याचे मनसुबे रचले होते. आपले दिवाण चंद्रचूड अर्थात गंगाधर यशवंत चंद्रचूड म्हणजेच गंगोबातात्या यांनीच चाळीस वर्षांची आपली सेवा अधिकारात परिवर्तन करण्याची, सत्ता काबीज करण्याचा कली शिरण्याने रघुनाथरावांना चालून येण्यास निरोप पाठवला. नुकतेच अहिल्याबाईंच्या मुलाचे मालेरावाचे निधन झालेले होते. अशावेळी सासऱ्यांची जागा घेत वडिलांच्या मायेने आधार द्यायचा सोडून राज्य काबीज करण्यासाठी बुद्धी चालवली जाऊ लागली. गंगोबातात्यांचे हे बंड ओळखून त्याला सडेतोड उत्तर द्यायचे ठरवले आणि आपल्या चातुर्याने युद्धाची तयारी पूर्ण केलेली स्त्रीसेना,

शेजारपाजारच्या राजेलोकांची पूर्ण मदत मिळवून देखील युद्ध टाळत त्यांनी रघुनाथरावांना मनसुबे फिरवायला भाग पाडले. एका स्त्रीबरोबर युद्ध करण्यास तुमचा काय मोठेपणा? शिवाय युद्ध हरलात तर मोठीच नामुष्की ओढवेल या अहिल्याबाईंच्या रणनीतीकुशल संदेशाने रघुनाथ दादा पेशवेही हरले. युद्ध न होताच सांत्वनपर भेट घेऊन, अहिल्येचा पाहुणचार व तिची प्रजेतील उच्च प्रतिमा पाहून ते थिटे पडले.

■

# २७) अन्नव्यवस्थापन कुशल अहिल्या

**'अन्नं वै ब्रह्म'** अर्थात अन्न हेच ईश्वरतत्त्व आहे. अन्नाला उतू नये, उपाशी कोणी राहू नये असाच वसा अहिल्याबाईंनीही घेतलेला होता, हे त्यांच्या संपूर्ण जीवनकार्यातून लक्षात येते. त्यांचा वैयक्तिक दिनक्रम पाहिला तरी अन्नासाठी त्यांनी किती सूक्ष्म विचाराने व्यवस्था केलेल्या होत्या हे लक्षात येईल. त्या दररोज सकाळी पुराण, प्रवचन, कथा श्रवण, स्तोत्र पठण, पूजाअर्चा झाली की सर्वप्रथम देवाला नैवेद्य दाखवीत असत. मग त्यांची लाडकी गोमाता तिला गोग्रास दिला जाई, त्यानंतर भूदेव असणाऱ्या ब्राह्मणांना भोजन करविले जाई, त्यानंतर आपल्या राजप्रासादाजवळ कोणी भुकेला, अन्नासाठी व्याकुळलेला नाही ना, गोरगरीब अन्नासाठी तरसत नाही ना याचा परामर्शही त्या जातीने घेत असत. गोरगरीबांची भूक शमवूनच त्या स्वत: अन्नग्रहण करीत असत.

आपल्या आधी सर्वांचे पोट भरतेय ना हे पाहण्याची संस्कृती त्यांच्यात रूजलेली होती. त्या अतिशय धर्मशील होत्या. त्यामुळे दुरदूरुन वेगवेगळ्या धर्मक्षेत्री मंदिरामध्ये दर्शनासाठी येणाऱ्या यात्रेकरूंच्या भोजनांची कायमस्वरूपी व्यवस्थाही झालीच पाहिजे असे त्यांना वाटे. त्यातूनच त्यांनी ठिकठिकाणी अन्नछत्रे उभारली. त्या अन्नछत्रांना भरपूर दान दिले. ते कायम चालावे अशी व्यवस्थाच लावून दिली. आजही त्यांनी सुरू केलेला हा अन्नयज्ञ अखंड सुरू आहे. यात्रेकरू अन्न भक्षणाने तृप्त ढेकर देतात तेव्हा अहिल्याबाईंच्या दूरदर्शीपणाची जाणीव त्यांना पोटातून आल्याशिवाय राहत नाही.

त्याकाळी दूरदूर प्रवासाला जाऊन यात्रा करणे हे सोपे नव्हते. मध्ये मध्ये भोजनाची व्यवस्था असावी म्हणूनही त्यांनी तसे प्रयत्न केलेले होते. माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हा साधा विचार उदात्तपणे त्यांनी जपला त्यांच्या

मर्यादा माणसापर्यंतच न ठरता पशुपक्षी यांच्यापर्यंतही त्या व्याप्त झालेल्या होत्या. पशुंना खाद्य व चारा मिळाला पाहिजे, पक्ष्यांना दाणे नियमित व सहज मिळाले पाहिजेत म्हणून त्यांनी गायरानं, पक्षीरानं राखून ठेवलेली होती. यातून त्यांची भूतदया लक्षात येते. महेश्वरला गेल्यावर नर्मदा माईत स्वच्छंद विहार करणाऱ्या माशांना त्यांनी रामनामाच्या कणकेच्या गोळ्या टाकण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करून दिली होती. जलचर, भूचर वा आकाशचर असोत सर्वांसाठी त्यांनी अन्नाची सुव्यवस्था करून ठेवली होती.

गोरगरीब भुकेला असो, विद्वान पूज्य ब्राह्मण असो, वंदनीय गोमाता असो, इतर प्राणी, पक्षी, जलचर प्राणी असो वा वाटसरू, पांथस्थ, यात्रेकरी असोत सर्वांचा विचार करून अन्नव्यवस्थापन केले होते. कोणालाही अन्नासाठी दाही दिशा भटकंती होऊ नये शिवाय अन्न हेच तारी अन्नाशिवाय तरणं, जगणं नाही म्हणूनच सर्वच सजीवांची ही मूलभूत गरज लक्षात घेऊन अन्नाचे सुव्यवस्थापन कौशल्य त्यांनी अंतःकरणातून जोपासले होते, हे समजते.

त्या अन्नपूर्णाच होत्या सर्वांसाठी. जनसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीज जणू त्यांनी व्रताप्रमाणे सांभाळले होते. जनसेवेची एकही संधी त्या व्यर्थ दवडत नसत. सजीवांच्या मुखी पडलेल्या अन्नाच्या घासाने त्या तृप्तीचा ढेकर देत असत. केवढी ही उदारता ! अंत:करणाची विशालता !

■

# २८) जलव्यवस्थापिका अहिल्या

**'जलमेव जीवनम्'** सजीवांचं जीवन म्हणजेच जल आहे, पाणी आहे. अहिल्याबाईंनी अन्नाप्रमाणेच पाण्याची व्यवस्था ही किती महत्त्वाची आहे हे ओळखलेलं होतं. म्हणूनच केवळ आपल्या राज्यात नव्हे तर संपूर्ण भारतभरात त्यांनी जल व्यवस्थापनेचे नमुने उभे केलेले दिसून येतात.

यात्रेकरुंसाठी, प्रजेसाठी ठिकठिकाणी त्यांनी विहिरी खोदून बांधून घेतल्या. विहिरी, बारवं हे बांधण्यात सुद्धा अतिशय उत्कृष्ट दगडी बांधकामाचा नमुना त्यांनी कलाकारांच्या मदतीने उभा केला. विहीरीत उतरण्यासाठी अतिशय सोप्या, सुंदर रचनेच्या पायऱ्या त्यांनी तयार करून घेतलेल्या दिसतात. त्यांनी बांधलेल्या विहिरी दर्शनीय आहेत.

अहिल्याबाईंनी ठिकठिकाणी तलावं, तळी तयार करून घेतलेली आहेत. यांचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी, शेतीसाठीही झाला. आजही होत आहे. पृथ्वीतलावर गोड्या पाण्याचे साठे हे अत्यल्प आहेत, त्यांचं संवर्धन करण हे खूपच गरजेच आहे. हे पाऊल त्याकाळी सुज्ञ अहिल्याबाईंनी उचललेलं दिसत अन् त्यांच्या दूरदृष्टीपणाचा हेवा वाटू लागतो. नदीवरचे त्यांनी ठिकठिकाणी बांधलेले घाट हे घटकाभर पाहून नजरेत साठवण्यासारखे, क्षणभर विसावण्यासारखे, पूर्वजांना गती देतांना देवांना कृतार्थ भाव प्रकट करणारे ठरतात. हे घाट अहिल्येच्या पवित्र जीवन नदीचे काठंच बनून राहतात हे विलक्षण आहे.

उन्हाळ्यात वाटसरू, यात्रेकरू, पांथस्थांना जागोजागी पिण्याचं पाणी सहज उपलब्ध व्हावं म्हणून त्यांनी पाणपोयांची व्यवस्था केली होती. थंडगार पाणी पिऊन आत्मा तृप्त झाला की प्रत्येकजण अहिल्याबाईंना नकळत आशीर्वाद देत असे. अहिल्येच्या पदरी पुण्याच्या राशी अशाच लोकोपयोगी कामांतून वाढत

होत्या. त्या वाढत वाढत पुण्याचा एक कधीही न ढळणाऱ्या श्लोकच झाल्या, त्या पुण्यश्लोक अहिल्या झाल्या.

त्यांनी केवळ माणसांसाठी पाण्याची व्यवस्था केली नाही तर प्राण्यांसाठीही जागोजागी पाण्याचे हौद, पाणवठे तयार केले. पक्ष्यांसाठीही पाणवठे तयार करवून घेतले. अन्न व पाणी या मूलभूत गरजांकडे त्यांनी सर्वप्रथम आपले लक्ष केंद्रित केलेले होते, जे योग्यच होते. खरं तर राज्यकर्त्याचं हे परमकर्तव्यच असतं, परंतु किती राज्यकर्त्यांनी असे सूक्ष्म विचाराने कार्य केलेले दिसते बरं? अहिल्याबाई त्यामुळेच उत्तम जलव्यवस्थापिकेबरोबरच आदर्श राज्यकर्त्या ठरतात.

वेदपुराणांमध्येही अन्न, पाण्याच्या दानाचे महत्त्व अधोरेखित झालेले दिसते. प्राचीन ग्रंथामधील हा विचारांचा ठेवा त्यांनी कार्यातून अजरामर केल्याचेच दिसते. संपन्न हिंदू संस्कृती ही मानवतावादी विचारांची पाईक आहे, हे त्यांनी जाणलं होतं. त्यांच्यात ती भिणली होती. म्हणूनच त्यांच्या माध्यामांतून वेगवेगळ्या उत्तमोत्तम कार्याच्या रूपाने समृद्ध हिंदू संस्कृतीचं दर्शन आजही जगाला घडतचं. आजही विदेशीयांची पाऊलं अहिल्येच्या कार्यशिल्पांजवळ थबकल्याशिवाय राहत नाहीत. तिचं दर्शन या अनुकरणीय कार्यातून घडल्याशिवाय राहत नाही हे खरं.

■

# २९) न्यायप्रिया अहिल्या

राज्यकर्त्याचं मोठेपण हे त्याने केलेल्या न्यायदानामुळे अधोरेखित होत असतं. त्यांची वागणूकच राज्यकर्त्याचे खरे सामर्थ्य असते. अहिल्याबाईंचा पिंडच न्यायाचा होता. न्यायी वागणूक ही अंगभूतच होती. त्यांची न्यायी वृत्ती ही बाहेरून आत अंगीकारलेली नव्हे तर आतून बाहेर झळकणारी होती. म्हणूनच अखिल हिंदुस्थानात न्यायप्रिया अहिल्या असा त्यांचा बोलबाला झालेला होता.

करव्यवस्थेतूनही तिच्या अंत:करणातील मृदू न्यायी वृत्तीच प्रकट होत असे. आपल्या राज्यात जुलूम जबरदस्ती न करता अगदी नियमानुसार, प्रसंगी सूट देऊन कर गोळा केला जात असे. लोकांकडे कर मागण्या ऐवजी लोक स्वखुशीने कर गोळा करत असत. यातचं अहिल्याबाईंच्या न्यायी व्यवस्थेचा विजय दिसून येतो. बरं लोकांकडून नियमाप्रमाणे गोळा केलेला कर रकमेत अजिबात उधळमाधळ न करता त्यांनी १६ कोटींची संपत्ती आपल्या खजिन्यात गोळा केलेली होती. ही संपत्ती माझी नाही **'इदं न मम'** मी केवळ हिची राखणदार आहे, यावर प्रजेचाच, तिच्या सुखाचाच अधिकार आहे याची विनम्र जाणीव त्यांना होती.

कर गोळा करताना जशी न्यायबुद्धी होती. तसेच पेशवेदरबारी दरवर्षी पाठवायचा पैसा नियमित व नेमका कोणीही पाठवत नसे., तिथेही न्यायबुद्धीच निदर्शित होते. सर्वात आधी अहिल्याबाईंकडून पेशवेदरबारी पैसा पोचत असे. हिशोबात कधीही घोळ नसे. एक दमडी कमी नाही वा अधिक नाही. हिशोबाला एकदम चोख होत्या त्यामुळे खरं तर पेशवेदरबारचे पेशव्यांचे मुख्य कारभारी नाना फडणीस हे हिशेबाच्या बाबतीत कर्दनकाळ समजले जात. खुद्द त्यांनाही अहिल्याबाईंच्या या चोख, नियमित आर्थिक व्यवहारांमुळे पूज्यभाव वाटत असे.

न्यायबुद्धीच्या अहिल्याबाईंनी कधीही सूडबुद्धी बाळगली नव्हती. अगदी आपल्याशी शत्रुत्वाने वागलेल्या शत्रूंबाबतही व स्वमुलुखातील माणसांबाबतही. म्हणूनच तर गंगोबातात्या निघून गेल्यानंतर, त्यांचे राघोबादादांशी संधान सांधून होळकर साम्राज्य आपल्या हाती घेण्याच्या मनसुब्यांना पाणी पाजल्या नंतरही त्यांनी गंगोबातात्यांच्या कुटुंबियांना कधीही त्रास होऊ दिला नाही. उलट वाईट कृत्यांची शिक्षा न देता त्यांच्या यशवंत गंगाधर या पुत्रातील सद्गुण ओळखून त्याला पुण्याला पेशवेदरबारी आपला वकील म्हणून नेमले. केवढी ही उदार न्यायी वृत्ती !

मल्हाररावांच्या, मालेरावाच्या मृत्यूनंतर नातेवाईक असलेल्या तुकोजी होळकरला अहिल्याबाईंनी पेशव्यांकडून सरदारकीची वस्त्रे देवविली. त्याच्यावर त्यांनी विश्वास टाकला होता; परंतु त्याच्या विश्वासघातकी वागण्यामुळे आपले गुडघेही त्यांनी टेकवले नव्हते. तुकोजी तसा नमून वागे परंतु दिवाण नारो गणेशामुळे तुकोजी व अहिल्याबाईंमध्ये १७८०-८१ सालात फारच तणाव निर्माण झाला होता. तुकोजी सतत पैशांची मागणी करत असे. अहिल्याबाई त्याला कर्जरूपात पैसा देत असत पण कर्ज फेडून खजिन्यात भर टाकणे तर लांबच खजिनाच लांबवण्याचा त्याचा इरादा न्यायी वृत्तीने हाणून पाडला होता. मल्हाररावांच्या काळात लढाया, चढाया झाल्या की लुटून आणलेली संपत्ती खजिन्यात जमा होत असे. सरदेशमुखी वैगेरे गोळा करून आणलेल्या रकमेने खजिना वृद्धिंगत होत असे. पण तुकोजीने खजिन्यात भर मात्र कधीच टाकली नाही. उलट पैशांची वारंवार उधारउसणवारी करण्यात त्याला शरमही वाटत नसे; परंतु राज्याच्या दृष्टीने हे बरोबर नव्हते. तुकोजीने शक्कल लढवली आणि ज्येष्ठ महादजी शिंद्यांना मध्यस्थी करण्यास सांगितले तरीही अहिल्याबाई मागे हटल्या नाहीत. त्यांनी स्पष्टपणे ठणकावले, ‘‘माझ्याजवळ पैसा नाही, तुकोजीच्या स्थितीला तोच जबाबदार आहे. त्याच्या दौलतीपैकी कवडी जरी माझ्याकडे निघाली तरी मी पाचपट देईन. माझा उदरनिर्वाह देखील मी माझ्या पैशावर करते.

दौलतीच्या पैशाचा उपयोग मी करत नाही. असे असूनही त्याला तंटा करायचाच असेल तर दारुगोळा माझ्याजवळही आहे हे ध्यानी असावे.''

नारो गणेशाच्या उचकावण्याचे सत्य तुकोजीला भविष्यात लक्षात आल्यावर उथळ विचारी तुकोजीने पश्चात्तापाने अमानुषपणे नारो गणेशांचा छळ केला. हे अहिल्याबाईंना पसंत पडले नाही. त्यांनी नारो गणेशाच्या मुलाला व सुनेला फार ममतेने वागवले.

भिल्ल, गोंड वैगेरे वनवासी लोकांना पण तिने गोडीगुलाबीने वश केले. डाकूगिरी कमी केली. कैदेत असणाऱ्या वनवासी गुंड डाकूंच्या कुटुंबियांना तिने वाऱ्यावर सोडले नाही. त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली आणि गुंड डाकूंना डाकूगिरीपासून परावृत्त केले. प्रसंगी न्यायाने कठोर निर्णय घेत मानसिंगासारख्या डाकूला त्यांनी देहांताची शिक्षाही दिली. तरीपण त्याच्या कुटुंबाची आजीवन काळजीही घेतली. एका व्यक्तीच्या वाईट कृत्याची शिक्षा त्यांनी साऱ्या कुटुंबाला दिली नाही, कुटुंब उघडी पडू दिली नाहीत. शिक्षा देण्याचा अधिकार असलेल्या राज्यकर्त्यांनी शिक्षा झालेल्यांच्या कुटुंबाची जबाबदारी उचलली पाहिजे ती त्यांची नैतिक जबाबदारी असते हा अमूल्य संदेश तिने आपल्या कृतीतून दिला. धन्य ती न्यायनिष्ठावती अहिल्या !

होळकरांच्या साम्राज्याकडे वाकडी नजर रोखणाऱ्यांचे बंडही त्यांनी फौजांच्या जोरावर मोडून काढले. रामपुऱ्याचे बंड मोडले तसेच मेवाड भागातील चंद्रावताचे बंडही मोडून काढले. ही बातमी पुण्यास कळली तेव्हा नाना फडणवीस गौरवोद्गार काढत म्हणाले, ''आजपावतो बाईंची धर्मकृत्येच आम्ही एकत होतो. पण आज पराक्रमाची गोष्टीही मोठीच केली. '**शापादपि शरीदपि**' अशी हीच एक बाई आहे.''

माणसांना पारखतानाही पूर्ण न्यायबुद्धी जागृत असे. राज्यासाठी प्राणपणाने रुजू करू शकतील अशी माणसे त्या पूर्णपणे निवडून घेत. आपल्या राज्यावर संकट येऊ नये, परराज्यातील राजेलोकांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत

म्हणून तिने हैदराबाद, श्रीरंगपट्टनम्, नागपूर, लखनऊ, कलकत्ता, ग्वाल्हेर, उदयपूर, जयपूर इ. ठिकाणच्या दरबारी आपले वकील नेमले होते. सहस्त्राक्षी होऊन आपल्या राज्याला आजीवन न्याय देणाचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो.

राज्यासंबधीचे छोटे निर्णय असोत वा मोठे त्यांची न्यायबुद्धी सर्वत्र समान न्यायाने उभी राहत असे. पैशांबाबत ती काटकसरी होती पण लोभी अजिबात नव्हती. खरगोण गावातील घटना याची साक्ष देण्यास पुरेशी आहे. खरगोण गावात तापीदास व बनारसीदास हे दोन सावकारबंधू मागोमाग मरण पावले. दोघेही निपुत्रिक होते. त्यांची दोन लाखांची संपत्ती अहिल्याबाईंना राज्यरक्षणासाठी द्यावी असे तापीदासच्या बायकोला वाटले. तिने तसे अहिल्याबाईंना कळवलेही पण निर्लोभी, निस्वार्थी अहिल्याबाईंनी ते धन न स्वीकारता तिला दानधर्म करण्यास सुचविले. मग या सूचनेचा आदर करीत तापीदासच्या बायकोने खरगोणच्या नदीला घाट बांधून गणपतीचे देऊळ बांधले. अहिल्येने आणखी एक अहिल्या तयार केली.

आणखी एक घटनाही अशीच न्यायप्रियतेची साक्ष देणारी आहे. सिराजचा सावकार निपुत्रिक मरण पावला. त्याच्या पत्नीने दत्तक घेण्याचे ठरविले पण तेथील कमाविसदाराने तिच्याकडे तीन लाख रुपयांची मागणी केली. तिने ते पैसे न दिल्यास सर्व संपत्ती सरकार जमा करण्याची तिला धमकीही दिली. तिने अहिल्येकडे धाव घेतली, पदर पसरला, न्याय मागितला. अहिल्येने ताबडतोब दत्तक वारस मंजूर केला आणि भ्रष्ट कमाविसदाराला कामावरून दूर करत योग्य न्याय केला.

खासगी पैशातून न्यायबुद्धीने तुकोजी होळकरला जशी अनेकदा मदत केली तशी राजेरजवाड्यांना प्रसंगी आर्थिक साहाय्य केले. महादजी शिंद्यांनाही एक रकमी वीस लाखांची रोकड व मोठे सैन्य मदत म्हणून पुरविले. या न्यायाची जाण न ठेवता तुकोजीच्या बोलण्यात येऊन एकदा महादजी शिंदे अहिल्येला म्हणाले, ‘‘अहिल्याबाई, तुकोजी आणि मी मिळून तुमच्यावर चालून आलो तर तुम्ही

काय कराल?'' क्षणाचाही विलंब न लावता अहिल्येने उत्तर दिले, ''खुशाल चालून या, परंतु तुमची सून आहे हे ध्यानात ठेवा.'' तिच्या या मुत्सद्देगिरीपुढे महादजीही नरमले.

अहिल्याबाईने आपल्या स्वतःच्या स्त्रीधनाचाही यत्किंचित सुद्धा मोह ठेवला नाही. सारे सारे स्त्रीधन लोकोपयोगी कामात खर्च करीत पुण्याची धनकमाई केली. दूरदूरच्या विद्वान, पंडित, तज्ज्ञ मंडळींना कायम न्याय देत तिने सन्मानाने आपल्या राज्यात वसविले. विद्येची नगरी म्हणून महेश्वराला नावारूपास आणले. अल्पावधीतच महेश्वर नगरी विद्यानगरी प्रमाणेच कलेची नगरी म्हणूनही उदयास आली. उत्तमोत्तम कलाकारांना तिने मुद्दाम आपल्या पदरी सोयीसुविधा देऊन आश्रमात ठेवले. कलेचे उत्तम नमुने निर्माण केले. भारतीय श्रेष्ठ कलांना नवजीवन दिले. दानधर्मातही सातत्याने न्यायी वृत्ती दिसून येते. थंडीच्या दिवसात कंबळे, गोधड्या, घोंगड्या देत गोरगरिबांना मायेची ऊब त्या देत असत. अन्नदानाने त्यांना सदैव तृप्त करीत असत. दानाबाबत कोणताही भेदभाव त्यांनी केला नाही. ना कधी धर्म, पंथ, भाषा, प्रदेशावरून भिन्नता ठेवली. संपूर्ण भारत देशाला एक सूत्रात बांधणाऱ्या अहिल्याबाईंनी समान न्याय वापरला. भारत अखंड ठेवला.

एखाद्या कवीने आपल्यावर लिहिलेले काव्य नम्रपणे मस्तकी लावत नर्मदामाईला अर्पण केले अन् जगन्नियंत्यावर काव्य लिहून आणावे, आपली प्रतिभा माझ्यासारख्या मर्त्य व्यक्तीच्या स्तुतीत वाया दवडू नये असा सल्लाही दिला. परंतु राजदरबारात बोलावून योग्य ती बक्षिसी देऊन त्या कवीचा सन्मानही केला. कवी मोरोपंत असोत वा शाहीर अनंत फंदी यांसारख्या अनेक क्षेत्रातील दिग्गजांचा सन्मान न्यायबुद्धीने त्यांनी राखला.

आपल्या जावयाच्या मृत्यूनंतर त्यांना न्याय देत महेश्वरात फणसे गल्लीही वसवली. मुक्ताबाई या आपल्या कन्येच्या नावाने देऊळ बांधवले. आपल्यातून गेलेल्यांनाही आपल्या परीने तिने न्याय दिला.

यात्रेकरूंची संपूर्ण व्यवस्था ठेवली. पशुपक्ष्यांनाही पूर्णपणे न्याय दिला. आपल्या जगण्याने होळकर साम्राज्याला पूर्ण न्याय देणाऱ्या अहिल्येने मरेपर्यंत न्यायाचा मार्ग सोडला नाही. न्यायी वर्तन करताना जीवनमरणाचाही तिने विचार केला नाही. कितीही संकटे आली तरी न्यायाचा मार्ग तिने कधीच सोडला नाही. न्यायाबाबत ती कधीच डगमगली नाही. **''न्यायात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः''** अर्थात धैर्यशाली माणसे न्याय मार्गावरून कधीच आपले पाऊल ढळू देत नाहीत, हे संस्कृत सुप्रसिद्ध कवी भर्तृहरीच्या नीतिशतकातील सुवचन अक्षरश: जगल्या. शतके उलटली तरी शेकडो न्याय मार्ग त्यांनी जे चालून गेल्या ते इतरांनाही त्याच मार्गावरून चालत येण्यास खुणावत आहेत हेच आपले भाग्य आहे, अहोभाग्य !

■

# ३०) अजरामर अहिल्या

काही व्यक्तिमत्वं ही आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाने आपल्यानंतरही या जगताला प्रेरक ठरतात, अजरामर ठरतात. ते कार्य कधीच संपत नसते. ते इतरांनाही कार्य करण्यास प्रवृत्त करत असते. अहिल्याबाईंचेही व्यक्तिमत्व तसेच होते. त्यांच्या कार्याचा सुगंध आजही दरवळत आहे.

त्यांचा आदर्श राज्यकारभार, त्यांचे युद्धातील शौर्य, दुःखद प्रसंगी व संकटकाळी त्यांनी दाखवलेले धैर्य, कितीही संकटे आली तरी न डगमगता त्यांच्यावर केली मात, प्रत्यक्ष युद्ध न करताच शत्रूंना नामोहरम करणारी त्यांची युद्धनीती, प्रसंगी स्त्रीसेनेची निर्मिती करून वीरांगणेचा धारण केलेला अवतार, असंख्य अशी लोकोपयोगी कार्ये, अन्नदान, अन्नव्यवस्थापन, अन्नछत्रांची निर्मिती व अखंडपणे चालवण्याची निर्माण केलेली व्यवस्था, जलव्यवस्थापन; विहिरी, तलाव बांधणे, गुराढोरांसाठी पाण्याचे हौद बांधणे, पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणं, पशुपक्ष्यांसाठी चारादाण्याची व्यवस्था करणं, खास पक्ष्यांना टिपण्यासाठी शेते राखून ठेवणं, नर्मदेतल्या माशांना रामनामाच्या कणकेच्या गोळ्याची व्यवस्था करणं, गोरगरीबांचा रोज परामर्श घेणं, त्यांना अन्नदान करणं, वस्त्रदान करणं, सर्वतोपरी मदत करणं, थंडीत गरम कपडे, घोंगड्या दान देणं. विद्वान, पंडितांची कदर करत त्यांना सन्मानाने वागवणं, दूरदूरच्या विद्वानांना बोलावून आपल्या पदरी नियुक्त करणं, मंदिरांची व्यवस्था सोपवणं, दौलतीचा व खासगी पैशांचा चोख हिशोब ठेवणं, पैशांच्या बाबतीत उदामादा करता काटकसरीने खर्च करणं, प्रसंगी युद्धात शेजारपाजारच्या लोकांना एकरकमी मदत करणं. शत्रूंचा बंदोबस्त करण्यासाठी सदैव सतर्क असणं, यासाठी माणसांची उत्तम पारख असणं, राज्याच्या हितासाठी कोण योग्य कोण अयोग्य हे निवडणं,

आपल्या राज्यावर, शंभूमहादेवावर, स्वामी पेशव्यांवर नितांत श्रद्धा असणं, प्रजेवर पुत्रासम वत्सलता असणं, कायद्याचे काटेकोर पालन करणं, कालानुरूप काही कायद्यांमध्ये सुधारणा वा बदल करणं, प्रसंगी राज्यहितास्तव व लोकहितास्तव कठोर निर्णय घेणं, मानरुपसिंगसारख्या डाकूला देहांताची फाशी सुनावण्यापर्यंत सुयोग्य कठोर पाऊलं उचलणं; **'बहुजनहिताय बहुजनसुखाय'** अशी आयुष्यभर धडपड असणं, राष्ट्रीय एकात्मता संवर्धक सर्व कार्ये पार पाडणं, सामाजिक कार्याचा उच्चांक गाठणं; शत्रुंजया अशा अहिल्याबाईंचे जीवनकार्य पाहिले की त्यांच्या चिरंतनत्वाची साक्ष पटते.

कार्य रूपात त्या आजही आपल्यातच आहेत. सतत चांगल्या कार्यासाठी खुणावत आहेत, असेच वाटते. अजरामर अहिल्याबाईंचे अजरामर कार्य दीपस्तंसम अद्यापि प्रेरक ठरते यातच त्याच्या प्रचंड कार्यसामर्थ्याचे यश आहे.

■

# ३१) अहिल्येची जन्मकुंडली

**'अहिल्याचरितम्'** या संस्कृत काव्यग्रंथाचे कवी संस्कृत महाविद्यालय इंदौर येथे प्रध्यापक असलेले पंडित सखाराम शास्त्री भागवत हे आहेत. आपल्या विद्वान पित्याच्या मार्गदर्शनात त्यांनी आपल्या बाल्यकाळातच प्राचीन संस्कृत काव्यग्रंथांचा गहन अभ्यास केला. त्यांच्या या काव्यशास्त्राच्या व प्राचीन काव्यांच्या अध्ययनाचा प्रभाव **'अहिल्याचरितम्'** मध्ये दृष्टीस पडतो. महाकवी भवभूती यांचे संस्कृत काव्य सखाराम शास्त्रींचे प्रेरक होते. **'अहिल्याचरितम्'** हा ग्रंथ देखील दुर्मिळ लेख तसेच शिलालेखांच्या आधारे लिहिला गेलेला आहे. त्यामुळे अहिल्याबाई होळकरांच्या काळाच्या इतिहासाचे गहन अध्ययन या ग्रंथात, या महाकाव्यात सापडते, जे साधारणपणे त्याकाळच्या अध्यनकर्त्या वा संशोधकांनाही प्राप्त होत नाही.

अहिल्याबाईंच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांच्या संबंधात तिथी, ग्रह, नक्षत्रादी माहिती या काव्यग्रंथात प्राप्त होते, जसे की अहिल्याबाईंच्या जन्मतिथीबाबत सर जॉन मॉलकमने जो संभ्रम निर्माण केला आहे, तो या काव्यातील पुढील श्लोकांवरून दूर करता येतो.


या काव्यात अहिल्याबाईंची जी जन्मकुंडली दिली आहे त्यानुसार त्यांचा जन्म दिनांक ज्येष्ठ वद्य ७ ( मराठी पंचांगानुसार वैशाख कृष्ण ७) शके १६४७ (दिनांक ३१ मे १७२५) ही ठरते.

**श्री शालिवाहन शके गिर्याब्धिरसभूमिते ।**
**काल्पिते ज्येष्ठवद्ये च सप्तम्यमरुणोदये ।।१।।**
**बुधे रवौ शुक्रे, तुर्वे चन्द्रे शनौ सुते ।**
**सप्तमे दशमे गुरौभाग्ये सकेतुके ।।२।।**

**अस्मिन्ननुमिते काले माणकोजीवधूः ।**
**कन्याप्रासूत रुचिका सुधारिन्दुकलामिव ।।३।।**

अहिल्याबाईंच्या जन्मपत्रिकेत लग्नी स्वगृहीच्या बुधाद्वारे भद्र योग, दशमभावातील स्वगृही गुरुद्वारे हंसयोग तसेच चतुर्थभावातील चंद्र व दशमभावातील स्वगृही गुरुद्वारे गजकेसरी योग निर्माण झालेले दिसून येतात. भद्र योगामुळे त्यांना तीव्र बुद्धिमत्ता, भाषणपटुत्व, सात्त्विक विचाधाराल शास्त्रांच्या जाणकार, धैर्यशालिनी, निर्णयक्तीक्षम कुशल प्रशासक बनविले. तर हंस योगामुळे त्या अंत्यंत बुद्धिमान ठरल्या. दर्शनीय ठरल्या. गजकेसरी योगामुळे त्यांना ऐश्वर्य प्राप्त झाले. अहिल्याबाईंची जन्मपत्रिका पुढीलप्रमाणे,

**जन्मलग्नकुंडली**



# ३२) अहिल्याबाईंच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम

त्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सर्व महत्त्वपूर्ण घटना पुढे इसवी सन वार नमूद केलेल्या आहेत. त्यांचा शासनकाळ इ.स. १७६७ ते १७९५ पर्यंत होता, हे लक्षात घ्यावे.

| अ.क्र. | घटना | इ. स. |
|---|---|---|
| १) | चौंढी ग्रामी, पूर्वीचा बीड जिल्हा सध्याचा अहमदनगर जिल्हा, महाराष्ट्रात माणकोजी शिंदे आणि पत्नी सुशीलाबाई यांच्या पोटी जन्म | वैशाख कृष्ण ७ ३१/०५/१७२५ |
| २) | माळव्याचे सुभेदार मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेरावांसोबत पुण्यात विवाह | १७३३ |
| ३) | अहिल्याबाईंचा पुत्र मालेरावाचा जन्म | १७४५ |
| ४) | कन्या मुक्ताबाईचा जन्म | १७४८ |
| ५) | राजस्थानातील कुंभेरी येथे तोफगोळ्याने पती खंडेरावांचा मृत्यू, अहिल्याबाईंची सती जाण्याची तयारी परंतु सासरे मल्हाररावांकडून व्याकूळतेने त्यांना अडवणे आणि मग सती जाण्याचा निर्णय रद्द करणे. | २४/०३/१७५४ |
| ६) | सासू गौतमाबाईंचा मृत्यू | २९/०९/१७६१ |
| ७) | सासरे सुभेदार मल्हारराव होळकरांचे मध्यप्रदेशातील आलमपूर जिल्ह्यातील भिंड येथे निधन | २०/०५/१७६६ |
| ८ ) | पुत्र मालेरावाला सुभेदारीची वस्त्रे, अधिकार मिळवून देणे | २३/०८/१७६६ |

| | | |
|---|---|---|
| ९) | पुत्र मालेरावाचा मृत्यू, स्वतः कारभार सांभाळणे, नातेवाईक तुकोजी होळकरांना पेशव्यांकडून माळव्याच्या सुभेदारीची वस्त्रे मिळवून देणे. राघोबादादांचे इंदोरवर आक्रमण तसेच युद्धाविना केवळ बौद्धिक कुशलतेच्या व निडरतेच्या बळावर त्यांना परतवून लावणे तसेच कन्या मुक्ताबाईला नाथोबा नामक पुत्राची प्राप्ती होणे. | १७/०३/१७६७ |
| १०) | नातू नाथोबाचा विवाह | १७८० |
| ११) | बंधू शहाजी शिंदेंचा मृत्यू | १७८४ |
| १२) | बंधू महादजी शिंदेचा मृत्यू | १७८६ |
| १३) | नातू नाथोबाचा अकाली मृत्यू, त्याच्या पत्नींचे सती जाणे | १५/११/१७९० |
| १४) | जावई यशवंतराव फणसेंचा आकस्मिक मृत्यू व मुलगी मुक्ताबाईचे सती जाणे. | ०३/११/१७९१ |
| १५) | महेश्वरात श्रावण १४ शके १७१७ ला स्वर्गवास | १३/०८/१७९५ |

■

# ३३) अहिल्यादेवींचे वाङ्मयीन कार्य (इ. स. १७६७ ते १७९५)

बालमनावर कोरल्या गेलेल्या अहिल्याबाईंबाबत सुप्रसिद्ध मराठी कवयित्री सौ. शांताबाई शेळके जे वर्णन करतात ते आपल्या प्रत्येकाच्या बालमनावर ठसलेले असते. त्या म्हणतात, अहिल्याबाई होळकर या पुण्यश्लोक साध्वीशी आपला परिचय कसा होत गेला याचा मी विचार करू लागले आणि मन एकदम अगदी भूतकाळात गेले. मग डोळ्यांपुढे आलेले अहिल्याबाईंचे एक चित्र, तेही शाळकरी जीवनात शाळेच्या क्रमिक पुस्तकात पाहिलेले. अहिल्याबाईंचे ते मला झालेले पहिले दर्शन. डोक्यावरून घेतलेला पदर, सरळ भांगाखाली कपाळावर कुंकवाची बोटभर आडवी चिरी, हातात घेतलेले पार्थिव लिंग आणि त्यावर हातानेच धरलेली बेलपत्रे, असे त्या चित्रात पाहिलेले अहिल्याबाईंचे सरळ सात्त्विक रूप मनात एकदम भरले. खरे तर त्यावेळी अहिल्याबाईंचे इतिहासामधले स्थान, त्यांचे कर्तृत्व, त्यांचे औदार्य किंवा त्यांचे करुण वैधव्य कशाचाच काही पत्ता नव्हता. तो सारा इतिहास फार नंतर कळला. पण अहिल्याबाईंनी मनाशी प्रथम जवळीक साधली ती त्या चित्रातून. आजही अहिल्याबाई होळकर हे नाव आठवले की, प्रथम तेच रूप डोळ्यासमोर उभे राहते.

शांताबाईंनी वर्णन केलेली त्यांच्या मनाची स्थिती आपल्या सर्वांसारखीच आहे. इतक्या साध्या शब्दात त्या चित्रातून साकारलेल्या भावना शांताबाई मांडतात पण त्यापेक्षाही ते चित्र अहिल्याबाईंच्या सात्त्विक, धार्मिक, सज्जन वृत्तीचे निदर्शक ठरते, नि:शब्दपणे पण शब्दांनाही थिटे पाडत.

अहिल्याबाईंनी धर्म म्हणजेच कर्तव्य या व्याख्येला पूर्णतः न्याय दिलेला दिसून येतो. आपले जीवनकर्तव्य पार पाडत असताना या श्रेष्ठ साध्वीने धर्म,

संस्कृती व साहित्य या क्षेत्रातही विशेष कार्य करून ठेवलेले दिसून येते. साहित्य आणि संस्कृती हे समाजमनाचा आरसा असतात त्यानुसार तत्कालीन समाजमनाचे प्रतिबिंब तर दिसतेच पण अहिल्याबाईंचे पवित्र प्रतिबिंब त्यात अजरामर झालेले दिसून येते.

चौंडीच्या माणिकराव शिंद्याची ही लेक लग्नानंतर मल्हारराव होळकरांच्या नामवंत घराण्यात आली खरी पण नशिबी संसारसुखाची उणीव घेऊनच. पतिनिधनानंतर सती जात असताना सासऱ्यांनी थांबविले आणि कालचक्रावर एक स्त्रीरत्नाने आपले नाव उत्तुंग कार्याने कोरून ठेवले. सती होता होता अहिल्याबाईंचं जीवन साध्वीत रुपांतरित झालं. संयमी, विरक्त, सेवाभावी व धर्मशील वृत्तीने संपूर्ण आयुष्य व्यतीत केलं. या साध्वीने राज्यकारभार तर चोख केलाच परंतु इतिहास त्यांना लक्षात ठेवतो तो त्यांनी बांधलेल्या मंदिरे, नदीघाट, धर्मशाळा यांमुळे तसेच त्यांच्या भरभरून दानवृत्तीने. संस्कृत नाटककार मासाने कर्णभारम् या त्याच्या कर्णाच्या जीवनावरील नाटकात एक त्रिकालाबाधित सत्य सांगणारे सुवचन लिहून ठेवले आहे. तो म्हणतो, **'हुतं च दत्तं च तथैव तिष्ठति'** यज्ञात दिलेली आहुती आणि दिलेले दान हे कधीच संपत नसते ते तसेच राहते. अहिल्याबाईही समाजासाठी, राज्यरक्षणासाठी, कर्तव्यपालनासाठी त्यांनी समर्पित केलेल्या स्वसुखाच्या आहुतींसाठी तसेच धर्मकार्यार्थ स्वतःच्या खाजगीतून सातत्याने उदारपणे दिलेल्या दानासाठी सदैव स्मरणात राहतील, हे निश्चित.

नर्मदातीरावरील महेश्वर नगरीतून त्यांनी राज्यकारभार पाहिला. हे गाव, ही नगरी वैभवशाली ठरली ती नर्मदामाईच्या सान्निध्याने अन् अहिल्यादेवींच्या उन्नत कर्तृत्वाने. अहिल्याबाईंच्या राजकारणाला धर्माचे अधिष्ठान व मानवतेची किनार होती म्हणूनच नर्मदामाईही कृतार्थतेने आशीर्वाद देऊन गेली. नर्मदामाईच्या तीरावर, महेश्वर इथे अहिल्याबाईंनी सुंदर घाट आणि मदिरं बांधली. हे घाट, ही मंदिरं म्हणजे अहिल्याबाईंचीच शिल्पे वाटतात.

### ⁕ संस्कृत भाषेची सेवा व विद्वानांचा आदर –

भारताचा अमूल्य ठेवा असणारी संस्कृतभाषा, या भाषेबद्दल अहिल्याबाईंना नित्तांत आदर होता. ही भाषा शिकली शिकवली गेली पाहिजे म्हणून त्यांनी महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केल्या. शिवलिंग म्हणजे त्यांचे प्राणस्थानच जणू. महेश्वरात त्यांनी सुरू केलेली कोटिलिंगार्चनाची प्रथा आजही सुरू आहे. नर्मदाकाठच्या या महेश्वराने वीस वर्षे राजधानीची उंची वस्त्र ल्याली अन् विरक्त राणीद्वारे चाललेल्या निर्मोही राज्याची भावना अंगाखांद्यावर जोपासली. **'विद्वान सर्वत्र पूज्यते'** ही भावना मनातच नव्हे तर कृतीत उतरवत अहिल्याबाईंनी विद्वान्, पंडित, वेदशास्त्र संपन्न, संस्कृत तज्ज्ञ अशा अनेकांना आपल्या पदरी आर्वजून आणलं. जवळपास वीस वेदशास्त्रपडिंतांची नामावली महेश्वर येथील श्री. विठ्ठलराय कानुगो यांच्या दप्तरात मिळालेली आहे. यातील काही विद्वानांना त्यांनी महाराष्ट्रातून, आंध्रप्रदेशातून, गुजरातेतूनही बोलावून घेऊन आदराने त्यांना महेश्वरात याज्ञिकी, पुराण, प्रवचन, पूजाअर्चा, ज्योतिषशास्त्रकथन, कीर्तन, वैद्यकी, संस्कृत पाठन, महंतपुजारी, शास्त्रपाठन इत्यादी महत्त्वपूर्ण कार्यासाठी नेमले होते.

अहिल्याबाईंनी प्रजेच्या पोटभर अन्नाची सोय केवळ आपल्याच राष्ट्रातील प्रजेची नव्हे तर परराज्यातील प्रजेसाठीही सोय केल्याची दिसून येते. पोटाची सोय जशी केली तशीच बुद्धीच्या खाद्याची सोयही त्यांनी केली. महेश्वरी अथवा अन्य तीर्थक्षेत्री अन्यप्रांतीय शास्त्री, पंडीत, वैद्य, वैदिक आणवून जी वसाहत करविली ती केवळ वसाहत नसून ज्ञानोपासना, ज्ञानसंरक्षण, ज्ञानाचे संवर्धन यांचीच दूरदृष्टीने केलेली योजना होती.

श्री क्षेत्र काशी येथे तर त्यांनी ब्रह्मपुरी वसविल्याची ख्याती आहे. आजन्म साधी राहणी व उच्च विचारसरणी या उक्तीनुसार सतत विद्यार्जनास, विद्यादानास आपले आयुष्य वेचणाऱ्या ज्ञानी समाजनायकांची ती रेखीव वसाहत होय. ही

वसाहत म्हणजे जणू एखादे नामवंत विश्वविद्यालयच, प्रभुणेंसारखी विद्वान मंडळी चमकली.

ज्यातूनच रामशास्त्री अहिल्याबाईंचा हा वसा त्यांच्या अनेक सरदारांनी, जहागिरदारांनी, इनामदारांनी चालवल्याचे दाखले आजमितीसही सापडतात.

*** महेश्वराचा कायापालट**

नर्मदाकाठी असलेल्या महेश्वर किल्ल्याला अहिल्याबाईंमुळे राजधानीचे वैभव भोगायला मिळाले. महेश्वर केवळ इंदूर संस्थानचीच राजधानी न राहता अखिल हिंदुस्थानाचे प्रेमादरस्थान होऊन राहिले होते. सुभेदार मल्हाररावांच्या काळी येथे वसाहतीला सुरुवात झाली. पुढे अहिल्याबाईंच्या काळात इथली रेलचेल, वाहतूक वाढली आणि महेश्वर शहराची पुनर्रचना करावी लागली. इथली देवालये, घाट अजोड कारागिरीचा तर अतुल्य भक्तीभावनेचे उदाहरण, नमुने ठरतात.

पेशवे दरबारीचे मुत्सद्दी नाना फडणीस, यांनीही महेश्वराचे महत्त्व अधोरेखित केले आहे. ते म्हणाले होते, पुण्याचा दरवाजा म्हणजे महेश्वर नर्मदातीराचे. पुण्याची ही संस्कृती महेश्वराच्या रूपाने प्रवेशद्वारासारखी डौलाने उभीय ही केवढी मोठी पावती नानांनी दिली होती. हे सारं कर्तृत्व अहिल्याबाईंचच होतं.

मोगलाईच्या अंमलात महेश्वर किल्ला मातीचा होता. इ. स. १७३३ मध्ये होळकरांच्या अंमलात दुरुस्तीचे काम सुरू झाले. अहिल्याबाई इंदूरहून १७६७ साली भाद्रपद मासात महेश्वरात आल्या आणि महेश्वराचे सारे भद्र (कल्याण) असेच झाले.

सर्वप्रथम त्यांनी सरकारवाडा बांधून घेतला. त्या वाड्याखाली नर्मदेचा घाट बांधून घेतला. श्री काशीविश्वेश्वराचे देऊळ स्थापन केले. किल्ल्यावर श्रीराममंदिर बांधून पूजनासाठी नथ्थभट भिकमदासांना नियुक्त केले. मग

श्रीकृष्णमंदिर, किल्ल्याबाहेर नर्मदाकाठी विठोबा देऊळ असे बांधत गेल्या. देवळांच्या पूजेअर्चेची निरंतर स्वरूपात व्यवस्था लावून देत गेल्या. सरकारी दप्तरावरून १७९२ साली ६६ पेक्षा जास्त अधिक देवळांची नामावली मिळते, तरी काही पाने या दप्तरातील जळालेली आहेत. यापैकी काही देवळांचा जीर्णोद्धार अहिल्याबाईंनी केलेला आहे तर काही नव्याने बांधून स्थापित केलेली आहेत.

किल्ल्याखाली जो जुनाबाजार होता तेथे कापड विणकरांची वस्ती करवून अनेक पेठा, पुरे वसवली. त्यातले एक पुर फणसेपूर म्हणून आपल्या जावयाच्या यशवंतराव फणसे यांच्या स्मरणार्थ वसवले. केवढे हे प्रेम ! बाहेरगावच्या व्यापारीमंडळींना महेश्वरात आणून वसवले आणि महेश्वराचा व्यापार वाढविला.

श्री भवानी मंदिर शहराच्या उत्तरेला बांधून स्थापित केले. श्रीपरशुराम मंदिर बांधून घेतले, त्याखाली नर्मदेला पेशवेघाट बांधून ठेवला. ही पेशवेनिष्ठाच होती.

### * संस्कृतग्रंथ अहल्याकामधेनु –

अहिल्याबाईंनी संस्कृतच्या रक्षण व संवर्धनात जे पाऊल उचलले त्यातून संस्कृतमध्ये त्यांच्यावर एखादा ग्रंथ निर्माण झाला नसता तरंच नवलं. त्यांच्या कार्यकाळातील हा एक संस्कृत भाषेचा धर्मग्रंथ आहे. याची हस्तलिखित प्रत सिंधिया प्राच्य विद्या शोध प्रतिष्ठान उज्जैन येथे उपलब्ध आहे. इंदूरच्या राजोपाध्यायांची ती वैयक्तिक संपत्ती असल्याने तेथे एक प्रत असून तिसरी प्रत वाराणसीच्या सरस्वती मंदिर संस्कृत विद्यालयात आहे परंतु ती अपूर्ण स्थितीत आहे.

या ग्रंथात अहिल्याबाईंच्या काळातील धार्मिक परंपराबाबत ज्या सूचना वाचायला मिळतात त्या सूचना अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. हा ग्रंथ ११.५×७ इंच या आकाराचा असून प्रत्येक पानावर दोन्ही बाजूने बारा ओळी आहेत.

हस्ताक्षर काळ्या शाईचे असून प्रत्येक ओळीत किमान ३० अक्षरे आहेत. संपूर्ण ग्रंथ ८ वत्सात विभागलेला आहे.

या ग्रंथाचा विषय धर्मशास्त्र असला तरी अनुषंगाने अहिल्याबाईंच्या स्तुतीने हा ग्रंथ पुनित झालेला आहे. उज्जयिनीच्या डॉ. सुरेंन्द्रकुमार आर्य यांनी अहल्याकामधेनु या ग्रथांची पृष्ठसंख्या १६३९ असल्याचे सांगितले आहे.

या ग्रंथांतील वत्सात (प्रकरणात) व्रत, दान, संस्कार, श्राद्ध, गृहवास्तूविधान जलाशय, बगिचे निर्मिती आणि देवप्रतिष्ठादि विषयांचे प्रामुख्याने विवेचन आलेले असले तरी, **'अथ अस्याः श्रीमत्या यथादृष्टं श्लाघावर्णनम् !'** अर्थात श्रीमती अहिल्याबाईंच्या श्रेष्ठत्वाबद्दल जे पहिले तेच सांगत आहे असे म्हणून प्रामाणिकपणे त्यांनी जे वर्णन केलेले आहे ते समकालीन लेखकाने केलेले असल्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे व विश्वासाई आहे. त्यातील ४७ श्लोकांचा भावार्थ असा.

''अहिल्याबाई नेहमी देवादिकांची पूजा करणाऱ्या ब्राह्मणांना दानदक्षिणा देत असत, आपला अधिकाधिक वेळ त्या धर्मकार्यात खर्ची घालत. त्या गुणी, ज्ञानी व सत्प्रवृत्तीच्या तसेच दानशील स्वभावाच्या होत्या. धरादेवता, ग्रामदेवतांना देखील त्या दान देत असत. अन्नदानातही त्या अग्रेसर होत्या. दुःखी, गरजू, गोरगरीबांना शिजलेले वा कच्चे अन्न त्या दान करीत असत. भिक्षुकांनाही त्या रिक्तहस्ते पाठवत नसत. शरणागतांना त्या निराश करीत नसत. अयोध्या, मथुरा, गया, काशी, कांची, पुष्कर, कुरुक्षेत्र, द्वारका येथील ब्राह्मणांनाही त्या दान पाठवत असतं. प्रयाग रामगढ, जम्मू मार्ग तसेच ताम्रपाणी द्विपावरील ब्रह्मवृंदांना त्या दक्षिणा पाठवत असतं.

उज्जयिनी नगरातील सर्व देवादिकांची त्या मनोभावे पूजा करीत असत. शंकराच्या सर्व स्थानांची त्या नितांत भक्ती करीत. शंकर हे त्यांचे प्रिय दैवत होतेच.

काशी विश्वनाथ, परळी वैजनाथ, रामेश्वर, गोकर्णशिवलिंग यांच्या पूजनात त्या सदैव मग्न असत. हिंदूच्या सर्वच देवतांपर्यंत त्यांची भक्ती पोहचत असे. सर्व

ठिकाणच्या देवादिकांच्या पूजा विनयशील अहिल्याबाई भक्तिभावाने करीत असत.

नानाविध अनुष्ठाने, कथापारायणे, रामनामादिजप त्या करीत असत व आयोजितही करीत असत. तीर्थक्षेत्रीच्या उत्सवांसाठी त्या भव्य देणगी पाठवत. काही ठिकाणी त्यांनी वार्षिक वेतन व नेमणुकाही प्रदान केल्या होत्या.

अहिल्याबाई विद्वान ब्रह्मज्ञानी पंडितांकडून रामायण, महाभारत, पुराणकथा श्रवण करीत असत. त्या उत्तम श्रोत्या असून सर्व धर्मांच्या जाणकार होत्या. त्या काया वाचा मनाने शुद्ध व सात्त्विक होत्या. त्या दयाळू अंत:करणाच्या तसेच सर्व प्राणिमात्रांच्या हितैषी होत्या.

त्या नियमांचे काटेकोर पालन करीत असत. सर्व दिनचर्या शिस्तबद्ध होती. धर्मशास्त्रश्रवण आत्मीयतेने करीत. कथामृतासाखे सुख नाही अशी त्यांची धारणा होती. श्रद्धा, प्रेम, विवेक; दया या सद्‌गुणांची त्या खाणच होत्या. त्या एक श्रेष्ठ स्त्रीरत्न होत्या.

■

# ३४) अहिल्याबाईंचे भारतवर्षातील सांस्कृतिक कार्य

अहिल्याबाई आणि शिवदैवत हे जणू समीकरणच झालेले दिसून येते. त्यांच्या जीवाचा शिव व्हावा हीच त्यांची मनोमन आशा होती. होळकर घराणेही तसेच शैवपंथीच होते. कुलाचार तसेच आत्म ओढीने शंकराच्या मंदिराकडे त्यांचे लक्ष्य सर्वाधिक होते. भारतातल्या बाराही जोतिर्लिंगांच्या ठायी अहिल्याबाईंनी पुनःस्थापना, जीर्णोद्धार, बांधकाम, मुखवटे, पालख्या, उत्सव, साधनसामग्रीसाठी दान, पूजेसाठी नेमणुका, घाटरचना, रस्ते, मार्ग, पुलांचे बांधकाम, अन्नछत्रे, महाशिवरात्र पूजा, अभिषेक परंपरा, विहिरी, धर्मशाळा इत्यादी रूपात जी सेवा रूजू केली ती भारतवर्ष सदोदित स्मरणात ठेवील.

स्वराज्याचे संपादन, संवर्धन या बरोबरच स्वधर्माचे रक्षण व संवर्धन हेही त्यांनी केलेले दिसून येते. परकीयांच्या आक्रमणात खिळखिळ्या झालेल्या धर्मरचनेला अहिल्याबाईंनी संजीवनी दिली आणि पुन्हा एकदा हिंदूधर्म तेजाने चमकू लागला. त्याचे अनुकरण करणारा प्रत्येक जण त्यांच्या हिंदू धर्माच्या निष्ठाही नक्कीच आचरणात आणेल हे नक्की.

केवळ बारा ज्योतिर्लिंगच नव्हे तर समग्र हिंदूंना प्रांतास्मरणीय असणाऱ्या सप्तपुरी आणि चारही धामांनाही अहिल्याबाईंनी आपल्या सेवा पोचवल्या. अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांची, अवंतिका, द्वारका येथेही मंदिरे, घाट, कुंड, धर्मशाळा बांधून घेऊन जीर्णोद्धारही केले. अन्नछत्र चालविणे, चार धामांना म्हणजेच श्री बद्रीनारायण (हिमालय), द्वारका, रामेश्वर, जगन्नाथ पुरी येथेही सर्व सेवा त्यांनी समर्पित केल्या.

हिंदू धर्म अतिशय व्यापक आहे. त्यातील अनेक पंथांचाही त्यांनी भेदभाव न करता आपुलकीने विचार केला. जसे मानुभावपंथ, वारकरी पंथ, श्री समर्थ

संप्रदाय, गाणपत्य व श्री दत्त संप्रदाय यांच्या तीर्थक्षेत्रांचीही त्यांनी देखरेख, नवनिर्मिती, जीर्णोद्धार केला.

व्यक्तिश: धर्म, पंथ, संप्रदाय यांच्या उपासना बदलत असल्या तरी राज्यकर्त्यांनी मात्र सर्वांनाच समदृष्टीने पाहिले पाहिजे याचे आदर्श उदाहरण म्हणजे अहिल्याबाई ठरतात. भारतात अहिल्याबाईंपूर्वी राजा विक्रमादित्य, हर्षवर्धन, छत्रपती श्री. शिवाजी महाराजांनी असेच आदर्श घडवून ठेवलेले होते. भारताच्या विभिन्न भागात आणि विविध भाषिक प्रांतामध्ये ही तीर्थक्षेत्रे पसरलेली आहेत. ही तीर्थक्षेत्रे म्हणजे नवविधा भक्तीची प्रतीकेच आहेत. तसेच भारताच्या एकात्मिक वारशाचे दुवेही आहेत.

यवनांच्या आक्रमणापूर्वी हिंदू राजे आपापल्या प्रांतातील तीर्थक्षेत्रांची व्यवस्था पाहत असत, सेवा करत असत; परंतु परकीय आक्रमणांनंतर हिंदूराज्ये विनष्ट झाली. समर्थ रामदास छत्रपती शिवाजी महाराजांना उपदेश करताना म्हणल्याप्रमाणे, '**तीर्थक्षेत्रे अवघी बुडाली, काही राहिली तुम्हाकारणे**', शिवाजी महाराजांनी तीर्थक्षेत्रांची व्यवस्था चोख ठेवली. जो जो प्रांत मराठ्यांच्या अंमलाखाली येई त्या प्रांतातील तीर्थक्षेत्रे, विद्यास्थाने, विद्यासंपन्न घराण्याची नीट व्यवस्था ते लावत असत.

अहिल्याबाईंनी महाराजांचाही कित्ता तर गिरवलाच; परंतु त्याही पुढे जाऊन त्यांच्या ताब्यातील मुलुखात हा नियम पाळलाच पण संपूर्ण भारतखंडच माझे घर असे समजून तेथील सर्व तीर्थक्षेत्रांची सुव्यवस्था लावली. सहाशे वर्षांच्या प्रदीर्घ परकीय आक्रमणांनी दुर्बल होऊन हताश झालेल्या हिंदूंच्या संस्कृतीवर जे मळभ साचले होते ते अवघ्या तीस वर्षांच्या राजवटीत दूर केले, हे अहिल्याबाईंचे अजोड योगदान ठरते. चैतन्यमय हिंदू संस्कृतीचा खळखळता प्रवाह पुन्हा वाहता करत सर्वत्र प्रसृत केला हे कार्य अत्यंत मोलाचे होते.

**⁕ शिल्पकला, कारागिरी जतन :**

अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत मंदिरे, धर्मशाळा, घाट इत्यादी बांधकामे सतत सुरू राहिली. या कामांवर दुष्काळाचाही परिणाम झाला नाही. यांच्यात कशानेच खंड पडला नाही. आजही जेजुरीच्या आसपास **'चालू द्या होळकरी टाकी'** अशी एक म्हण रूढ आहे. याचा अर्थ हाच की हे टाकीच्या घावाचे काम अखंडपणे, अविरतपणे सुरू ठेवण्याचा नेम अहिल्याबाईंनी आजीवन पाळला. त्यांच्या या उपक्रमामुळे देशातील उत्तम कारागिरांना सतत काम मिळाले, नव्या कारागिरांना खूप शिकायला मिळाले आणि भारतातील कारागिरी जिवंत राहिली.

मंदिरांच्या निमित्ताने, घाटबांधण्याच्या निमित्ताने शिल्पशास्त्रांचे सुंदर नमुने घडल्या गेले. प्रत्येक बांधकाम म्हणजे कारागीरनिर्मिती शाळाच ठरली, उत्तर नासिक व दक्षिण नासिक अशा दोन निराळ्या परंपरा उत्पन्न होऊन स्वदेशी शिल्पकलेचे सुंदर रूप पाहावयास मिळाले. कलेवर झालेले मोगली आक्रमण संपुष्टात झाले. धर्म, संस्कृती, कला या मोकळेपणे स्वदेशी श्वास घेऊ लागल्या, डौलाने उभ्या राहिल्या.

यवनांच्या सहाशे वर्षांच्या त्रासदायक, असहाय लांबलचक कालखंडानंतर सशस्त्र प्रतिकार करून त्यांचा पाडाव झाल्यानंतर आपल्या प्रांतातील दर्गे, पीरस्थाने इथल्या देणग्या पूर्वीप्रमाणे चालू ठेवण्याचे उदार धोरण मराठ्यांनी स्वीकारले. तेच अहिल्याबाईंनीही माळव्यात सुरू केले.

**⁕ अन्नवारसा :**

अहिल्याबाईंनी भारतीय संस्कृतीतील **'अन्नं वै ब्रह्म'** अन्न हेच ब्रह्म, ईश्वररूप आहे हे जाणून भारतभर अन्नछत्र सुरू केल्याचे सर्व विदितच आहे. अन्न छत्रांसाठी त्यांच्या खासगीतून प्रतिवर्षी देणगीही जात असे. इंदूर वा महेश्वरात होळकर वाड्यात सातत्याने भोजनावळी चालत असत. गोरगरीब, भुकेले होळकर वाड्यातून तृप्त होऊन जात असत.

अहिल्याबाईंच्या दिनचर्येतील आणखी एक नेम होता तो म्हणजे त्या गाईला व ब्राह्मणांना भोजन करविल्याशिवाय स्वत: अन्न ग्रहण करीत नसत. अहिल्याबाईंच्या अन्नदानाचा वसा एवढ्यावरच मर्यादित न राहता यात्रेकरूंसाठी ठिकठिकाणी जशी अन्नछत्रे सुरू केली तशीच मुक्या प्राण्यांसाठी त्यांनी केलेली खानपानव्यवस्था आजही क्षेत्रनिहाय सुरू आहे. पशुपक्षी, मुंग्यांसारखे कीटक यांनाही अन्न सहज मिळावे आणि कोणताही सजीव उपाशी राहू नये याची जातीने त्यांनी काळजी घेतलेली दिसून येते.

रानावनात पाणपोया, डोंगरपठारावरून गाईंसाठी केलेली चाऱ्याची व्यवस्था अबाधितपणे आजही सुरू आहे. बद्री केदरेश्वराच्या रस्त्यावर अंतराअंतरावर वाटसरूंची खाण्यापिण्याची व्यवस्था अगदी नियमबद्धपणे अजूनही सुरू आहे. त्यांचे हे काम इतके मनापासून होते की आजही ते काम चालू राहावे म्हणून लोक धडपडताना दिसतात.

श्री ज्ञानेश्वरांनी, **'हे विश्वचि माझे घर'** हा जो उपदेश दिला तो तनामनात बिंबल्यामुळे अहिल्याबाईंनी धर्म म्हणून जे काम केलेले आहे ते श्रेष्ठ सामाजिक काम असून विश्वबंधुत्वाचे आचरण यापेक्षा वेगळे कोणते असूच शकणार नाही.

■

# ३५) अहिल्याबाईंची प्रेरक वचने

कोणत्याही महान व्यक्तीच्या जीवनाचे सार त्यांच्या चिंतनातून प्रकट होत असते. अहिल्याबाईंची विचारसरणी ही त्यांच्या काही प्रेरक विचारांमधून स्पष्टपणे मार्गदर्शक ठरते. शतकं लोटली तरी त्यांचे विचार आजही प्रेरक ठरतात.

त्यांचे काही प्रेरक विचार असे –

१) हे राज्य मल्हारीचे.

२) सत्ता व सामर्थ्याच्या जोरावर मी जे काही करत आहे त्याचे उत्तर मला ईश्वराला द्यावे लागेल.

३) ईश्वराने माझ्यावर जी जिम्मेदारी दिली आहे ती मला पार पाडली पाहिजे. माझे काम प्रजेला सुखी ठेवणे आहे.

४) मी माझ्या प्रत्येक कार्यासाठी स्वत: जिम्मेदार आहे. (जबाबदार )

५) हे सर्व काही मला मिळालंय, ते सारं तुझंच आहे. मी तुझे तुलाच अर्पण करते. जे मी काही घेते ते माझ्यावर ऋण आहे, ते मी कसे चुकते करेल हे मला माहीत नाही.

६) खांद्यावर भाला घेऊन निघाले तर श्रीमंतांना (राघोबादादांना) ते जड जाईल (अवघड होईल). ही दौलत होळकरांनी खुशमस्करी करून नव्हे तर तलवारीचे अनुमाने शरीरे खर्ची घालून मिळवलेली आहे. लक्षात असू द्या, मी सुभेदार मल्हाररावांची सून आहे.

७) आपले अंतर्गत वाद मिटवण्यासाठी जर परक्यांजवळ जावं लागलं तर काय उपयोग? घराच्याच बंदोबस्तासाठी फौजा तैनात कराव्या लागल्या तर बाहेरील आक्रमण रोखण्यासाठी काय उपाय करावेत?

८) कैलासवासी तीर्थरुप सुभेदार मल्हाररावांची ही पद्धत होती, की त्यांचा जर काही दोष सांगितला जात असेल तर ते त्याला उपेक्षेने न पाहता योग्य विचारपूर्वक यथोचित प्रबंध करीत असत. याचा परिणाम असा होत असे की कोणाचे मनही दुखत नसे, सर्व खुश राहत असत व कोणी शिरजोरही होत नसे.

९) मालक आणि ईश्वराला एकरूपच समजले पाहिजे.

**साभार – महेश्वर दरबारची बातमीपत्रे, दोन्ही भाग.**

# ३६) अहिल्याबाईसंबंधी उपलब्ध निवडक वाङ्मय

**खंडकाव्ये व महाकाव्ये :**

**अ) मराठी वाङ्मय :**

**१) अहिल्याबाई होळकरीण हिचे चरित्र (इ. स. १८८४ ) :**

कवी श्री. केशव चिकटो कुलकर्णी व श्री. हरिश्चंद्र बाळकृष्ण घाणेकर यात या दोन्ही कवींनी श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या अनेक विद्यामूल तत्त्वसंग्रह ग्रंथाच्या आधारे काव्यरचना केलेली असून विषयानुरूप श्लोक आलेले आहेत. पद्यरचनेसाठी विविध अक्षरगणवृत्ते आर्या, साकी, दिंडी, ओवी यांचा उपयोग केलेला आहे. इतिहासाच्या क्रमानुसार घटना घेतलेल्या असून पद्यात इतिहास मांडताना काव्यरचनेच्या काळापर्यंतची होळकर घराण्याची वंशावळही यात दिलेली आहे.

हे काव्य स्त्रोतासारखे वाटते. दोन कवींनी एकत्र रचना करणे हा उपक्रम चांगला वाटतो.

**२) अहिल्या चरित्रकाव्य / प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरीण यांचे पद्यात्मक संक्षिप्त चरित्र (१८९८)**

कवी - हरी मोरेश्वर शेवडे, प्रिन्सिपल ट्रेनिंग कॉलेज, अकोला.

शेवड्यांनी हे काव्य लिहिताना पूर्वीच्या, माल्कम यांचा मध्य हिंदुस्थानचा इतिहास (मराठी भाषांतर श्री. कीर्तने). होळकरांची कैफियत तसेच इतर अनुषंगित दोन तीन पुस्तके संदर्भाला घेतलेली दिसतात.

७१ पृष्ठांचे २५० छंदांचे हे अहिल्याबाईंचे पद्यात्मक चरित्र आहे. त्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या सर्व महत्त्वपूर्ण घटना कवीने यात घेतल्या आहेत. तळटीपेत शब्दार्थ व काही आवश्यक माहितीही पुरविलेली दिसून येते. हे पद्यात्मक चरित्र हे वाचणीय व संग्रहणीय आहे.

३) **'लोकमाता अहिल्यादेवी होळकर'** कवी रंगनाथ जोशी, तुळजापूर

**ब) संस्कृत वाङ्मय :**

**१) श्रीमदहल्याचरितम् – श्री. सखारामशास्त्री भागवत, इंदूर (१९३७)**

कवी हे इंदूरच्या संस्कृत महाविद्यालयाचे संस्कृत शिक्षक असून या ग्रंथलेखनास त्यांना कै. रावबहादूर द. ब. पारसनीसांचे लेख, मल्हारीमार्तंडविजय यात छापून आलेले लेख, पुरुषोत्तम्यांचे अहिल्या चरित्र, एल्फिन्स्टनचा माळव्यांचा इतिहास, अहिल्योत्सव समितीचा अहवाल यांचे साह्य मिळाले.

ग्रंथारंभी बाग्यट व भर्तृहरीची धर्मविषयक वचने दिलेली असून १३९ पृष्ठात्मक असे हे संस्कृत काव्य आहे. देवी अहिल्येच्या बाल्यावस्थेचे वर्णन करत त्यांच्या देहत्यागापर्यंत सर्व महत्त्वाच्या ऐतिहासिक गोष्टींचा वेध या ग्रंथात घेतलेला आहे. याचे विशेष म्हणजे अहिल्याबाईंची जन्मतिथीची कुंडली साधार आहे.

हा छोटेखानी संस्कृत काव्यग्रंथ प्रथमच प्रसिद्ध झालेला संस्कृत भाषेतील सुंदर काव्यग्रंथ म्हणता येईल.

*** अहिल्याकामधेनू : श्री. खुशालीराम –**

अहिल्याबाईंचे समकालीन असल्याने या ग्रंथातील काही वर्णने तर हुबेहूब आलेली असून या ग्रंथात मुख्यत: धर्मनिर्णय, पूजा, मुहूर्त, वास्तुपूजादि विषय आलेले आहेत. सोबतच अहिल्याबाईंची स्तुती, वर्णन आलेले आहे.

या ग्रंथाचे दुर्दैव असे की हा अहिल्याबाईंच्या समकालीन कवीने रचलेला असूनही तो अजूनही अप्रकाशित आहे. याच्या ३ हस्तलिखित प्रतींपैकी १ अपूर्ण सापडते.

**क) हिंदी वाङ्मय :**

१) पतितपावनी श्री अहिल्या मातेश्वरी का जीवनचरित्र – कवी अर्जुनसिंह आर्य, २१ मे १९४४

हा २६ पानांचा काव्यसंग्रह असून अद्यापही अप्रसिद्ध आहे.

**ड) इंग्रजी वाङ्मय :**

जोना वेलीचे १५ मे १९७५ सालीचे प्रकाशित पुस्तक

**प्रकाशक :** क्षत्रिय धनगर सेवा संघ, इंदूर. हस्ते प्रकाशित, सौ. शशिकला काकोडकर, तत्कालीन मुख्यमंत्री, गोवा. ७०० ओळींचे ३० पानांचे इंग्रजी काव्य.

इंग्लंडला इंग्रजांच्या आमदानीत सर जॉन मालकम हा भारतात अहिल्याबाईंच्या कारकीर्दीत राजदूत होता. त्याने अहिल्याबाईंना प्रत्यक्ष पाहिले होते. इतकेच नाही तर त्यांच्या प्रशासन कौशल्यामुळे तो अत्यंत प्रभावित झालेला होता. अनेक इतिहासकारांच्या मते मालकम मुळेच इतिहासात अहिल्याबाईंचे खरे कार्य प्रकट झाले. श्री. कीर्तने यांनी तर मालकमने लिहिलेल्या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला. याच ग्रंथाच्या आधारे संशोधक इतिहासकार डॉ. रघुवीरसिंह यांनी मालवा में युगांतर, या ग्रंथाची निर्मिती केली. नंतरच्या अनेक इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतील ग्रंथ माळव्याच्या इतिहासावर प्रकाश टाकतात.

इंग्रजीतील एकमेव महाकाव्य जे मातोश्री अहिल्याबाईंच्या जीवनावर आधारित आहे ते हेच श्रीमती जोना वेली यांनी रचलेले. अहिल्याबाईंच्या जीवनकार्याची स्तुती करणारे हे महाकाव्य त्याची किर्ती सुंदर पसरवून गेले. पाश्चात्यशैलीतील विविध रसांनी युक्त हे अहिल्याबाईंचे इंग्रजी महाकाव्य वाचनीय आहे.

**अन्य स्फुट काव्य –**

होळकर सरकारचे मल्हारीमार्तंड विजय हे नियतकालिक आणि त्याकाळच्या सर्वच प्रमुख नियतकालिकांमधून अहिल्यादेवीविषयक काव्यरचना प्रसिद्ध होत असत. हस्तलिखित मासिकांमधूनही त्यांच्या बाबत स्तुतिसुमने असत.

**अहिल्याबाईंच्या जीवनावरील चरित्रग्रंथ**

**मराठी चरित्रे –**

१) देवी श्री अहिल्याबाई होळकर : श्री. पुरुषोत्तम उर्फ श्री. वि. ना. देव (१९१३) सुमारे ४०० पृष्ठात्मक. हे चरित्र सौ. महाराणी चंद्रावती माँसाहेबांनी श्री. पुरुषोत्तम यांच्याकडून अभ्यासपूर्वक लिहून घेतलेले आहे. हे अतिशय प्रामाणिक लेखन आहे.

२) आमच्यातील एक अमौलिक स्त्रीरत्न देवी अहिल्याबाई होळकरीण (महाराष्ट्र कुटुंब संग्राह्य पुस्तकावली) श्री. धनुर्धारिरचित (१९०८ इ. स.) (आवृत्ती दुसरी) ३० पाने.

३) होळकर कुलभूषणा देवी अहिल्याबाई होळकर – श्रीमती. मुक्ताबाई लेले (इ. स. १९३५) ८० पृष्ठात्मक चरित्र.

४) अनेक विद्या मूलतत्त्व संग्रह – श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर (इ. स. १९३३) (चौथी आवृत्ती) यात अहिल्याबाईंचे संक्षिप्त चरित्र पृष्ठ २४५ ते २५५ या ११ पानांमध्ये आलेले आहे.

५) अहिल्याबाई होळकर : आख्यानात्मक चरित्र – संत दासगणू महाराज (इ.स. १९३८) पृष्ठ संख्या ८०.

६) अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र ( मुलांसाठी) – श्री. अ. ना. भागवत, इंदूर (इ. स. १९२५) पृष्ठ संख्या २४.

७) अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रे – श्री. वि. स. वाकसकर, बडोदे (इ. स. १९२५) पृष्ठ संख्या १५०.

८) अहिल्याबाई (मराठीत अनुवाद) हीरालाल शर्मा (नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली) (इ.स. १९६७) पृष्ठ संख्या ८०.

९) अहिल्याबाईंचे चरित्र – पुरुषोत्तमकृत, यावरील चिं. वि. वैद्य यांचा विविध ज्ञान विस्तारातील निबंध. (इ. स. १९३०) पुनर्मुद्रण, पृष्ठ संख्या ६०.

१०) अहिल्याबाई होळकर – वा. दा. गोखले (इ. स. १९४९) पृष्ठसंख्या ६४

११) इंदूरच्या राज्यकर्त्यांचा परिचय – गणेश मतकर, इंदुरातील १९८७ च्या अ. भा. ६८ व्या मराठी नाट्यसंमेलन प्रसंगी प्रकाशित, पृष्ठ संख्या ४०.

१२) होळकर राज्य संस्कृती दर्शन– गणेश मतकर, इंदुरातील १७ व्या अ. भा अस्मितादर्श साहित्य संमेलन प्रसंगी प्रकाशित (इ. स. १९९१) पृष्ठ संख्या ५२.

१३) सती साध्वी देवी अहिल्या–श्री. शेवडे गुरुजी (इ. स. १९८८) पृष्ठ संख्या ३६.

**हिंदी भाषेतील चरित्रे**

१) अहिल्याबाई – डॉ. उदयभानू शर्मा, अहिल्योत्सव समिती प्रकाशन (इ. स. १९३५) पृष्ठ संख्या ८०, द्वितीय आवृत्ती १९६४, पृष्ठ संख्या १००.

२) अहिल्याबाई – वैजनाथ महोदय, स्वतंत्रता सेनानी (इ. स. १९४६) पृष्ठ संख्या ४०.

३) अहिल्याबाई चरित्र – डॉ. राजीव नयन प्रसाद, बोधगया (इ. स. १९७८) पृष्ठ संख्या २०.

४) अहिल्याबाई होळकर जीवन चरित्र - गोविंदराम केशवराम जोशी, मनोरंजन पुस्तकालय काशी बालारी प्रचारिणी संघ, (इ.स. १९१६) पृष्ठ संख्या १७०.
५) अहिल्याबाई श्री. हिरालाल शर्मा, नॅशनल बुक ट्रस्ट, नयी दिल्ली (इ. स. १९६७) पृष्ठ संख्या ७२.
६) अहिल्याबाई होळकर - श्रीमती पुष्पापाल, भारत सरकार प्रकाशन विभाग, नयी दिल्ली (इ. स. १९९२) पृष्ठ संख्या ३२.

**इंग्रजी भाषेतील चरित्रे :**

1) Life and Life's work of Shri Devi Ahilyabai Holkar - Edited by V. V. Thakur, Reprinted by Khajgi Trust, 1967, Pages 145.
2) Deve Ahilyabai Holkar - By M. M. Burvay, 1922, Pages 250

**अन्य भाषेतील चरित्रे :**

१) डॉ. उदयभानू शर्मा यांनी बंगाली व गुजराती भाषेतून अहिल्याबाईंच्या चरित्राचा अनुवाद केला आणि तो अहिल्योत्सव समिती इंदूर यांनी सन १९३७ व सन १९३९ साली प्रसिद्ध केला.

२) पं. हीरालाल शर्मांनी मूळ अहिल्याबाई चरित्र हिंदीत लिहिलेले १९६७ साली नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केले. या पुस्तकाची सहावी आवृत्तीही निघालेली आहे. याच पुस्तकाचे अनुवाद प्रकाशकाने पंजाबी, कन्नड, गुजराती, मल्याळम, तेलगू, तमिळ भाषांमध्येही करवून प्रकाशित केलेले आहेत.

प्रकाशन विभाग नवी दिल्लीने **'भारत दे गौरव'** या मालिकेतून पंजाबी भाषेतून अहिल्याबाईंचे चरित्र प्रसिद्ध केलेले आहे.

**कादंबरी मराठी**

१) मातोश्री - श्री. दिवाकर बापट, १९६७, पृष्ठ संख्या ११०
२) राजयोगिनी - सौ. नलिनी सहस्रबुद्धे, १९७६, पृष्ठ संख्या ३१०
३) बिल्वदल - मृणालिनी देसाई, १९७५ च्या धर्मभास्करच्या मुंबई, अहिल्या विशेषांकातून प्रकाशन पृष्ठ संख्या ८०

४) सहस्रधारा – श्री. दा. वि. कुलकर्णी, सोलापूर, (वृंदावतलाल वर्मा) यांच्या अहिल्याबाई या हिंदी कादंबरीवर आधारित, १९८९ पृष्ठ संख्या २००

५) कर्मयोगिनी – चरित्र कादंबरी, सौ. विजया जहागिरदार, १४ जानेवारी १९९१, पृष्ठ संख्या ४००.

**कादंबरी – हिंदी**

१) अहिल्याबाई – श्री. वृंदावनलाल शर्मा यांनी १९५२ मध्ये लिहून प्रकाशित केली. पृष्ठ संख्या २०० असून वर्णन प्रभावी आहेत.

२) अहिल्याबाई होळकर श्री. सेठ गोविंददास

३) भारतीय वीरांगणा – श्री. महालचंद पाखेड

**नाटके – मराठी**

१) राजयोगिनी – नाटककार श्री. पु. म. वैद्य, इंदूर पृष्ठ संख्या ८०, १९४५. प्रभावी संवादयुक्त नाटक.

२) देवी अहिल्या – श्री. दिनकर चिमणाजी देशपांडे, कोल्हापूर. १८/०१/१९२४, पृष्ठ संख्या ८७, नाट्यपरंपरेप्रमाणे पात्रांच्या मुखी लांब लांब संवाद आहेत.

३) मातोश्री – अप्रकाशित. लेखक – प्रा. म. ना. लोही, नागपूर. १९८७/८८. ३ अंकी दर्जेदार मराठी नाटक, हृद्य प्रसंग, प्रसंग, प्रौढ मराठी भाषा, संवाद सुस्पष्ट.

४) महाराणी अहिल्या नाट्यदर्शन – (१२ नाट्यप्रवेश) अप्रकाशित. लेखक श्री. गणेश मतकर, १९७४/७५. पृष्ठ संख्या ३०. या नाटकाचे मराठी व हिंदी अनुवाद होऊन २५० व्या अहिल्या जन्मोत्सव प्रसंगी रवीन्द्र नाट्यगृह, १६ मे १९७५ रोजी गोव्याच्या मुख्यमंत्री सौ. शशिकला काकोडकर या समक्ष नाट्य प्रयोग श्री. अहिल्या नाट्यमंडळ, इंदूर द्वारा सादर झाला.

५) अहिल्या संदेश – श्री. दा. ब. दांडेकर, १९४०, मराठी एकांकित

६) सुभेदाराची सून – नाटककार केशवतनय, जळगाव १९३२, प्रहसन प्रकार पृष्ठसंख्या १८, उत्तम संवाद, वाचनीय व रंगभूमीवर वठण्याजोगे

**नाटके हिंदी**


१) अहिल्याबाई - श्री. लाल प्रद्युम्नसिंह १९६५, पृष्ठ संख्या १२०

२) देवी श्री. अहिल्याबाई - डॉ. रामकुमार वर्मा (इलाहाबाद ) कमल प्रकाशन, इंदूर १९८० पृ.संख्या १०८


**इतिहास व ऐतिहासिक वाङ्मय तसेच गॅझेटियर्स (मराठी, हिंदी, इंग्रजी)**


१) होळकर दरबारची बातमीपत्रे - भाग १ (संकलन)

२) होळकर दरबारची बातमीपत्रे - भाग २

३) होळकरांची कैफियत - य. न. केळकर

४) भवानीशंकर दक्षी यांची रोजनिशी

५) होळकरशाहीचा इतिहास - भाग १

६) होळकरशाहीचा इतिहास - भाग २ (वा. वा. ठाकूर)

७) होळकरशाहीच्या इतिहासाची साधने - भाग १ व २ (अ. ना. भागवत)

८) होळकरशाहीच्या इतिहासाची साधने - वा. वा. ठाकूर

९) Studies in Maratha History - Dr. S. K. Bhatt

१०) मालवा में युगांतर - डॉ. रघुवीरसिंह

११) Indore State Gazetteer - 1908 - Col. Luerd

१२) Indore State Gazetteer - 1931 - Dhariwal

१३) अनंत फंदीच्या लावण्या

१४) भारत के देशी राज्य - सुखसंपत्तिराय भंडारी

१५) इंदूर राज्याचा संक्षिप्त इतिहास - प्र. स. चिने

१६) इंदूर संस्थानची बखर - धोंडो मोरेश्वर रागी

१७) मध्य भारतीय मराठी वाङ्मय - कृ. ग. कवचाळे

१८) मध्य हिंदुस्तानचा इतिहास - कीर्तने

१९) इन्दौर राज्य का इतिहास - तेरेदेसाई

२०) होळकर राज्याचे सामान्य वर्णन - सी. एल. नाडकर्णी

२१) होळकर राज्याचा गोष्टीरूप इतिहास - तेरेदेसाई

२२) होळकर संस्थानचा संक्षिप्त इतिहास – महाडिक व घाटोळे
२३) Tales of the Heriones of India
२४) मराठी रियासत उत्तर – भाग – ३ सरदेसाई
२५) Children of the Mother Land - Dr. Annie Basent
२६) Representative men of central India - C. S. Bayley
२७) राघोबादादा संबंधी हकीकत – मोरेश्वर दीक्षित.
२८) Indore State (Indore State Chronicle) - N. D. Tandon 1941
२९) इंदूर दर्शिका, भा. गो. गवारीकर – १९३५

**नियतकालिकातील आणि इतर वाङ्मय (हिंदी, मराठी व इंग्रजी)**

१) मालव साहित्याचा इंदूर विशेषांक – १९३४–३५ महाराष्ट्र साहित्य सभा प्रकाशन, इंदूर
२) 'वीणा' हिंदी मासिकाचा : १९२९–३० : अहिल्यांक
३) धर्मभास्कर, मुंबई मे – जून १९७५.
२५० वा देवी अहिल्या जन्मोत्सव १९७५ प्रसंगी.
४) मार्तंड मासिक – खेमनर – इगतपुरी १९२९ – ३०
५) अहिल्या स्मारिका – खासगी देवी अहिल्या ट्रस्ट, इंदूर. संपादक – हीरालाल शर्मा. सन १९७०, ७१, ७२, ७३–७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८४, ८७ अंक
६) अहिल्या स्मृती – अहिल्या जन्मोत्सव समिती प्रकाशन, १९८८, १९८९, १९९०, १९९१, १९९२ अंक ४.
७) माहिष्मती स्मारिका – महेश्वर इतिहास संशोधक मंडळ, प्रकाशन १९७६.
८) अहिल्योत्सव रिपोर्ट – अध्यक्षीय भाषणे सन १९२३ ते १९४१ – ४२ पर्यंत.
९) लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, नई दुनिया, भास्कर, स्वदेश, फ्री प्रेस, इन्दौर समाचार अंकातील निवडक लेख.
१०) इतिहास संग्रह मासिक.

११) विविध ज्ञान विस्तार मासिकाचे निवडक अंक.

१२) मासिक मनोरंजन, मुंबई.

१३) महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर रौप्य महोत्सवी स्वर्ण महोत्सवी आणि हीरक महोत्सव स्मरणिका.

१४) श्री क्षत्रिय धनगर सेवा संघाचे निवडक वार्षिक अंक.

भारताचे पार्लमेंटचे पूर्व अध्यक्ष श्री. दादसाहेब मावळंकर म्हणतात - ''देवी अहिल्याबाईचे चरित्र कोणा सहृदय माणसास उद्बोधक, स्फूर्तिप्रद वाटणार नाही? भारतात जी थोडी स्त्रीरत्ने आपल्या चारित्र्याच्या व कर्तृत्त्वाच्या तेजाने चमकली, त्यातील अहिल्याबाई हे एक दैदिप्य रत्न होते. अहिल्याबाई केवळ महाराष्ट्रीय किंवा महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारतीय व सर्व भारताच्या होत्या व आहेत.''

**महामहोपाध्याय द. वा. पोतदार**

सती अहिल्याबाई होळकरांनी सर्व मराठेशाहीच्या राजकारणाचे दर्शन थोडक्यात दिले आहेत. यांचे चित्र पुढे मांडून बाईने जुन्या शूर आणि पराक्रमी मराठ्यांचे महत्त्व दाखविले आहे.

■

# १) महेश्वरातील वेदशास्त्रसंपन्न विद्वान

१) वे. शा. सं. मल्हारभट गोविंदभट मुळे,
संगमनेरकर.................................... याज्ञिकी

२) वे. शा. सं. जनोबा व गोविंदभट
पुराणिक, नार्मदेय ब्राह्मण...................... शास्त्री/पुराणिक

३) वे. शा. सं. रामचंद्र नानाजी रानडे,
कोकणस्थ .................................. पुजारी

४) वे. शा. सं. काशीनाथ शास्त्री .................शास्त्री

५) वे. शा. सं. दामोदर शास्त्री,
नार्मदेय ब्राह्मण ................................ पूजा, पुराण

६) वे. शा. सं. निहालभट भगवानभट .............याज्ञिक, पुराण

७) वे. शा. सं. भैय्याशास्त्री ऋग्वेदी, वेदांत ....... शास्त्र व्याकरण

८) वे. शा. सं. तेलंग ब्राह्मण, गोळू शास्त्री.........वैदिक, महंत

९) वे. शा. सं. मनोहरबुवा तेलंग ब्राह्मण,
हैदराबादचे .................................... कीर्तनकार

१०) वे. शा. सं. बळीरामजी खेडावाल ब्राह्मण ........ श्री विठ्ठल मंदिराचे पूजन

११) वे. शा. सं. गणेशभट द्वारका (अहिल्यादेवींनी द्वारकेच्या
यात्रेहून परतताना आणलेले) .................. पूजारूर्चा

१२) वे. शा. सं. त्रिंबकभट जंबू ब्राह्मण,
ज्योतिषज्ज्ञ, गुजरातेतून बोलावलेले ............ ज्योतिषशास्त्री

१३) वे. शा. सं. महंत सुजाणगीर गोसावी ..........महंत पुजारी, श्री. गजराजेश्वर

१४) वे. शा. सं. त्रिंबकबुवा हरदास कीर्तनकार,
संगमनेरहून आणले ......................... कीर्तनकार, ऋग्वेदी ब्राह्मण

१५) वे. शा. सं. आनंदरामजी, नार्मदेय ब्राह्मण.... पूजा - ऊर्जा, श्री. रावणेश्वर

१६) वे. शा. सं. गोविंदरामभट पंडे,
जटाशंकर गुजराथेतून आले .................. ज्योतिष, संस्कृत

१७) वे. शा. सं. बाळकृष्णभट जंबू ब्राह्मण,
गुजराथेतून आले ............................ ज्योतिष, संस्कृत

१८) वे. शा. सं. दाजी रघुनाथ जंबू ब्राह्मण ..........संस्कृत वैद्यकी

१९) वे. शा. सं. गणेशराम वल्लभराम खेडावाल,
ब्राह्मण ...................................... वैद्यकी, पूजा अर्चा

■

## २) महेश्वरातील देवस्थाने
## (इ.स. १७९२, सरकारी दप्तर यादी )

१) श्री राजराजेश्वर (कार्तवीर्य)
२) श्री काशीविश्वेश्वर
३) श्री मातंगेश्वर
४) श्री परशुराम मंदिर, चोखंडी
५) श्री गणपती धर्मशाळा
६) श्री विंध्यवासिनी देवी
७) श्री रामजी ( गडावरील)
८) श्री बाणेश्वर महादेव, नर्मदेत
९) श्री मारुती जंबखाळी
१०) श्री रावणेश्वर
११) श्री राधाकृष्ण लाडवी
१२) श्री रामजी मंडणमिश्र
१३) श्री गोपाळ मंदिर, सरकारी
१४) श्री भैरवनाथ, नावघाट
१५) श्री हस्तदेव लाला
१६) श्री श्रीरामजी, तिवारीतील
१७) श्री मार्तंड, चोखंडी
१८) श्री त्रिंबकेश्वर महादेव
१९) श्री देवीपंचायतन, श्रीराजेश्वर
२०) श्री मुरलीमनोहर, कृष्णबाग
२१) श्री बांकेबिहारी
२२) श्री रामजी नावडा तावडी
२३) खास संस्थानची देवपूजा
२४) श्री भैरवनाथ

२५) श्री जलरुपी देवता
२६) श्री कालेश्वर (कालाग्निरुद्र)
२७) श्री वटयक्षिणी देवी
२८) श्री महालक्ष्मी
२९) श्री गौतमेश्वर
३०) श्री सोमेश्वर
३१) श्री विठ्ठल मंदिर
३२) श्री रेवेश्वर / रेवाशंकर
३३) श्री उमेश्वर
३४) कै. मल्हारराव महाराज छत्री
३५) श्री भद्रकाली माता
३६) श्री रामेश्वर निंबादीत
३७) श्री रामजी गडाखाली
३८) श्री मारुती घाटावरील
३९) श्री चतुर्भुज रायजी
४०) श्री गणपती, सहस्त्रधारा
४१) श्री केशवराय चोखंडी
४२) श्री ओंकारेश्वर
४३) श्री गोकर्णेश्वर
४४) श्री सीतलामाता
४५) श्री तिल भांडेश्वर (नर्मदाघाट)
४६) श्री गौरीशंकर, घाटावरील
४७) श्री नर्मदामूर्ती घाटावरील
४८) श्री रामजी वटयक्षिणीबाग
४९) श्री मारुती नावताताावडी
५०) श्री मार्तंड
५१) श्री मारुती मंदिर
५२) श्री रामेश्वर, पेशवे घाट
५३) श्री गणपती मंदिर
५४) श्री नजरबाग बालाजी मंदिर
५५) श्री वृद्धकाळेश्वर
५६) श्री गणपती, काळेश्वर
५७) श्री रामजी
५८) श्री चंद्रिकेश्वर
५९) श्री यशवंतेश्वर
६०) श्री मल्हारेश्वर
६१) श्री कृष्णेश्वर
६२) श्री हरिहरेश्वर
६३) श्री दत्तमंदिर
६४) श्री मनकामतेश्वर
६५) श्री गणपती

■

# लेखिकेचा परिचय

**नाव – डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी**

**जन्म –**

श्रीमती मृणालिनी आणि श्री. पंढरीनाथ कुलकर्णी यांच्या पोटी तुळजापूर, महाराष्ट्र येथे इ.स. १९७७ साली.

**शिक्षण –**

एम.ए. (संस्कृत) एम. एड., पीएच.डी. (संस्कृत) सेट, नेट प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण. बी.ए.ला संस्कृत विषय घेऊन पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आणि संस्कृत विशारदला टिळक महाराष्ट्र विद्यापीठात सर्वप्रथम.

**सेवा –**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे संस्कृत विषय घेऊन राज्यात सर्वप्रथम स्थान प्राप्त करीत शासनात राजपत्रित अधिकारी वर्ग–१ म्हणून कार्यरत.

**अध्यापन अनुभव –**

२१ वर्षे, शासकीय महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये सातत्याने अध्यापन.

**प्रशासकीय अनुभव –**

अध्यापनाबरोबरच विविध प्रशासकीय पदेही भूषविली. महाराष्ट्र राज्याच्या सर्वप्रथम पूर्णवेळ महिला भाषा संचालिका; प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग या पदांवर योगदान. सध्या ऑगस्ट २०२२ पासून उपमुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येथे प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत.

**शोधकार्य –**

अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, संमेलन यातून सहभाग आणि सर्वोत्कृष्ट शोध निबंधांचे पुरस्कार प्राप्त.

विश्व संस्कृत संमेलन, बँकॉक, थायलँड २०१५ यात सहभाग व शोधनिबंध वाचन.

**प्रकाशित ग्रंथसंपदा –**

आजवर ३५ पुस्तके प्रकाशित. त्यात श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, विवेकरत्नानि, वेदकालीन स्त्रीरत्नानि, प्रकाशमार्गाः हे (संस्कृत ग्रंथ) तसेच विवाह–संस्कार, स्मृतिवचनानि, स्मृति–प्रतिपादित–न्याय, प्राचीन भारतीय समाज –भाग १, भाग २, विज्ञानातील संस्कृत, चतुरंग, शोधामृत, संस्कृत – मराठी उखाणे (संस्कृत संबद्ध पुस्तके), जीवन चिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रिया, अणुविज्ञानातील झंझावात डॉ. अनिल काकोडकर, गौरवगाथा सूर्याची (मराठी पुस्तके), मंजुमंजिरी, सर्ग – निसर्ग (मराठी काव्य ऑडियो बुक) प्रकाशित असून सूर्य शक्ती और मानव, कौटिलीय अर्थशास्त्र भाग १ व भाग २, स्मृतिग्रंथ आणि प्राचीन भारतीय न्यायव्यवस्था ही पाच हिंदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**नुकतेच प्रकाशित होत असलेले मराठी ग्रंथ –**

अनमोल विचार ठेवा– नचिकेता (वैचारिक लेखसंग्रह), लावण्यसखी (लावणी संग्रह), कणखर बाणा – राणी अहिल्या (चरित्र), बकुळ फुले (काव्यसंग्रह), मृद्‌गंध (ग्रामीण काव्यसंग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा (प्रेमपर काव्यसंग्रह), आरस्पानी जीवनगाणी (जीवनपर काव्यसंग्रह), गोड गोड पापा (बालकाव्यसंग्रह), सर्ग – निसर्ग (निसर्गपर काव्यसंग्रह)

**अन्य योगदान –**

व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, साहित्य अकादमी पुरस्कार २०20 प्राप्त प्रथितयश लेखिका, उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च

प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्त्या, सुप्रसिद्ध व्याख्याता, प्रवचनकर्त्या, निवेदिका, अभिवाचक, सूत्रसंचालिका, एकपात्री प्रयोगकर्त्या अशा नानाविध रूपात भाषाकार्य, भाषाविषयक संशोधन, अनुवाद, ब्रीदवाक्य निर्मिती, परिभाषा कोशनिर्मिती, भाषाधोरण निर्मिती अशा भाषाविषयक महत्त्वपूर्ण कार्यात अग्रेसर.

**विश्वविक्रम –**

मराठी काव्यक्षेत्रात जागतिक कीर्तीमान स्थापित. 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमाची नोंद झालेली आहे. मराठीत काव्य, ललित, चरित्रात्मक, वैचारिक लेखनव्रत निरंतर सुरू.

**साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार – २०२० च्या मानकरी**

'प्रकाशमार्गा:' या डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या मराठी जीवनचरित्राच्या संस्कृत अनुवादासाठी प्राप्त.

**प्रकल्प –**

१) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित वैदिक साहित्याचा इतिहास (२६० पृष्ठे ) या मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प साहित्य अकादमीने प्रदान केलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण करून साहित्य अकादमीत सादर केलेला आहे.

२) आचार्य बाळाराव सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत आणि हिंदी अनुवाद प्रकल्प स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी प्रदान केला आहे. ते कार्य सुरू आहे.

**विशेष उल्लेखनीय –**

गेल्या २५ वर्षांपासून भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन्

कार्यरत आहे. साहित्यिक व्रत म्हणून गेल्या ४ वर्षांपासून रोज काव्यरचना करत असून त्या प्रसारितही करीत आहे.

त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारीजी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

पुरस्कार, सन्मान साहित्यिक, शैक्षणिक, प्रशासकीय, सांस्कृतिक योगदानासाठी – अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

१. परळी भूषण पुरस्कार २०२३

२. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)

३. संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. वि.म. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३

४. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार

५. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे – साहित्य रत्न पुरस्कार २०२२

६. सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२

७. मुन्शी प्रेमचंद सन्मान २०२२

८. अणु विज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर, या ग्रंथास ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त

९. महात्मा फुले राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

१०. राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०

११. लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार २०१९
१२. संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
१३. राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत वि. द. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
१४. पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई) चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०१७
१५. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी, जि. बीड (महा) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
१६. द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
१७. गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०१६
१८. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
१९. राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला गौरव पुरस्कार २०१२
२०. राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
२१. दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय नवोदित संस्कृत कवी प्रतियोगिता पुरस्कार २०१२
२२. लोकमत, माझी आई पुरस्कार २०१२
२३. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
२४. संस्कृत नाट्य महोत्सव संहितालेखन, प्रथम पारितोषिक २०११
२५. संस्कृत नाट्य महोत्सव, द्वितीय पारितोषिक २०११
२६. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
२७. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
२८. राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
२९. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, सर्वतृतीय २००१
३०. मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
३१. महाराष्ट्र शासनाचा संस्कृत प्रावीण्य पुरस्कार १९९८

■